# कृषीवल

रायगड, रविवार, दि. २२ फेब्रुवारी २०२६

किंमत ४ ₹


शासनाच्या तिजोरीत

# 316 कोटी पडून

- जिल्हा नियोजन समितीकडून १९३ कोटी रुपये वितरीत
- ३४९ कोटी रुपयांच्या कामांना प्रशासकीय मान्यता
- १६५ कोटी रुपयांच निधी खर्चित

**निधीवर दृष्टीक्षेप**

एकूण प्राप्त निधी : 48,100.00 (कोटी) (१००% निधी प्राप्त)

प्रशासकीय मान्यता: 34,985.28 (कोटी)

एकूण वितरित निधी: 19,311.89 (कोटी)

प्रत्यक्ष खर्च: 16,514.88 (कोटी)

**वितरीत केलेल्या निधीवर दृष्टीक्षेप**

रस्ते व पूलाच्या कामासाठी 3,072.26 (कोटी)

सार्वजनिक आरोग्य 1,906.58 (कोटी)

नगरविकास 1,844.65 (कोटी)

सार्वजनिक कार्यालये व पायाभूत सुविधा 1,832.55 (कोटी)

एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम 1,511.10 (कोटी)



**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी शासनाकडून तब्बल ४८१ कोटी रुपयांचा निधी जिल्हा नियोजन समितीकडे प्राप्त झाला. मात्र, वर्ष संपण्यास अवघे ३५ दिवस शिल्लक असताना प्रत्यक्षात केवळ १६५ कोटी रुपयांचा निधी खर्च करण्यात आला असून उर्वरित ३१६ कोटी रु. अजूनही सरकारी तिजोरीत पडून असल्याने प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. तसेच, वर्षअखेरीस उरलेला निधी घाईघाईत खर्च करून 'काम पूर्ण' दाखवण्याचा जुना खेळ पुन्हा रंगणार का? की जबाबदारी निश्चित करून ठोस अंमलबजावणी केली जाणार? ३१६ कोटी रुपयांचा निधी पडून राहणे हे केवळ आकडे नाहीत तर तो जनतेच्या विकासाचा गळा घोटणारा निष्काळजीपणा आहे, असा संतप्त सूर नागरिकांत उमटू लागला आहे.

जिल्ह्याच्या विकासासाठी शासनाकडून जिल्हा नियोजन समितीकडे निधी वितरीत केला जातो. मागण्यांनुसार जिल्हा नियोजन समितीमार्फत निधी वितरीत केला जातो. त्या कामांची प्रशासकीय मान्यता दिली जाते. रायगड जिल्ह्यासाठी ४८१ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता. शासनाकडून शंभर टक्के निधी प्राप्त झाला. जिल्हा नियोजन समितीमार्फत ३४९ कोटी ८५ लाख रुपयांच्या निधीची प्रशासकीय मान्यता देण्यात आली. त्यानंतर १९३ कोटी रुपयांचा निधी कामांसाठी वितरीत करण्यात आला. त्यामध्ये सार्वजनिक आरोग्य, रस्ते व पुल, नगरविकास, सार्वजनिक कार्यालये, पायाभूत सुविधा आणि एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रमांतर्गत कोट्यावधी रुपयांचा निधी वितरीत करण्यात आला. ग्रामीण भागासह शहरी भागातील नागरिकांच्या सर्वांगीण विकासासाठी वेगवेगळ्या विभागाला निधी वितरीत करण्यात आला. मात्र आरोग्य, बांधकाम, नगरविकास विभागासह ग्रामीण भागाला सुविधा देणाऱ्या विभागाकडून हा निधी शंभर टक्के खर्च करण्यास अपयश आले आहे.

जिल्हा नियोजन समितीकडून विविध विकास कामांसाठी १९३ कोटी रुपयांचा निधी वितरीत करण्यात आला. त्यापैकी फक्त १६५ कोटी रुपयांचा निधी खर्च करण्यात आला आहे. दिलेल्या माहितीनूसार, ८४ टक्के निधी खर्च करण्यात आला आहे. तर, फक्त १६ टक्के निधी अजूनही अखर्चित असल्याचे सांगण्यात आले.

जानेवारी अखेरपर्यंत हा निधी खर्च करण्यात आला आहे. आर्थिक वर्ष संपण्यासाठी अवघे ३४ दिवस शिल्लक राहिले आहेत. ४८१ कोटी पैकी फक्त १६५ •➤ पान २ वर

## पोलीस भरतीदरम्यान तरूणाचा मृत्यू

**छ. संभाजीनगर :** छत्रपती संभाजीनगरमध्ये सुरू असलेल्या लोहमार्ग पोलीस भरती प्रक्रियेदरम्यान शनिवारी (दि.२१) एक दुर्दैवी घटना घडली. मैदानी चाचणी सुरू असताना सांगली जिल्ह्यातील एका २३ वर्षीय उमेदवाराचा हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने मृत्यू झाला. सांगली जिल्ह्यातील पलूस तालुक्यातील मोराळे येथील संग्राम धोंडीराम शिंदे (२३) हा तरुण पोलीस भरतीसाठी छत्रपती संभाजीनगरमध्ये आला होता. टीव्ही सेंटर भागातील गोकुळ मैदानावर •➤ पान२ वर

## स्व. प्रभाकर पाटील यांना अभिवादन

### जिल्ह्यात सर्वत्र स्मृतीदिन साजरा



**। रायगड। जिल्हा प्रतिनिधी ।**

शेतकरी, कष्टकरी, कामगार, गोरगरीबांचे कैवारी, कोकणचे भाग्यविधाते स्व. प्रभाकर पाटील अर्थात भाऊ यांचा स्मृतीदिन शनिवारी (दि.२१) अलिबागसह संपूर्ण रायगड जिल्ह्यात विविध ठिकाणी साजरा करण्यात आला. यावेळी त्यांच्या प्रतिमेला व पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

स्व. प्रभाकर पाटील यांनी सामाजिक, सहकार, राजकीय, क्रीडा अशा अनेक क्षेत्रात काम करीत असताना तळागाळातील घटकाचा विकास साधण्यावर अधिक भर दिला. पोयनाडचे सरपंचपासून जिल्हा परिषदेचे अध्यक्ष, बांधकाम सभापती अशा अनेक पदांवर त्यांनी काम केले आहे. २१ फेब्रुवारी २००० मध्ये प्रभाकर पाटील तथा भाऊंचे निधन झाले. रायगड जिल्ह्यामध्ये शनिवारी (दि.२१) त्यांचा २६ वा स्मृतीदिन वेगवेगळ्या संस्था संघटनाच्या वतीने साजरा करण्यात आला. रायगड जिल्हा मराठी •➤ पान २ वर

## रायगड पोलीस दलात खळबळ

- पोलीस निरीक्षकांची वरिष्ठ अधिकाऱ्यांविरोधात पत्राद्वारे तक्रार
- मानसिक, शारीरीक त्रास देत असल्याचा आरोप



**। महाड । प्रतिनिधी ।**

कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणाऱ्या रायगड पोलीस दलातच सुरक्षेबाबत खळबळ उडाली आहे. महाड शहर पोलीस ठाण्यात कार्यरत असणाऱ्या पोलीस निरीक्षकाला वरिष्ठांसह सहाय्यकांकडून मानसिक व शारीरिक त्रास होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे या जाचाला कंटाळून पोलीस निरीक्षकांनी पोलीस महासंचालक यांना पत्र पाठवून आत्महत्या करण्याचा इशारा दिला आहे. त्यामुळे पोलीस ठाण्यातील अधिकाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न आता ऐरणीवर आला आहे.

रायगड पोलीस दलात कार्यरत असणारे महाड शहर पोलीस ठाण्यातील पोलीस निरीक्षक रमेश तडवी हे यापुर्वी ठाणे ग्रामीण पोलीस दलात कार्यरत होते. त्यांची २०२४ मध्ये लोकसभा निवडणूकीच्या कालावधीत रायगड जिल्ह्यात बदली करण्यात आली होती. सुरुवातीला ते अलिबागमध्ये रायगड जिल्हा पोलीस नियंत्रण कक्षात कार्यरत होते. त्यानंतर त्यांची बदली अलिबागमधून महाड शहर येथे करण्यात आली. प्रभारी अधिकारी म्हणून महाड शहराचा •➤ पान २ वर

### आ. गोगावलेंच्या आरोपी पुत्राला पोलिसांचे सहकार्य?

महाड नगरपालिका निवडणुकीदरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना शिंदे गट यांच्यात झालेल्या भांडणावरून दोन गुन्हे दाखल झाले होते. एका गुन्ह्यात मंत्री भारत गोगावले यांचा मुलगा विकास गोगावले आरोपी होता. या गुन्ह्यात सहकार्य करण्यासाठी अपर पोलीस अधिक्षक अभिजित शिवथरे, उपविभागीय पोलीस अधिकारी शंकर काळे व पोलीस निरिक्षक मिलिंद खोपडे या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी बनाव करून तीनजणांना बेकायदेशीररीत्या अटक करण्यास सांगितले होते, असा आरोप रमेश तडवी यांनी केला आहे. मात्र, बेकायदेशीर अटक करण्यास नकार दिल्याने आपल्याला लक्ष्य करण्यात आल्याचा दावा त्यांनी केला आहे.

## सार्वजनिक मैदानांवर आर्थिक लूट

- शासनाचा महसूल बुडवून लाखोंची कमाई
- बेकायदेशीर टर्फवर केवल महाडिक यांची कारवाईची मागणी

**। पनवेल । ग्रामीण प्रतिनिधी ।**

पनवेल पालिका हद्दीतील विविध शहरातील सार्वजनिक वापरासाठी राखीव असलेल्या मैदानांवर काही शाळा, महाविद्यालये तसेच खासगी संस्था चालकांकडून बेकायदेशीररीत्या फुटबॉल, क्रिकेट टर्फ उभारून मोठ्या प्रमाणावर आर्थिक लूट सुरू असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी पत्रकार मित्र असोसिएशनचे अध्यक्ष केवल महाडिक यांनी महापालिका व सिडको प्रशासनाला पत्र देत तात्काळ कारवाईची मागणी केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, या बेकायदेशीर टर्फवर तासागणिक रुपये १ हजार ५०० ते २ हजार ५०० इतके शुल्क आकारले जात असून, दिवसाला १५ हजार ते २५ हजार आणि महिन्याला ५ ते ८ लाखांपर्यंत अवैध कमाई केली जात आहे. सार्वजनिक वापरासाठी राखीव असलेली मैदाने ही स्थानिक मुलं, युवक व खेळाडूंसाठी असताना, त्यावर फी आकारून प्रवेश दिला जात असल्याने गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. तसेच, हे टर्फचालक-मालक हे शासनाला कोणत्याही •➤ पान २ वर







# अलिबाग-रेवस मार्गावर मृत्यूची धूळ

## ■ विकासाच्या नावाखाली जीवाशी खेळ

| सारळ | प्रतिनिधी |

अलिबाग-रेवस हा मार्ग रोज हजारो प्रवाशांसाठी जीवनरेषा आहे. नोकरदार वर्ग, विद्यार्थी, स्थानिक ग्रामस्थ आणि पर्यटक या रस्त्यावरून सतत प्रवास करत असतात. परंतु, या मार्गालगत मोठ्या प्रमाणात विकास कामे व बांधकामे सुरू आहेत. या कामांसाठी लागणारी दगड, माती, खडी, रेती आणि इतर बांधकाम साहित्य वाहून नेणारे ट्रक व डंपर दिवसभर धावत असतात. परंतु, त्यातून हवेत उडणारी धूळ, सांडलेली खडी आणि बेदरकार वेग यामुळे अपघाताचा धोका दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे ट्रकमधील उडणारी धूळ ही मृत्यूची धूळ असून विकासाच्या नावाखाली प्रवासीवर्गाच्या जीवाशी खेळ सुरू असल्याच्या संतप्त प्रतिक्रीया उमटत आहेत.

अलिबाग-रेवस या मार्गादरम्यान अनेक विकास कामे सुरू आहेत. या मार्गालगतच अनेक इमारती, बंगल्यांची कामे सुरू आहेत. त्यासाठी लागणारी खडी, दगड, माती आणि इतर बांधकाम साहित्यांची वाहतूक मोठ्या प्रमाणात होत आहे. परंतु, हे ट्रक पूर्णपणे झाकलेले नसतात. तसेच, या ट्रकचालकांची वेगावर देखील कोणतीच मर्यादा नसल्याचे येथील प्रवासी वर्गातून बोलले जात आहे. समोर एखादा खड्डा आला किंवा गतीरोधक आले की हे भरधाव ट्रकचालक अचानक ब्रेक लावतात. त्यामुळे ट्रकमधील खडी, दगड मातीसारखे सैल साहित्य भर रस्त्यावर सांडते. त्यामुळे संबंधित ट्रकच्या मागून येणाऱ्या दुचाकीस्वारांसह इतर लहान वाहने व पादचाऱ्यांना त्याचा मोठा त्रास सहन करावा लागतो. ट्रकमधून उडणारी माती थेट प्रवाशांच्या नाका तोंडासह डोळ्यांत जाते. तसेच, रस्त्यावर सांडलेल्या खडी, दगडांमुळे दुचाकी सरकून पडण्याची व ट्रक चालकाने अचानक ब्रेक लावल्यामुळे मागून येणाऱ्या वाहनाचा भीषण अपघात होण्याचा धोका वाढत आहे. त्यामुळे अशा भरधाव ट्रकच्या मागून जीव मुठीत धरून वाहन चालवावे लागत असल्याची भावना अनेक प्रवाशांनी व्यक्त केली आहे. त्यातच या मार्गावरून मांडवा व रेवस येथील बोटसेवा आणि रो-रो सेवेच्या प्रवासी वर्गाची देखील मोठ्या प्रमाणात ये-जा असते. परिणामी हा मार्ग आता धोक्याचा झोन बनू लागला आहे.

त्यामुळे संबंधित जिल्हा प्रशासन, वाहतूक पोलीस आणि बांधकाम विभागाने तातडीने लक्ष घालून सैल साहित्य वाहून नेणाऱ्या ट्रक-डंपरला पूर्णपणे कव्हर बंधनकारक करणे, वेगमर्यादेचे काटेकोर पालन, रस्त्यावर सांडलेली माती नियमित साफसफाई, धूळ नियंत्रणासाठी पाणी फवारणी यासारख्या उपाययोजना त्वरित राबवणे गरजेचे आहे. विकासाच्या नावाखाली जर रोजचा प्रवासच जीवघेणा होत असेल, तर तो विकास नव्हे तर धोक्याची चाहूल आहे. त्यामुळे अलिबाग-रेवस हा मार्ग प्रशासनाच्या जबाबदारीची कसोटी बनला आहे. वेळीच पावले उचलली नाहीत, तर ही धूळ दुर्घटनेच्या धुरात बदलून जाण्यात वेळ लागणार नाही, अशी संतप्त प्रतिक्रीया प्रवासी वर्गातून उमटत आहे.

### स्थानिक प्रवासी संतप्त

काही वेळा ट्रकमधील मातीचे प्रमाण इतके जास्त असते की वाऱ्यासोबत ती उडत राहते आणि पादचाऱ्यांसह दुचाकी चालकांच्या डोळ्यांत जाऊन इजा होते. तसेच, खडी व रेती सारखे बांधकाम साहित्य रस्त्यावर पडून त्याच्यावरून वाहन सरकून भीषण अपघाताची देखील शक्यता आहे. त्यामुळे माती किंवा सैल साहित्य वाहून नेताना ते पूर्णपणे झाकणे बंधनकारक नाही का? वाहतूक विभाग किंवा संबंधित बांधकाम विभाग यासाठी काही आचारसंहिता पाळत नाहीत का? विकासकामे महत्त्वाचीच; परंतु, त्या बदल्यात नागरिकांच्या सुरक्षेशी तडजोड का? असे संतप्त प्रश्न स्थानिक प्रवासी वर्गातून उमटत आहेत.

## निवडक

### श्रीवर्धनमध्ये 'विकास' की ठेकेदारराज?

श्रीवर्धन : गेल्या १७ वर्षांत श्रीवर्धनमध्ये विकासाच्या नावाखाली कोट्यवधी रुपयांची कामे मंजूर झाली; मात्र, प्रत्यक्षात हा विकास सर्वसामान्यांसाठी नव्हे तर ठराविक ठेकेदार आणि राजकीय गटांसाठीच झाला का, असा तीव्र सवाल आता नागरिक उघडपणे विचारू लागले आहेत. प्रत्येक निवडणुकीपूर्वी श्रीवर्धनमधील रस्ते, गटारे, पाणीपुरवठा योजना, समुद्रकिनारा सुशोभीकरण, पर्यटन प्रकल्प करणार असल्याच्या मोठमोठ्या घोषणा झाल्या. परंतु, वास्तव चित्र वेगळेच दिसत आहे. जी कामे पूर्ण झाल्याची दाखवली ती कामे काही महिन्यांतच उखडली आहेत. पावसाळा आला की नव्याने बांधलेले रस्ते देखील खड्ड्यांनी भरतात, गटारे तुंबतात व फरसबंदी उखडते. त्यामुळे स्थानिकांचा आरोप आहे की, हा केवळ प्रशासनिक निष्काळजीपणा नसून, राजकीय संरक्षणाखालील ठेकाराज आहे. ठराविक ठेकेदारांना वारंवार कासमीकरणेमे देण्यात येतात, निविदा प्रक्रिया पारदर्शक नसते आणि गुणवत्तेची तपासणी केवळ कागदोपत्री होते, असा आरोप होत आहे. राजकीय आणि स्थानिक सत्ताधाऱ्यांचे कथित हितसंबंध यामुळेच निकृष्ट कामांवर कारवाई होत नाही, असा संशय व्यक्त केला जात आहे. काम निकृष्ट असले तरी बिलं वेळेवर मंजूर होतात; मग जबाबदारी कोणाची? असा सवाल देखील स्थानिक नागरिक विचारत आहेत.विरोधकांनी या मुद्द्यावर सत्ताधाऱ्यांना थेट लक्ष्य करत, गेल्या १७ वर्षांत झालेल्या सर्व कामांची स्वतंत्र न्यायालयीन चौकशी आणि थर्ड पार्टी ऑडिटची मागणी केली आहे. तसेच, संबंधित अधिकाऱ्यांची व निवडून आलेल्या प्रतिनिधींची जबाबदारी निश्चित करण्याची मागणी जोर धरत आहे.



### भाईसाहेब पाशिलकर यांना आदरांजली

**धाटाव** : प्रखर इच्छाशक्ती, कडक शिरस्ता,स्वच्छतेचे अग्रगण्य असलेले लोकनेते भाईसाहेब पाशिलकर यांचे शनिवारी (दि.१४) निधन झाले. त्यांच्या निधनाने रोह्यासह रायगड जिल्हा शोकाकुल झाला. आापल्या लाडक्या लोकनेत्याला समस्त रोहेकरांनी शुक्रवारी (दि.२०) आयोजित शोकसभेत श्रद्धांजली व आदरांजली वाहिली. यावेळी त्यांच्या आठवणींना उजाळा देण्यात आला. समस्त रोहेकरांतर्फे शुक्रवारी ज्येष्ठ नागरिक सभागृहात शोकसभा घेण्यात आली. यावेळी स्व.भाईसाहेब पाशिलकर यांच्या आठवणी सांगताना त्यांचे अनेक सहकारी, बुजुर्ग व तरुण सद्गतीत झाले होते. तो थाट, तो रुबाब, तो दरारा, पुन्हा होणे नाही, हे बॅनरवरील घोषवाक्य सर्वांचेच लक्ष वेधून घेत होते. या शोकसभेला माजी आ. अनिकेत तटकरे, रोहा इंड असो.चे अध्यक्ष पी.पी. बारदेशकर, ॲड. राजीव साबळे, विजयराव मोरे, सहकारी मारुती खरीवले, सुरेश मगर, आप्पा देशमुख, ॲड. मनोज शिंदे, उद्देश वाडकर, अशोक धोत्रे, नंदकुमार म्हात्रे, स्नेहा अंबरे, उस्मान रोहेकर, नारायण धनवी, सुरेश महाबळे, अमित उकडे, महेश ठाकूर, राजेंद्र जैन, लिलाधर मोरे, सचिन शेडगे, सूर्यकांत मोरे यांसह राजकीय, सामाजिक, पत्रकारिता क्षेत्रातील मान्यवर, शेकडो चाहते उपस्थित होते.

## सावतामाळी पतसंस्थेचा वर्धापन दिन उत्साहात

| अलिबाग | प्रतिनिधी |

अलिबागेतील सावतामाळी पतसंस्थेचा ४२ वा वर्धापन दिन मंगळवारी (दि.१७) मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या वर्धापन दिनाचे निमित्ताने जिल्हा उप निबंधक, तन्वीर पाटील व सहाय्यक निबंधक प्रशासन अविनाश इंगळे, सहाय्यक निबंधक अनिल पवार यांनी पतसंस्थेला भेट दिली. तसेच, त्यांनी पतसंस्थेची माहिती घेऊन सम ाधान व्यक्त केले. सावतामाळी संस्थेची स्वमालकीची २२०० चौ. फुटाची जागा पाहून त्यांनी कौतुक केले. त्यांच्या सोबत डी.डी.आर. आणि ऑडीट कार्यालयातील अधिकारी



कर्मचारी देखील आले होते.

यावेळी वर्धापन दिनाच्या निमित्ताने महिलांसाठी हळदी-कुंकुचा कार्यक्रम ठेवला होता. या कार्यक्रमाला सुमारे ४०० महिलांनी संस्थेला भेट देऊन लाभ घेतला आणि शुभेच्छा दिल्या. त्यांनतर संस्थेचे सभासद ॲड. अमर घरत यांच्या हस्ते डिजिटल पासबुकाचे उद्घाटन करून अजुन एक पाऊल प्रगतीकडे टाकले. तसेच, या दिवशी छोटे उद्योजकांना मोठ्या छत्री वाटप करून सामाजिक बांधिलकी सुद्धा जपली. सावतामाळी पतसंस्थेच्या वर्धापन दिनी सुमारे ७५० लोकांनी संस्थेत येऊन शुभेच्छा दिल्या आणि धार्मिक कार्यक्रमाचा लाभ घेतला. संस्थेचे अध्यक्ष रमेश नाईक, उपाध्यक्ष जगदीश कवळे, संचालक मंडळ व कर्मचारी वर्गाने पाहुण्यांचे यथोचित स्वागत आणि मानपान केले. रायगड जिल्हा महासंघाचे अध्यक्ष ॲड. जे.टी. पाटील, सचिव योगेश मगर, दत्ता पाटील पतसंस्थेचे अध्यक्ष प्रमोद पाटील, आदर्श पतसंस्थेचे अध्यक्ष अभिजीत पाटील यांनी आर्वजून संस्थेला भेट देऊन शुभेच्छा आणि अभिनंदन केले. तसेच, विविध सहकारी बॅंकेचे अधिकारी आणि कर्मचारी यांनी प्रत्यक्ष भेटीत शुभेच्छा देऊन पतसंस्थेच्या कामकाजाचे कौतुक केले.

## राज्यात पनवेलचा हरित विजयघोष

| पनवेल | दिपक घरत |

पर्यावरण संवर्धनाच्या लढ्यात ठोस कामगिरी करत पनवेल महानगरपालिकेने राज्यात आपला दबदबा सिद्ध केला आहे. 'माझी वसुंधरा अभियान ५.०' अंतर्गत 'अमृत शहर' गटात प्रथम क्रमांक पटकावत पनवेलने संपूर्ण महाराष्ट्रात अव्वल स्थान मिळवले आहे.

मुंबई येथील डोम-सरदार वल्लभभाई पटेल स्टेडियम येथे पार पडलेल्या भव्य राज्यस्तरीय पुरस्कार सोहळ्यात महाराष्ट्राचे राज्यपाल आचार्य देवव्रत, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर तसेच पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांच्या हस्ते हा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. महापौर नितीन पाटील, आयुक्त मंगेश चितळे, उपायुक्त स्वरूप खारगे आणि उपआयुक्त डॉ. वैभव विधाते यांनी हा सन्मान स्वीकारत पनवेलच्या हरित कामगिरीची नोंद राज्यपातळीवर करून दिली.

पनवेलने हरितक्षेत्र वाढ, प्लास्टिकमुक्ती मोहिमा, जलसंधारण प्रकल्प, ऊर्जा बचत उपाययोजना, आधुनिक घनकचरा व्यवस्थापन आणि व्यापक जनजागृती अशा बहुआयामी उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करत पर्यावरणपूरक विकासाचा आदर्श निर्माण केला आहे. 'हरित पनवेल, स्वच्छ पनवेल, प्रगतीशील पनवेल' या ध्येयाने प्रशासन आणि नागरिकांचा भक्कम समन्वय साधत हे अभियान लोकचळवळ बनले.

## वरदविनायक मंदिराच्या जागेवर अतिक्रमण

**खोपोली :** अष्टविनायकातील वरदविनायक मंदिराच्या मालकीच्या महड येथील जागेवर अतिक्रमण केल्याचा प्रकार समोर आला असून, देवस्थानच्या मालकी दर्शविणारा फलक तोडून त्या जागेभोवती कंपाऊंड बांधण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. या प्रकाराविरोधात श्री गणपती संस्थानच्यावतीने खालापूर तहसीलदार, खालापूर नगरपंचायत तसेच खालापूर पोलीस ठाण्यात निवेदन देऊन तातडीने कारवाईची मागणी करण्यात आली आहे.

## ई-रिक्षांचा २३ फेब्रुवारीपासून बेमुदत बंद

| माथेरान | प्रतिनिधी |

सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश भूषण गवई यांनी ६ ऑगस्ट २०२५ रोजी दिलेल्या आदेशानुसार हातरीक्षा सारखी अमानवीय प्रथा बंद करून सर्व ९४ हातरीक्षा चालकांचे ई-रिक्षाच्या माध्यमातून पुनर्वसन करावे. तसेच, नवीन ई-रिक्षा राज्य सरकारने खरेदी कराव्यात, असे स्पष्ट निर्देश दिले होते. ६ फेब्रुवारी रोजी या आदेशाला ६ महिन्यांचा कालावधी पूर्ण होत असतानाही राज्य शासनाकडून अद्याप काहीही



ठोस भूमिका बजावली नाही. त्यामुळेच श्रमिक रिक्षा संघटनेने दि.१० फेब्रुवारीपासून सर्वच रिक्षा बंद करण्याचा निर्णय घेतला होता. त्यानंतर या ई-रिक्षांच्या संख्येत वाढ करण्यासाठी शासनाकडून १३ ई-रिक्षा आणि नगरपरिषदेच्या माध्यमातून ७ ई-रिक्षा देण्याचा निर्णय झाला होता; परंतु, उर्वरित ५४ हातरीक्षा चालक- मालकांना पुन्हा ह्या अमानवीय प्रथेचा सामना करावा लागणार असल्याने एकूण ९४ हातरीक्षा परवाना धारकाना ई-रिक्षा मिळाल्या पाहिजेत, ही भूमिका घेऊन दि.२३ फेब्रुवारीपासून सर्व ई-रिक्षा बेमुदत बंद करण्याचा निर्णय संघटनेने घेतला आहे. या बंदच्या दरम्यान शालेय विद्यार्थ्यांना आणि रुग्णांना सुद्धा ही सेवा उपलब्ध होणार नाही.

## उनाड गुरांबाबत प्रशासनाला निवेदन

**कोलाड :** रोहा तालुक्यातील देवकान्हे विभागीय शेतकरी आणि शेतकरी संघटना यांनी मोकाट गुरांच्या समस्येबाबत स्थानिक प्रशासनाला निवेदन दिले आहे. गेली अनेक दिवस या उनाड आणि मोकाट गुरांच्या उपद्रवामुळे दिवसेंदिवस येथील शेतकरी अक्षरशः पिकांच्या नुकसानीपासून मेटाकुटीला आला आहे. त्यामुळे शेतकरी ग्रामस्थ एकत्रित येऊन शुक्रवारी (दि.२०) संबंधित विभागाला निवेदन दिले आहे.

पान १ वरून

## शासनाच्या तिजोरीत ३१६ कोटी पडून

कोटी रुपये खर्च झाल्याने ३१६ कोटी रुपये अजूनही शासनाच्या तिजोरीत पडून असल्याचे आकडेवारीनुसार दिसून आले आहे. संबंधित विभागाला विकास कामांसाठी निधी वितरीत करूनदेखील तो निधी शंभर टक्के खर्च करण्यास बांधकामसह अन्य विभाग उदासीन ठरले आहे. प्रशासनाच्या संथकारभारामुळे जिल्ह्याच्या विकासावर त्याचा परिणाम होत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

## स्व. प्रभाकर पाटील यांना अभिवादन

पत्रकार संघ व स्व. प्रभाकर पाटील सांस्कृतिक कला मंचच्यावतीने स्व. प्रभाकर पाटील यांचा स्मृतीदिन अलिबागमध्ये साजरा करण्यात आला. रायगड जिल्हा मराठी पत्रकार संघाचे उपाध्यक्ष नागेश कुलकर्णी यांच्या हस्ते प्रभाकर पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी अलिबाग नगरपरिषदेचे माजी नगरसेवक आर. के. घरत, अलिबाग ज्येष्ठ नागरिक संघाचे सचिव नंदू तळकर, झेबा कुरेशी आदी मान्यवर, कर्मचारी, पत्रकार उपस्थित होते. यावेळी नागेश कुलकर्णी यांच्यासह अनेक मान्यवरांनी स्व. प्रभाकर पाटील यांच्या कार्याची माहिती देत जुन्या आठवणींना उजाळा दिला.

अलिबागमधील शेतकरी भवनमधील सभागृहात भाऊंच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी शेकाप तालुका चिटणीस सुरेश घरत, संदीप सारंग आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. अलिबागसह पेण, उरण, पनवेल व अन्य तालुक्यांमध्ये स्व. प्रभाकर पाटील यांचा स्मृतीदिन साजरा करण्यात आला.

## रायगड पोलीस दलात खळबळ

कारभार त्यांच्याकडे सोपविण्यात आला. सुरुवातीचा कालावधीत सर्व कारभार चांगल्या पद्धतीने चालत असताना राजकीय दबावापोटी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून त्रास देण्यास सुरुवात करण्यात आली.

वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून जातीवाचक विधान करण्याबरोबरच हीन वागणूक दिली असल्याचा आरोप पोलीस निरीक्षक रमेश तडवी यांनी केला आहे. महाडचे उपविभागीय पोलीस अधिकारी शंकर काळे या वरिष्ठांनी पोलीस अधिक्षकांकडे कर्तव्यात कसूर केल्याचा खोटा अहवालही दिला गेला. अपर पोलीस अधीक्षकांसह स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक मिलींद खोपडे यांच्या मनाप्रमाणे काम न केल्याने बदनामी करण्याचा प्रयत्न करण्यात आला असल्याचा आरोप करण्यात आला आहे. दोन वर्षात दोनदा बदलीमुळे व्यथित झालेल्या तडवी यांनी वरिष्ठांकडून जातीवाचक टोमणे, हीन वागणूक आणि मानसिक छळ केला जात असल्याचा आरोप केला आहे.

वरिष्ठांच्या त्रासाला कंटाळून कुटूंबियासह आत्महत्या करणार असल्याचा इशारा तडवी यांनी दिला आहे. याबाबत राज्याचे पोलीस महासंचालक यांना पत्र लिहीले आहे. या प्रकारामुळे जिल्ह्यातील पोलीस दलात खळबळ उडाली आहे.

महाड शहर पोलीस ठाण्यात पदभार स्वीकारल्यापासून उपविभागीय पोलीस अधिकारी शंकर काळे, सपोनि जीवन हिंदूराम माने यांनी त्रास द्यायला सुरू केल्याचा आरोप रमेश तडवी यांनी केला आहे. वरिष्ठांनी एकट्याला केबिनमध्ये बोलावून तु खालच्या जातीचा आहे, तु कसा येथे राहतो तेच बघतो, काही झाले तरी मी तुझी बदली करणारच अशी धमकी दिली. तसेच, जिवन हिंदूराव माने जाणीवपूर्वक बाहेर लोकांना माझ्या जातीवरून बोलून माझा अपमान करीत होते, असा आरोप तडवी यांनी पत्रातून स्पष्ट केला आहे.

रायगड जिल्हा पोलीस दलातील एका पोलीस ठाण्यातील प्रभार अधिकारी यांचा मानसिक व शारीरीक छळ होत असल्याने पोलीस दलातील कर्मचारी सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. रायगडच्या पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी जिल्ह्याचा कारभार हाती घेतल्यावर जिल्ह्यातील अवैध धंदे बंद करण्यावर भर दिला. वादग्रस्त अधिकारी यांच्याविरोधात कारवाई करण्याबरोबरच अनेकांच्या अन्य ठिकाणी बदल्या केल्या. एक वेगळा दबदबा त्यांचा जिल्ह्यात आहे. मात्र, महाड शहर पोलीस ठाण्यातील पोलीस अधिकारी यांच्यावर होत असलेल्या अन्यायबाबत ते काय भुमिका घेणार याकडे आता लक्ष लागून राहिले आहे. संबंधित वरिष्ठ पोलीस अधिकारी यांच्याशी संपर्क साधला, असता होऊ शकला नाही.

## सार्वजनिक मैदानांवर आर्थिक लूट

प्रकारचा महसूल देत नसून शेड उभारण्यासाठी अथवा टर्फ उभारण्यासाठी कोणतीही स्थानिक प्रशासनाची कोणतीही परवानगी घेत नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे गरीब व मध्यमवर्गीय कुटुंबातील अनेक खेळाडूंना खेळण्याच्या मूलभूत हक्कापासून वंचित राहावे लागत आहे. 'पैसे द्या आणि खेळा' ही भूमिका स्थानिक खेळाडूंवर अन्यायकारक असून, सार्वजनिक मालमत्तेचे उघडपणे खाजगीकरण सुरू असल्याचा आरोप देखील यावेळी पत्रकार मित्र असोसिएशनतर्फे करण्यात आला आहे.ही मैदाने व्यवसायासाठी नव्हे, तर स्थानिक खेळाडू घडवण्यासाठी आहेत. पनवेल महापालिका हद्दीतील युवकांना खेळण्यासाठी फी भरावी लागणे ही अत्यंत लाजिरवाणी आणि चिंताजनक बाब आहे. या प्रकरणाची तातडीने चौकशी करून सर्व बेकायदेशीर टर्फ हटवावेत, संबंधितांवर कठोर कारवाई करावी आणि स्थानिक खेळाडूंना मैदानांचा मुक्त व विनामूल्य वापर उपलब्ध करून द्यावा, अशी ठाम मागणी पत्रकार मित्र असोसिएशनने पत्राद्वारे केली आहे. तसेच, १ महिन्यामध्ये याबाबत ठोस कारवाई न झाल्यास पत्रकार मित्र असोसिशनच्यावतीने स्थानिक खेळाडूंना सोबत घेऊन शहरव्यापी आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

## पोलीस भरतीदरम्यान तरूणाचा मृत्यू

शनिवारी सकाळी लोहमार्ग पोलीस भरतीची प्रक्रिया सुरू होती. मैदानी चाचणीसाठी मैदानात उतरल्यानंतर काही वेळातच संग्रामला अचानक चक्कर आली आणि तो जमिनीवर कोसळला. उपस्थित पोलीस कर्मचाऱ्यांनी वेळ न घालवता त्याला रुग्णवाहिकेतून शासकीय घाटी रुग्णालयात हलवले. मात्र, डॉक्टरांनी तपासणी अंती त्याला मृत घोषित केले. हृदयविकाराच्या झटक्याने त्याचा मृत्यू झाल्याचे प्राथमिक स्तरावर सांगण्यात येत आहे.

## धाटावमधील बंद कारखान्यात आग

| धाटाव | प्रतिनिधी |

रोहा तालुक्यातील धाटाव औद्योगिक क्षेत्रातील कॅलकेम इंडिया या बंद कारखान्यात शुक्रवारी (दि.२०) दुपारी ४ वाजण्याच्या सुमारास अचानक आग लागली.आग लागल्याचे निदर्शनास येताच तत्काळ अग्निशमन दलाला पाचारण करण्यात आले. काही तासातच ही आग आटोक्यात आणली गेली. मात्र,आगीचे कारण बेजबाबदारपणे होत असलेले भंगार तोडकाम असल्याचे समोर आले आहे. बंद अवस्थेतील या कारखान्यात गेली अनेक वर्षांपासून इतरस्त्र पसरलेले साहित्य आणि प्रचंड गवत



असल्यामुळे लागलेल्या आगीची परिस्थिती नियंत्रणात आली नसती तर मोठी हानी झाली असती.

ही कंपनी बंद होऊन अंदाजे १० वर्षे झाली आहेत. या कारखान्यात रसायनाने भरलेले ड्रम आजही त्या ठिकाणी आहेत. मात्र, हे ड्रम त्याच कारखान्याचे आहेत की इतर कोणाचे आणि त्यात कोणते रसायन आहे, हे अद्याप कळले नाही. मात्र, कंपनीत विविध ठिकाणी रसायनाने भरलेल्या गोणी, ड्रम तसेच पडून आहेत.धाटाव औद्योगिक वसाहतीमध्ये अनेक बंद कारखान्यात अशीच अवस्था आहे. त्यामुळे पावसाळ्यात यातील रसायन पाण्यामुळे बाहेर पडत असते. तर, उन्हाळ्यात तापमान अधिक वाढल्याने गवताबरोबर रसायनही पेट घेत असल्याच्या घटना घडत असल्याचे अनेक प्रसंग आहेत. याठिकाणी कारखाना बंद अवस्थेत असल्याने स्थानिक नागरिकांची जनावरे या ठिकाणी वावरत असतात. त्याचा त्रास जनावरे आणि नागरिकांना होऊ शकतो. याबाबत महाराष्ट्र प्रदूषण मंडळाने लक्ष देणे गरजेचे आहे. या बंद कंपनीत भंगार व्यावसायिक भंगार तोडण्याचे असुरक्षित काम करत आहेत. या कामगारांकडे कोणतीच सुरक्षा साधने दिसून येत नसल्याने कामगार सुरक्षा विभागाकडून संबंधितांवर कडक कारवाई करण्याची मागणी होत आहे.

### धुरामुळे गावातील वातावरण भयभीत

## पोलीस यंत्रणेवर विश्वास: संतोष जंगम

| खोपोली | प्रतिनिधी |

बनावट कागदपत्रांच्या आधारे शालार्थ प्राप्त शासनाच्या अनुदानातून चक्क सव्वा कोटी रुपयांचा आर्थिक आफरातफर प्रकार केटीएसपी मंडळाच्या काही संस्था चालक आणि प्राचार्य, प्राध्यापकांनी केल्याची चर्चा आहे. तसे नसून जिल्ह्यातील काही संस्थेतील शिक्षकांसह आपल्या संस्थेतील शिक्षिका असून त्यांच्यावर कारवाई झाली आहे. त्यांच्या खात्यात जमा झालेली वेतन स्वरूपातील रक्कम शासन जमा करून घेणार आहे. शासनाकडून शालार्थ आयडीबाबत चौकशीचे काम सुरु आहे. पोलीस यंत्रणा त्यांच्या पद्धतीने या प्रकरणाचा योग्य तपास करीत आहे. पोलीस यंत्रणा आणि न्याय संस्थेवर विश्वास असल्याचे केटीएसपी संस्थेचे अध्यक्ष संतोष जंगम यांनी प्रसिद्धी पत्राकातून म्हटले आहे.

## हुतात्मा स्मारकाला भंगाराचा वेढा

| नेरळ | प्रतिनिधी |

माथेरान शहरातील क्रांतिकारक भाई कोतवाल हे देशासाठी हुतात्मा झाल्याने महाराष्ट्र शासनाने त्यांचे उचित स्मारक माथेरान येथे बांधले आहे. दरम्यान, याच माथेरान शहराच्या दर्शनी भागात असलेल्या हुतात्मा भाई कोतवाल स्मारक परिसराला टाकाऊ वस्तूंनी गराडा घातला आहे. याबाबत गिरीश पवार यांनी संताप व्यक्त केला आहे.

१९४२च्या लढ्यात माथेरान शहरातील २० हून अधिक तरुणांनी महात्मा गांधी यांनी पुकारलेल्या 'चले जाव' आंदोलनात सहभाग नोंदवला होता. देशाच्या या स्वातंत्र्य लढ्यात २ जानेवारी १९४३ रोजी हौतात्म्य पत्करणारे भाई कोतवाल यांचे उचित स्मारक राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री बॅ.ए.आर. अंतुले यांच्या माध्यमातून १९८४ मध्ये उभे राहिले. या स्मारकात हुतात्मा भाई कोतवाल यांची जयंती



१ डिसेंबर तर त्यांचा बलिदान दिन २ जानेवारी रोजी साजरा केला जातो. या स्मारकाचे पावित्र्य राखण्याचे कार्य माथेरानमधील राज्यकर्त्यांनी सातत्याने ठेवले आहे. परंतु, मागील दोन वर्षे माथेरान शहरात असलेल्या प्रशासक राजवटीत याच हुतात्मा स्मारक परिसराला डम्पिंग ग्राउंड आणि गोदाम केले गेले. माथेरानमधील जनतेचे स्फूर्तिस्थान असलेल्या हुतात्मा स्मारक परिसरात टाकण्यात आलेल्या आणि साठवून ठेवलेल्या टाकावू वस्तू यामुळे या वास्तूचे पावित्र्य नष्ट झाल्याची भावना निर्माण झाली आहे. तेथे नगरपरिषद कडून वापरलेल्या वस्तू अस्ताव्यस्त टाकण्यात आल्या असून माथेरान नगरपरिषदेच्या पर्यावरण पुरक इ-रिक्षा देखील गेले वर्षभर उभ्या करून ठेवल्या आहेत. त्याचवेळी या वस्तू कोणतेही नियोजन नाही अशा प्रकारे कुठेही जागा उपलब्ध आहे तेथे टाकण्यात आल्याने हुतात्मा स्मारक परिसर टाकावू वस्तूंचे डंपिंग ग्राउंड बनले आहे. याबाबत माथेरान स्वातंत्र्यसैनिक धोंडू पवार यांचे पुत्र गिरीश पवार यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

# गुटखा माफियांना मोकळे रान

## जिल्ह्यामध्ये सर्रास विक्री; प्रशासनाच्या कारवाईवर प्रश्नचिन्ह

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

राज्यात २०१२ पासून गुटखा विक्रीवर बंदी असतानाही पनवेल आणि उरण तालुक्यात गुटख्याची खुलेआम विक्री सुरू असल्याचे धक्कादायक चित्र समोर येत आहे. अलीकडे पनवेल तालुक्यातील आजिवली गावात पोलिसांनी केलेल्या कारवाईत सुमारे सव्वा लाख रुपयांचा गुटखा साठा जप्त करण्यात आला. मात्र ही कारवाई अपवादात्मक ठरत असून, रोजच्या विक्रीवर कोणताही प्रभाव पडत नसल्याची चर्चा परिसरात रंगली आहे.

शाळा, महाविद्यालये, बसस्थानके आणि गजबजलेल्या चौकांमधील टपऱ्या व किराणा दुकानांत गुटखा सहज उपलब्ध होत असल्याचे नागरिक सांगतात. बंदीमुळे विक्री लपूनछपून होत असली तरी ती पूर्णपणे थांबलेली नाही. उलट पाच रुपयांची पुडी दहा रुपयांना, तर वीस रुपयांची पुडी पंचवीस ते तीस रुपयांपर्यंत विकली जात असल्याचे ग्राहकांचे म्हणणे आहे. वाढीव दर असूनही मागणी कायम असल्याने या अवैध व्यवसायाला खतपाणी मिळत असल्याचे चित्र आहे.



### आरोग्य व स्वच्छतेचा गंभीर प्रश्न

**गुटखा सेवनामुळे तोंडाच्या कर्करोगासारख्या गंभीर आजारांचा धोका वाढतो, याबाबत वैद्यकीय तज्ज्ञ सातत्याने इशारा देत आहेत. तरीही विक्री थांबत नसल्याने तरुण पिढी धोक्यात येत असल्याची चिंता व्यक्त केली जात आहे. सार्वजनिक ठिकाणी थुंकण्याच्या प्रकारांमुळे रस्ते, शासकीय कार्यालय परिसर आणि सार्वजनिक ठिकाणे अस्वच्छ होत आहेत. गुटखा बंदीची प्रभावी अंमलबजावणी करून पुरवठा साखळीवर कठोर कारवाई करण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे. अन्यथा बंदी हा शब्द केवळ कागदापुरताच उरेल, अशी भीती व्यक्त केली जात आहे.**

### परराज्यातून पुरवठ्याची साखळी?

**स्थानिकांच्या मते, काही व्यापारी परराज्यातून गुटखा चोरट्या मार्गाने आणतात. महामार्गालगतच्या गोदामांत साठवणूक करून रात्रीच्या वेळी किरकोळ विक्रेत्यांकडे माल पोहोचवला जातो. ग्रामीण भागातही ही साखळी सक्रिय असल्याची माहिती पुढे येत आहे. मोठ्या पुरवठादारांपर्यंत कारवाई पोहोचत नसल्यामुळे किरकोळ विक्रेत्यांवरच कारवाई होते, अशी टीका होत आहे.**

### प्रशासनावर प्रश्नचिन्ह

**गुटखा विक्रीवर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी फूड अँड ड्रग अ‍ॅडमिनिस्ट्रेशन महाराष्ट्र (अन्न व औषध प्रशासन) यांच्याकडे आहे. विभागाकडून वेळोवेळी छापे टाकले जात असल्याचे सांगितले जाते; मात्र त्याचा परिणाम दीर्घकाळ दिसत नाही. मोठे मासे सुटतात, छोटे अडकतात, अशी संतप्त प्रतिक्रिया काही नागरिकांनी दिली.**

### पोलिसांची भूमिका काय?

**काही ठिकाणी तक्रार केल्यास ही बाब अन्न व औषध प्रशासनाच्या अखत्यारीत येते, असे सांगितले जाते. त्यामुळे जबाबदारीची ढकलाढकली होत असल्याचा आरोप आहे. संबंधित विभागांची अधिकृत भूमिका अद्याप स्पष्ट झालेली नाही.**

# कर्जत पोलिसांकडून दुचाकी चोरांना बेड्या

## ●नऊ गुन्हे उघडकीस●गुन्हे प्रकटीकरण पथकाचे कौतुक

**। कर्जत / नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत शहरातून ११ फेब्रुवारी रोजी चोरीला गेलेल्या दुचाकीचा तपास करणाऱ्या कर्जत पोलीस ठाण्याच्या टीमने मोठे रॅकेट उघडकीस आणले आहे. कर्जत पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाने दुचाकी चोरांना जेरबंद करीत त्यांना बेड्या ठोकल्या आहेत. दरम्यान,या दुचाकी चोरांनी चोरलेल्या नऊ दुचाकी यांचे गुन्हे उघडकीस आले आहेत.

कर्जत शहरातील जुनी नगरपरिषद कार्यालय येथून दुचाकी चोरीला गेली होती. सदर दुचाकीचा दुचाकी मालकाने शोध घेतला आणि त्यानंतर १५ फेब्रुवारी रोजी कर्जत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला. कर्जत पोलीस ठाण्याच्या पथकाने तांत्रिक माहिती, गुप्तहेर आणि सीसीटीव्ही यांच्या आधारे दुचाकी चोरांपर्यंत पोहोचून मुरबाड येथून या दुचाकी चोरांच्या मुसक्या आवळल्या. या दुचाकी चोरांमध्ये चार तरुण असून त्यातील एक मुख्य



सूत्रधार हा मुरबाड तालुक्यातील देवगाव येथील रहिवाशी आहे. नरेश नारायण कराळे हा तरुण मुरबाड पोलिस ठाण्याच्या फरार आरोपी पैकी एक असून त्याच्या वर मुरबाड पोलिस ठाणे येथे तीन आणि शहापूर तालुक्यातील किन्हवली पोलिस स्टेशन हद्दीत एक असे चार गुन्हे दाखल आहेत. त्याचवेळी या तरुणावर खुनाचा गुन्हा देखील दाखल आहे.

ठाणे जिल्ह्यातील पोलिसांच्या फरार यादीमध्ये आरोपी नरेश कराळे याला पकडण्यात आल्यानंतर दुचाकी चोरांचे रॅकेट उद्‌ध्वस्त केले. पोलिसांच्या पथकाने प्रदीप चंद्रकांत कडू राहणार साळोख, अरविंद राजू स्वामी राहणार जांभिवली,सचिन भानुदास भगत राहणार कुंडलज अशा तिघांना ताब्यात घेतले आहे.या सर्व दुचाकी चोर आरोपींना कर्जत पोलिसांनी न्यायालयात हजर केले असता पोलिस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत.या दुचाकी चोरांकडून कर्जत पोलिसांनी कर्जत पोलीस ठाणे येथे दाखल असलेल्या तीन दुचाकी चोरीचे गुन्हे उघड केले आहेत.त्याचवेळी या चोरट्यांनी ठाणे जिल्ह्यातील आणखी सहा गुन्हे उघडकीस आणले आहेत.

# निवडक



## पाटणेश्वर येथे अज्ञातांनी केली चोरी

**पेण :** श्री क्षेत्र पाटणेश्वर येथील विनायक म्हात्रे यांच्या घरी काल रात्री चोरी झाली असून याबाबत पेण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. दिनेश मनिराम म्हात्रे यांचा छोटा भाऊ विनायक मनिराम म्हात्रे हे बंगलुर येथे कामानिमित्त कुटुंबासमवेत राहतात. त्यामुळे त्यांच्या घराला कुलूप लावलेले असते. विनायक यांची आई सुरेखा म्हात्रे या रोज घरात दिवाबत्ती करून पाटणोली येथील राहत्या घरी परत जातात. रोजच्या प्रमाणे कालही सायंकाळी सातच्या सुमारास दिवाबत्ती करून घरी गेल्या. मात्र रोजच्या प्रमाणे आज सकाळी घरी आल्या असता त्यांना घराची कडी तोडलेल्या अवस्थेत आढळली. तर कुलूप तुळशी वृंदावनाच्या जवळ टाकलेले दिसले. घरातील दोन कपाट फोडून सामान अस्ताव्यस्थ असल्याचे चित्र दिसून आले. त्यांनी तातडीने पेण पोलीस ठाण्यात कळवले. पेण पोलीस ठाण्याचे गुन्हा प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी पोहोचले. काही वेळाने पेण पोलीस ठाण्याचे पोलीस निरिक्षक संदिप बागूल यांनी ही घटनास्थळाची पाहणी करून तातडीने फॉरेनसीक टिमला प्राचारण केले. प्रथमदर्शनी या चोरीमध्ये दिड लाख रुपये आणि सोन्याच्या कानातल्या रिंगा गेल्याचे निर्दशनास आले आहे. पेण पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल केला आहे.

## लोहोप आरोग्य केंद्रात रक्तदान शिबीर

**रसायनी :** हिंदूंचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्ताने प्रथम त्यांस पुष्पहार अर्पण व शिव गर्जना करून या रक्तदान शिबिराची सुरुवात करण्यात आली. रसायनी पाताळगंगा परिसरातील प्राथमिक आरोग्य केंद्र लोहोप येथे एमजीएम कामोठे येथील हॉस्पिटलचा तज्ञ स्टाफ उपस्थित होते. आपल्या रक्तामुळे अनेकांचे प्राण वाचले जात असतात. हे उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेवून हा उपक्रम हाती घेण्यांत आला. यावेळी या परिसरातील सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, आशावर्कर तसेच वैद्यकीय कर्मचारी यांनी रक्तदान केले. सर्वात मोठे दान म्हणून रक्तदान यांस संबोधले जाते. आपण ते निर्माण करू शकत नाही. यामुळे, आजच्या तरुण वर्गास यांचे महत्व समजले असून, रक्तदान करण्यासाठी पुढे सरसावत आहे. आपण सर्व काही निर्माण करू शकतो. मात्र रक्त निर्माण करू शकत नाही हे शाश्वत आहे. त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्ताने रक्तदान शिबिराचा कार्यक्रमात हाती घेण्यात आला. या कार्यक्रमासाठी वासांबे सरपंच उमा मुंढे, विलास पाटील, डॉ. उलचिल, समाजसेवक अरविंद पाटील, अतुल मालकर, महिला बचत गट अध्यक्ष कमल जाधव,वैद्यकीय अधिकारी मंगेश देशमुख, समुदाय आरोग्य अधिकारी नयन परब, आरोग्य सहायक गजानन बडदडे व धर्मा भस्मा, आरोग्य सहायिका मीना खरात, फार्मेसी अधिकारी सोनाली गाढे, प्रयोगशाळा अधिकारी समीकेश पाखरे, तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र लोहोप अंतर्गत आरोग्य सेवक सेविका, इतर कर्मचारी व आशावर्कर व कर्मचारी उपस्थित होते.

# रिलायन्स प्रकल्पग्रस्तांच्या लढ्याला यश

## कायमस्वरूपी नोकरीत घेणार

**। नागोठणे । प्रतिनिधी ।**

आयपीसीएल प्रकल्पासाठी हजारो एकर जमिनी संपादित केल्याने भूमिहीन होऊनही नोकरी पासून वंचित राहिलेल्या सुमारे ३२४ प्रकल्पग्रस्तांना नोकरीत सामावून घेण्याचा धोरणात्मक निर्णय मंत्रालयात १७ फेब्रुवारी रोजी झालेल्या बैठकीत घेण्यात आला आहे. त्यामुळे मुंबई येथील आझाद मैदान येथे १७ ऑक्टोबर पासून भूमिपुत्र प्रकल्पग्रस्त सामाजिक संस्था, नागोठणे यांच्या माध्यमातून सुरू असलेल्या सुमारे १३२ दिवसांच्या भूमिपुत्र प्रकल्पग्रस्तांच्या लढ्याला अखेर यश आले आहे.

भारत सरकारचा उपक्रम असलेला नागोठण्यातील इंडियन पेट्रोल केमिकल्स कॉर्पोरेशन लिमिटेडचा नागोठणे मॅन्युफॅक्चरिंग डिव्हिजन हा महाकाय प्रकल्प देशातील मोठा उद्योग समूह असलेल्या अंबानी समूहाच्या रिलायन्स कंपनीने काही वर्षांपूर्वी खरेदी केला. मात्र यामुळे भूमिहीन झालेले उर्वरित ३२४ प्रकल्पग्रस्त प्राधान्य प्रमाणपत्र धारक यांना नोकरीत सामावून घेण्यास रिलायन्सच्या व्यवस्थापनाने गेली अनेक वर्षे टाळाटाळच केली. यासाठी प्रकल्पग्रस्तांनी भूमिपुत्र प्रकल्पग्रस्त सामाजिक संस्था, नागोठणे या संस्थेच्या माध्यमातून आपला लढा सुरू ठेवला. रिलायन्स व्यवस्थापन तसेच शासन दरबारी अनेक वेळा पत्रव्यवहार करूनही, निवेदने देऊनही तसेच वेळोवेळी बैठका घेऊन व विविध आंदोलने करूनही प्रकल्पग्रस्तांना नोकरीत सामावून न घेता वेळोवेळी प्रकल्पग्रस्तांची केवळ आश्वासनांवरच बोळवण केली गेली.

आपल्या पदरात केवळ आश्वासनेच मिळत असल्याची खात्री झाल्याने प्रकल्पग्रस्तांनी मुंबई येथील आझाद मैदानात उपोषण करण्याचा निर्णय घेतला. तसा पत्र व्यवहारही सर्व शासकीय यंत्रणांकडे करण्यात आला, असे असूनही प्रकल्पग्रस्तांची कोणतीही दखल घेण्यात आली नाही शेवटी प्रकल्पग्रस्तांनी आपले उपोषणाचे हत्यार उपसले आणि आझाद मैदान येथे उपोषण सुरू केले. सर्व प्रकल्पग्रस्तांनी शेवटपर्यंत हिम्मत न हरल्यानेच आमच्या या लढ्याची दखल घेण्यात आल्याने मंत्रालयात घेण्यात आलेल्या बैठकीत प्रदीर्घ चर्चा होऊन प्रकल्पग्रस्तांना पेरोलवर नोकरीत सामावून घेण्याचा निर्णय घेण्यात आल्याने आमच्या या लढ्याला यश आल्याचे भूमिपुत्र प्रकल्पग्रस्त सामाजिक संस्थेचे अध्यक्ष गंगाराम मिणमिण व उपाध्यक्ष रोशन जांबेकर यांनी सांगितले.

# ‘क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले’ भव्य सभागृह उभारण्याची मागणी

**। पनवेल । वार्ताहर ।**

क्रांतिज्योत महिला विकास फाउंडेशनतर्फे पनवेल शहरात क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले यांच्या नावाने भव्य सभागृह व भवन उभारण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली आहे. याबाबतचे निवेदन उपायुक्त कैलास गावडे यांना सादर करण्यात आले.

शिक्षणासाठी आयुष्य वेचणाऱ्या सावित्रीबाई फुले यांचे पनवेल शहरात अद्याप कोणतेही सभागृह किंवा स्मारक भवन उभारण्यात आलेले नाही. शिक्षण प्रसारासाठी ज्योतिराव आणि सावित्रीबाई फुले यांनी केलेले कार्य समाजासाठी प्रेरणादायी आहे. दलित, शोषित आणि वंचित घटकांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी त्यांनी मोठा संघर्ष केला. या महान समाजसुधारकांच्या सन्मानार्थ पनवेलमध्ये महापालिकेने योग्य भूखंड निश्चित करून ठराव मंजूर करावा आणि त्यांच्या नावाने भव्य सभागृह उभारावे, अशी संस्थेची मागणी आहे. सदर अर्जाची दखल घेऊन यावर तात्काळ सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी विनंती संस्थेच्या वतीने करण्यात आली.

# सव्वा लाख रुपयांचा गुटखा हस्तगत



**। पनवेल । प्रतिनिधी ।**

आजिवली गाव परिसरात एका किराणा विक्री करणाऱ्या दुकानात व गोदमात पनवेल तालुका पोलिसांच्या पथकाने टाकलेल्या छाप्यात जवळपास सव्वा लाख रुपये किमतीचा गुटख्याचा साठा हस्तगत केला असून एकाला ताब्यात घेण्यात आले आहे.

आजिवली गाव येथील एका दुकानात तसेच गोदामात गुटख्याचा साठा करून त्याची विक्री आरोपी रामसौदागर भगत हा करत असल्याची गोपनीय माहिती मिळताच त्छापा टाकून त्यांच्या कडून जवळपास सव्वा लाख रुपयांचाविमल पान मसाला हस्तगत केला आहे.

# विवाहिता बेपत्ता

**पनवेल :** रीटघर, मोरबे येथून एक विवाहित महिला बेपत्ता झाल्याने ती हरवल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. सोनाली विनोद पाटील असे या महिलेचे नाव असून ती अंगाने सडपातळ, उंची ५ फुट १ इंच, रंग गोरा, नाक सरळ, केस काळे व लांब, डोळे काळे, हिंदी व मराठी बोलते अंगात जाभळ्या रंगाची सारी, पायात चॉकलेटी रंगाची चप्पल आहे. या महिलेबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल तालुका पोलीस ठाणे क्र. ८९७५८०९४१० किंवा पोहवा होलगीर यांच्याशी संपर्क साधावा .

# उज्ज्वलमार्फत आरोग्य शिबीर

## मुरूड तालुक्यातील काशीदमध्ये शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

ग्रामीण भागातील रुग्णांना थेट घरपोच आरोग्य सेवा मिळावी, यासाठी उज्ज्वल जनसेवा कल्याण या सामाजिक संस्थेने पुढाकार घेतला आहे. मुरूडमधील काशीद येथील हनुमान मंदिराच्या सभागृहात उज्ज्वल संस्थेच्या माध्यमातून नुकताच आरोग्य शिबीर घेण्यात आला. या शिबीराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

डॉ.देवेंद्र खरे यांच्या पुढाकाराने घेण्यात आलेल्या शिबीरामध्ये



मोठ्या संख्येने नागरिकांनी सहभाग घेतला. सामान्य आरोग्य तपासणीसह रक्तदाब, मधुमेह तपासणी करून रुग्णांना मार्गदर्शन करण्यात आले. त्यानंतर त्यांना मोफत औषधांचे वितरण करण्यात आले. गरजू आणि ग्रामीण भागातील लोकांना आरोग्यसंबंधित सुविधा उपलब्ध करून देण्याचा उद्देश समोर ठेवून ही संस्था काम करीत आहे.

सामाजिक बांधिलकी जपत हा उपक्रम संस्थेने हाती घेतला. या उपक्रमात सहभागी होणाऱ्या नागरिकांना उज्वल जनसेवा संस्थेचे डॉ. सतीशचंद्र कीर, डॉ. देवेंद्र खरे, डॉ. अदिती कीर आणि डॉ. दायना यांनी मार्गदर्शन केले. शिबीराच्या माध्यमातून घरापर्यंत आरोग्य सेवा पोहोचल्याने अनेकांनी समाधान व्यक्त केले.

# विमानतळ नामकरण मागणीसाठी मुंबईत सोमवारी धरणे

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सुरू होऊन पाच महिने झाले असूनही विमानतळाला माजी खासदार दि. बा. पाटील यांचे नाव जाहीर करण्यात आलेले नाही. याच नामकरणाच्या मागणीसाठी सोमवारी सर्वपक्षीय नामकरण समिती मुंबईत आझाद मैदानात धरणे आंदोलन करण्यात असल्याची माहिती समितीचे अध्यक्ष दशरथ पाटील यांनी दिली.

नवी मुंबईतील आंतरराष्ट्रीय विमानतळाला माजी दि. बा. पाटील यांचे नाव द्यावे, या मागणीसाठी मुंबई, नवी मुंबई, ठाणे, रायगड, पालघर, नाशिक आदी जिल्ह्यांतील लाखो भूमिपूत्र प्रकल्पग्रस्त गेली पाच वर्षे आंदोलने केली. तसेच सिडकोला लाखोंच्या संख्येने घेराव घातला होता.

या सर्व आंदोलनाची दखल घेऊन राज्य सरकारने विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात दि. बा. पाटील यांचे नाव नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला देण्याचा ठराव मंजूर केला व तो राज्य सरकारने पुढील कार्यवाहीसाठी केंद्र सरकारकडे पाठवून दिला. पण आज तीन वर्षे होऊनही केंद्र सरकारने त्यावर निर्णय घेतला नाही.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ८ ऑक्टोबर रोजी विमानतळाचे उद्घाटन केले. त्यानंतर २५ डिसेंबर २०२५ रोजी या विमानतळावरून प्रवाशी वाहतूक सुरू झाली आहे. पण अजूनही केंद्र सरकारने या विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव दिले नाही. केंद्राच्या या दिरंगाईमुळे लाखो भूमिपुत्र प्रकल्पग्रस्तांच्या मनात असंतोष निर्माण झाला आहे.

या असंतोषाचा कधी भडका उडेल व त्यातून प्रचंड मोठे आंदोलन उभे राहिल, याची वाट न पाहता केंद्र सरकारने या विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव द्यावे. या प्रश्नाचा विचारविनिमय करून पुढील आंदोलनाची दिशा ठरविण्यासाठी दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ नामकरण सर्वपक्षीय कृती समितीने २३ फेब्रुवारीला ठिय्या आंदोलन करण्याचा ठराव करण्यात आला.

> **“भूमिपुत्र प्रकल्पग्रस्तांच्या असंतोषाला वाचा फोडून केंद्र सरकारचे या प्रश्नाकडे लक्ष वेधून घेण्यासाठी येत्या सामवारी २३ फेब्रुवारीपासून मुंबईत आझाद मैदानात हजारो भूमिपुत्र प्रकल्पग्रस्तांचे ठिय्या आंदोलन सुरू करण्यात येणार आहे.**
> **–दशरथ पाटील, अध्यक्ष, सर्वपक्षीय कृती समिती”**

# गांजा विक्रीसाठी बाळगणाऱ्या महिलेवर कारवाई

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

बेकायदेशीररित्या गांजा जवळ बाळगून त्याची विक्री केल्याप्रकरणी एका महिलेला पनवेल तालुका पोलिसांनी ताब्यात घेवून तिच्याकडून जवळपास ९ हजार रुपये किंमतीचा गांजा हस्तगत केला आहे.

तालुक्यातील अजिवली गाव परिसरात असलेल्या एका हॉटेलमध्ये तसेच किराणा दुकानात एक महिला बेकायदेशीरित्या गांजा विक्रीसाठी ठेवत असल्याची माहिती वपोनि गजानन घाडगे यांना मिळताच त्यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक आनंद कांबळे, सपोनि अनिरुद्ध गिजे, पो.उपनिरीक्षक हर्षल राजपूत, अभिजीत व्हरांबळे, पो.हवा. दीपक शेळके, पोहवा देवरे, धुमाळ, कुदळे, तांडेल, बाबर, म्हारसे, पवार, मपोहवा रोडगे, पोहवा पाटील, पोशि भगत आदींच्या पथकाने सदर ठिकाणी छापा टाकून सदर महिलेला ताब्यात घेवून त्या ठिकाणावरुन जवळपास ९ हजार रुपये किंमतीचा गांजा हस्तगत केला आहे व तिच्या विरोधात एनडीपीएस कायदा कलम ८ (क), २० (ब), २२ अन्वये कारवाई केली आहे.

## बाल व्यापाऱ्यांनी जिंकली मने | व्यवहारीक ज्ञानाचे गिरवले धडे

# विद्यार्थांनी भरवला आठवडा बाजार

**। गडब । वार्ताहर ।**

पेण तालुक्यातील संस्कार शिक्षण संस्था संचालित संस्कार विद्यालय गडब या शाळेने विद्यार्थाचे आठवडा बाजाराचे आयोजन शाळेत करण्यात आले होते.

विद्यार्थाना व्यवहारज्ञान, नफा, तोटा, व गणितिय ज्ञान यांची संकल्पना दृढ होण्यासाठी विद्यार्थांनी आणलेल्या वस्तुच्या विक्रीचे आठवडा बाजार उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. गडब येथील संस्कार विद्यालयात विद्यार्थांनी वस्तुची दुकाने मांडुन वस्तुची विक्री केली. यामध्ये भाज्या, फळे, स्टेशनरी, खेळंणी, किराणा माळ,खाद्यपदार्थ आदि प्रकारच्या दुकाने उभारण्यात आली होती.




या बाजाराला नवनिर्वाचित जिल्हापरिषद सदस्या पल्लवी भोईर, पंचायत समिती सदस्या प्रिती पाटील, शेतकरी कामगार पक्षाचे नेते माजी अर्थ व बांधकाम सभापती रायगड जिल्हापरिषद संजय जांभळे, माजी प्रचार्य के.पी. पाटील, पी. वाय. पाटील, गणेश तांडेळ, वैभव म्हात्रे, संजय चवरकर, उपाध्यक्ष प्रथमेश मोकल, संदिप म्हात्रे, सहसचिव दिनेश म्हात्रे, संस्थेचे खजिनदार विश्वनाथ पाटील, मुख्याध्यापक चिंतामणी मोकल आदिसह विद्यार्थाचे पालक परिसरातील नागरिकांनी भेट देवुन विद्यार्थाकडुन वस्तुची खरेदी करुन विद्यार्थाना प्रोत्साहित केले. विद्यार्थाना व्यवहारीक ज्ञान व्हावे, व बाजारातील वस्तुची किमंत कळावी, व्यवसाययाची माहिती मिळावी, खरेदी विक्रीचे व्यवहार समजावेत, फायदा तोटा यांची प्रत्यक्ष माहिती मिळांवी व्यवहारीक संवाद कसे करावेत यासाठी आठवडा बाजार उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

येथील विद्यार्थामधे गुणवत्ता आहे, त्यांच्या गुणवत्तेला वाव मिळाला पाहीजे,या विभागातील विद्यार्थी पुढे गेले पाहीजेत संस्कार शाळेने राबविलेला आठवडा बाजाराच्या या उपक्रमामुळे विद्यार्थाच्या व्यवहारीक ज्ञानात भर पडणार आसल्याचे जिल्हापरिषद सदस्या पल्लवी भोईर यांनी या वेळी सांगितले.या विभागाला नेतुत्व नव्हते पल्लवी भोईर, प्रिती पाटील यांचे नेतुत्व या विभागाला मिळाले आहे. आठवडा बाजार संकल्पना संस्कार शाळेने राबविली आहे ही चांगली गोष्ट आहे. पालकांनी व शाळेने या विद्यार्थावर चांगले संस्कार केले. यातुनच या आठवडा बाजाराची निर्मिती झाली असल्याचे संजय जांभळे यांनी सांगितले.

श्रीमती सुलोचना दत्तात्रेय खोत
रा. मापगाव, ता. अलिबाग

95 व्या वाढदिवसाच्या शुभेच्छा
शुभेच्छुक
खोत, राऊत कुटुंबिय

# चौथी, सातवी शिष्यवृत्ती परीक्षा नोंदणीबाबत शाळांना तंबी

**। रायगड । प्रतिनिधी ।**

राज्य परीक्षा परिषदेतर्फे यंदा पाचवी आणि आठवी या इयत्तांसह चौथी आणि सातवीच्या विद्यार्थ्यांसाठीही शिष्यवृत्ती परीक्षा घेतली जाणार आहे. मात्र, चौथी आणि सातवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेसाठी अनेक शाळांनी नोंदणी केलेली नाही, विद्यार्थ्यांचे अर्जही भरले नसल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे आढावा बैठकीमध्ये चौथी आणि सातवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेसाठीच्या विद्यार्थी संख्येबाबत शालेय शिक्षणमंत्री, शिक्षण आयुक्तांनी नाराजी व्यक्त केली.

या पार्श्वभूमीवर, राज्य परीक्षा परिषदेचे अध्यक्ष डॉ. नंदकुमार बेडसे यांनी शाळांना नोंदणी वाढविण्याच्या सूचना परिपत्रकाद्वारे दिल्या आहेत. त्यात म्हटले आहे, प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा, उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा या परीक्षांसाठी अधिकाधिक विद्यार्थ्यांना सहभागी करून घेण्यासाठी जिल्हा स्तरावरून विशेष प्रयत्न होणे अत्यावश्यक आहे.

परीक्षेसाठी विद्यार्थ्यांच्या अर्जांचा आढावा घेतला असता, अनेक जिल्ह्यांमध्ये स्थिती उदासीन असल्याचे प्रथमदर्शनी दिसून आले आहे. सरल संकेतस्थळानुसार नोंद असलेल्या शाळांपैकी अनेक शाळांनी सदर परीक्षेकरिता नोंदणी केलेली नाही किंवा विद्यार्थी आवेदनपत्रही भरलेले नाही. त्यामुळे शाळा नोंदणी, विद्यार्थ्यांचे अर्ज भरण्याबाबत शाळांचे उद्बोधन होणे आवश्यक आहे. आढावा बैठकीमध्ये चौथी आणि सातवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेसाठीच्या विद्यार्थिसंख्येबाबत शालेय शिक्षणमंत्री, शिक्षण आयुक्तांनी नाराजी व्यक्त केली आहे. शासन धोरणाच्या अनुषंगाने जिल्हा परिषद, महापालिकांच्या शाळांतील १०० टक्के विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती परीक्षेसाठी अर्ज भरण्याबाबतच्या लेखी सूचना द्याव्यात, असेही परिपत्रकात नमूद केले आहे.

राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये २६ एप्रिल रोजी शिष्यवृत्ती परीक्षा घेतली जाणार आहे. परीक्षेचे अर्ज भरण्यासाठी ३० डिसेंबर ते १३ फेब्रुवारी या कालावधीत विद्यार्थ्यांचे अर्ज भरण्यासाठीची मुदत देण्यात आली होती. तसेच नियमित शुल्कासह अर्ज भरण्यासाठी २८ फेब्रुवारीपर्यंत परीक्षा परिषदेने मुदतवाढ दिली आहे.

### अशी आहे शिष्यवृत्ती योजना

राज्यातील प्रज्ञावान विद्यार्थ्यांचा शोध घेऊन त्यांना प्रोत्साहनपर शिष्यवृत्ती देण्याची योजना महाराष्ट्र राज्य शासनाने सन १९५४-५५ मध्ये सुरू केली. विद्यार्थिदशेतच स्पर्धा परीक्षेची पायाभरणी करणाऱ्या या स्पर्धेचे शालेय स्तरावर विशेष महत्त्व आहे. त्यानुसार इयत्ता चौथी आणि सातवीच्या विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती परीक्षा घेतली जात होती. गेली काही वर्षे ही परीक्षा इयत्ता पाचवी, आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी घेण्यात येत होती. मात्र, यंदापासून ही परीक्षा इयत्ता चौथी आणि सातवीच्या विद्यार्थ्यांसाठीही आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

### शिक्षकांच्या कामाचे मूल्यांकन

शिष्यवृत्ती परीक्षा सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांना बंधनकारक आहे. या परीक्षेच्या आधारे सर्व शासकीय शाळांतील शिक्षकांचे मूल्यांकन करून त्याची नोंद शिक्षकांच्या सेवा पुस्तकात,गोपनीय अहवालात करण्यात येणार असल्याची तंबी देण्यात आली आहे.

## सराईत मोबाईल चोरटा गजाआड

**पनवेल** : पनवेल शहर परिसरात मोबाईल चोरी करणाऱ्या एका सराईत गुन्हेगारा पनवेल शहर पोलिसांनी ताब्यात घेवून त्याच्याकडून मोबाईल चोरीचे ४ गुन्हे उघडकीस आणले आहेत. गेल्या काही दिवसापासून पनवेल बस स्थानक परिसरात प्रवाशांचे मोबाईल चोरीस जाण्याचे प्रमाण वाढले होते. त्यासंदर्भात वपोनि नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि प्रविण फडतरे, पोहवा संदेश म्हात्रे, तुषार बोरसे, अमोल पाटील, मिथुन भोसले, विशाल दुधे, सचिन कोर, किरण कराड आदींच्या पथकाने गुप्तबातमीदार व तांत्रिक तपासाच्या आधारे आरोपी कलीम शेख, या सराईत मोबाईल चोरट्यास ताब्यात घेतले असता त्याच्याकडून या परिसरात त्याने चोरलेले ४ मोबाईल हस्तगत करण्यात आले आहेत. त्याच्या अटकेमुळे मोबाईल चोरीचे गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

## शाळा डिंगणवाडीत रौप्य महोत्सव सोहळा जल्लोषात



**। डिंगणवाडी । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा डिंगणवाडी येथे शाळेचा रौप्य महोत्सव सोहळा अतिशय जल्लोषात, आनंदात आणि उत्साहात साजरा करण्यात आला.

शाळेला २५ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने हा सोहळा मोठ्या दिमाखात पार पडला. शाळेचे मुख्याध्यापक प्रतिक काशिनाथ गायकवाड यांच्या कल्पनेतून डिंगणवाडी ग्रामस्थ मंडळ व महिला मंडळ, डिंगणवाडी ग्रामविकास मंडळ मुंबई तसेच माजी विद्यार्थी यांच्या सहकार्याने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. गावातील सर्व स्तरातील नागरिक, माजी विद्यार्थी आणि शिक्षक यांची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली. या रौप्य महोत्सवानिमित्त माजी शिक्षक व माजी विद्यार्थी सत्कार समारंभ, महिलांसाठी खेळ पैठणीचा, पुरुषांसाठी खेळ कौशल्याचा, माजी विद्यार्थ्यांसाठी लकी ड्रॉ, शाळेतील विद्यार्थी व माजी विद्यार्थी यांचा सांस्कृतिक कार्यक्रम तसेच आदर्श विद्यार्थी पुरस्कार वितरण असे विविध उपक्रम आयोजित करण्यात आले होते. सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली.

कार्यक्रमाचे उद्घाटन रामचंद्र सकपाळ यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जिल्हा परिषद नवनिर्वाचित सदस्या उर्वशी वाडकर, उद्देश वाडकर, अमित गायकवाड, नरेश गायकवाड, अर्चना घाग, अतिश मोरे, अभिजीत भोईर, दिपक पाबरेकर, प्रसन्न घाग, निलम बेनारे व अझर मेमन आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. या सोहळ्यात माजी शिक्षिका मिताली मोरे, मनीषा पाबरेकर तसेच मिलिंद पेंडसे यांचा विशेष सत्कार करण्यात आला. मुख्याध्यापक प्रतिक गायकवाड यांनी ग्रामस्थ, माजी विद्यार्थी व शिक्षक यांना एकत्र आणून एकात्मता व सहयोगाची भावना वृद्धिंगत करण्याचा प्रयत्न केल्याचे सर्वांनी कौतुक केले.

## केटीएसपी मंडळाच्यावतीने विद्यार्थ्यांचे स्वागत

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना परीक्षा देताना ताणतणाव येऊ नये, म्हणून खालापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने जनता विद्यालय परिक्षा केंद्रावर परीक्षार्थी विद्यार्थ्यांना गुलाब पुष्प देऊन स्वागत करीत शुभेच्छा देण्यात आल्या.

केटीएसपी मंडळाच्या जनता विद्यालयात खोपोली शहरातील ५ ते ६ शाळांमधील ४६३ विद्यार्थी परीक्षेला बसले आहेत. विद्यार्थ्यांना परीक्षा देताना ताणतणाव येऊ नये म्हणून खालापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने परिक्षार्थी विद्यार्थ्यांना गुलाब पुष्प देवून स्वागत केले. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष संतोष जंगम, उपाध्यक्ष अबूबकर जळगांवकर, कार्यवाह किशोर पाटील, विस्तार अधिकारी शिल्पा दास, जनता विद्यालय व जुनिअर कॉलेजचे प्राचार्य के.एम.गोरे, डॉ. प्रा.विकास सुर्यवंशी, उप प्रचार्य एस.डी.महावरकर यांच्यासह शिक्षक उपस्थित होते. जनता विद्यालय परिक्षा केंद्रावर चांगल्या वातावरणात परिक्षा देता यावी यासाठी बोर्डाच्या नियमानुसार व्यवस्था केली आहे.

## पादुका पूजन उत्साहात संपन्न

**तळा** : तळा शहरातील जोगवाडी येथे श्री कान्होबा महाराज मंदिर प्राणप्रतिष्ठापना व पादुका पूजन सोहळा उत्साहात संपन्न झाला.यानिमित्ताने दोन दिवस विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. ज्यामध्ये ग्रामदेवता श्री चंडिका मंदिर ते जोगवाडी अशी कानिफनाथ महाराज्यांच्या मूर्ती व पादुकांची मिरवणूक काढण्यात आली होती.गणपती पूजन, पुण्यावाचन, मातृका पूजन, मूर्तीवर अभिषेक,जलाधीवास, मूर्ती धान्यधिवास, महाआरती तर काकड आरती, मूर्तीची प्राणप्रतिष्ठा, होमहवन, महाआरती, महाप्रसाद, भजन असे विविध कार्यक्रम पार पडले.

## डॉ.श्रीनिवास वाळिंबे यांचे निधन

**। पाताळगंगा । प्रतिनिधी ।**



लोकमान्य टिळक मोफत वाचनालय,चौक त्यांच्या विचारांतून व प्रेरणेने चौक व संपूर्ण पंचक्रोशी परिसरात वाचन संस्कृती जोपासली जावे असे परखडपणे सांगणारे लोकमान्य टिळक मोफत वाचनालय, चौक ज्येष्ठ कार्यकारिणी सदस्य, प्रतिष्ठित डॉक्टर कै. डॉ. श्रीनिवास वाळिंबे (काका) यांचे १७ फेब्रुवारी वयाच्या ८७ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला.

त्यांच्या अंत्यविधीस राजकीय, सामाजिक, शैक्षणिक,अश्या समाजातील मान्यवर उपस्थित होते. १९८० पासून त्यांनी चौक गावात वैद्यकीय सेवा सुरू केली. त्या काळात सुविधा मर्यादित होत्या परंतु त्यांची तत्परता, सेवाभाव आणि रुग्णांविषयीची आपुलकी, अमर्याद होती. त्यांच्या दवाखान्यात केवळ औषधोपचारच नव्हे, तर मायेचा शब्द आणि दिलासाही मिळत असे. गावकऱ्यांसाठी ते खऱ्या अर्थाने डॉक्टररूपी देव होते. रुग्णांची परिस्थिती, आर्थिक अडचण किंवा वेळ यांचा विचार न करता त्यांनी निस्वार्थपणे सेवा केली. त्यांच्या साधेपणात आणि कामात प्रामाणिकपणा अनेकांना पहावयास मिळाला.

## सह्याद्री वन्यजीव रक्षणार्थ संस्थेला पुरस्कार



**। कोलाड । प्रतिनिधी ।**

सह्याद्री वन्यजीव रक्षनार्थ सामाजिक संस्था ही अनेक वर्षांपासून निस्वार्थ भावनेने समाजकार्य करीत असुन यामध्ये रस्ते अपघातात जखमी झालेल्या अनेक व्यक्तींना तातडीने सुरक्षित आरोग्य केंद्रात पोहोचवणे, तसेच अपघातात अडकलेल्या नागरिकांची सुखरूप सुटका करणे या अत्यंत धाडसी कार्यात संस्थेने नेहमीच महत्वाची भूमिका बजावून अनेकांचे प्राण वाचवले आहेत.

या उल्लेखनिय कार्याची दखल घेत महामार्ग सुरक्षा पथक रायगड परिक्षेत्र यांच्या तर्फे सह्याद्री वन्यजीव रक्षणार्थ सामाजिक संस्थेला २०२६ या वर्षाचा रस्ता सुरक्षा अभियान पुरस्कार प्रदान करण्यात आला. शुक्रवारी (दि.२०) फेब्रुवारी रोजी महामार्ग सुरक्षा पथक रायगड परिक्षेत्र, महामार्ग पोलीस केंद्र पळस्पे नवी मुंबई येथे नुतीनिकरण प्रशासकीय कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले. या सोहळ्यानिमित्ताने सह्याद्री वन्यजीव रक्षनार्थ सामाजिक संस्थेला रस्ता सुरक्षा अभियान हा पुरस्कार प्रवीण साळूंखे, तानाजी चिखले, पुष्पलता दिघे यांच्या हस्ते प्रदान कारण्यात आला असुन हा पुरस्कार म्हणजे संपूर्ण टिमचा अथक परिश्रमाचा,धैर्यचा आणि सेवाभावाचा सन्मान आहे.

## त्रस्त प्रवासी वर्ग आगारप्रमुखांच्या भेटीला



**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

श्रीवर्धन आगाराचे कोलमडलेले वेळापत्रक आणि त्या अनुषंगाने प्रवासी वर्गाला होणारा मनस्ताप यातून सुटका होण्यासाठी अखेर श्रीवर्धन येथील प्रवासी वर्गाने आगारप्रमुख यांची भेट घेतली.

प्रवाशांसाठी आवश्यक बसेस सुरू कराव्यात तसेच अनावश्यक बसेस बंद करून काही बसेस च्या मार्गात बदल करावा, या बाबतीत भेट घेत निवेदन दिले.

श्रीवर्धन आगाराच्या श्रीवर्धन स्वारगेट लातूर आणि श्रीवर्धन स्वारगेट बीड या दोन्ही बसेस तोट्यात असून ही आगारात कार्यरत असणाऱ्या लातूर व बीड जिल्ह्यातील कर्मचारी वर्गासाठी या बसेस सुरू ठेवण्यात आल्या आहेत. तोट्यातील बससेवा बंद करून श्रीवर्धन तालुक्यातील प्रवासी वर्गासाठी सकाळ व दुपार श्रीवर्धन ते पुणे या मार्गावर बससेवा सुरू करण्यात यावी. अशी मागणी निवेदनाद्वारे केली आहे.

### व्यवस्थापनाचा हास्यास्पद निर्णय

श्रीवर्धन माणगाव, श्रीवर्धन महाड, श्रीवर्धन बागमांडला या ग्रामीण फेऱ्यांसाठी शिवशाही, स्लीपर कोच बसेस देण्यात येतात. सामान्य प्रवासी वर्गाला या बसेसचे तिकीट दर आवाक्याबाहेर जातात. अनेक कारणास्तव शिवशाहीमधील वातानुकूलित यंत्रणा बंद ठेवण्यात येते. यामुळे हा प्रवास आणखी त्रासदायक होतो.या मार्गावर पूर्वी प्रमाणे साध्या बसेस देण्यात याव्यात.

## कामोठे येथे रक्तदान शिबीर



**। पनवेल । प्रतिनिधी ।**

कामोठे वसाहतीमधील श्री युवा मित्र मंडळ कामोठेचा विघ्नहर्ता उत्सव समिती आयोजित छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिवजन्मोत्सवानिमित्त भव्य रक्तदान शिबीर व आरोग्य तपासणी शिबीर उत्साहात पार पडले

याप्रसंगी मंडळातील प्रत्येक सदस्याने रक्तदान करून कर्तव्य बजावले व परिसरातील नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर सहभाग घेतला. याप्रसंगी मंडळाचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

वीर वाजेकर महाविद्यालयात विशेष अभियान | संस्कारवान तरुण घडविण्याचा निर्धार

# व्यसनमुक्तीसाठी विद्यार्थ्यांची सामूहिक शपथ

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**



रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात प्रजापिता ब्रह्माकुमारीज, जे.एन. पी.ए. वसाहत शाखेच्या सहकार्याने व्यसनमुक्त भारत या विशेष अभियानांतर्गत व्यसनमुक्ती शपथ व राजयोग ध्यान मार्गदर्शन कार्यक्रम उत्साहात पार पडला.

महाविद्यालयाच्या मैदानात पार पडलेल्या या कार्यक्रमाला सर्व विद्या शाखांचे सुमारे ३०० विद्यार्थी-विद्यार्थिनी, तसेच सर्व विभागप्रमुख उपस्थित होते. ब्रह्मकुमारीज संस्थेच्या माताजी संध्या दीदी व त्यांचे सहकारी यांच्या मार्फत आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमास प्रभारी प्राचार्य डॉ. आमोद ठक्कर, उपप्राचार्य प्रा. गजानन चव्हाण व प्रा. डॉ. संदीप घोडके, प्रा. राम गोसावी, प्रा. श्रीकांत गोतपगार, प्रा. प्रांजळ भोईर, प्रा. भूषण ठाकूर यांची उपस्थिती लाभली होती. प्रजापिता ब्रह्माकुमारीज संस्था नशा मुक्त भारत अभियान अंतर्गत देशभरात युवक व विद्यार्थ्यांमध्ये व्यसनमुक्ती जनजागृती करत आहे. सुंदर चरित्रावर आधारलेला व्यसनमुक्त समाज निर्माण करून, विश्वशांती, नैतिक मूल्यांची पुनर्स्थापना आणि संस्कारवान तरुण घडवणे हा या संस्थेचा उद्देश असल्याचे संध्या दीदी यांनी सांगितले.

राजयोग ध्यानाचे फायदे मेडिटेशनद्वारे तणावमुक्त, आनंदी जीवन, उच्च नीच रक्तदाब व हृदयरोगांपासून आराम, नकारात्मक विचारांपासून मुक्ती, नैराश्य व डिप्रेशनमधून सुटका, मूल्यमूलक शिक्षण व चरित्र निर्मिती, व्यसनांपासून मुक्ती, राग क्रोधावर नियंत्रण, कुटुंबातील सौहार्द, मानसिक ताणातून मुक्ती व स्वास्थ्यपूर्ण जीवन असे अनेक फायदे मिळत असल्याचे त्यांनी या प्रसंगी सांगितले.

विद्यार्थ्यांसाठी राजयोगाच्या विशेष लाभ असून यात परीक्षा भीती कमी होणे, अभ्यासात एकाग्रता वाढणे, मनोबल विकास, स्मरणशक्ती वृद्धी, व्यक्तिमत्त्व घडण, अंतर्गत गुणांचा विकास घडून येतो असे त्या म्हणाल्या.

## निवडक



### चांधई येथे हुतात्म्यांच्या वारसांचा सन्मान

**नेरळ** : देशाच्या स्वातंत्र्य चळवळीत सहभाग घेणारे स्वातंत्र्य सैनिक गोमाजी पाटील व त्यांच्या कुटुंबीयांचा स्वातंत्र्यानंतर सांभाळ करणाऱ्या अनुसया जामघरे यांना शिवपुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. धाकटी चांधई येथील हुतात्मा हिराजी पाटील तरुण मंडळाच्या वतीने आयोजित शिवजयंती उत्सव सोहळ्यात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९६ वी जयंती कर्जत तालुक्यातील चांधई येथे आयोजित करण्यात आली होती.गेली १९ वर्षांपासून छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती धाकटे चांदई गावामध्ये साजरी होती. इतिहास संशोधक वसंत कोळंबे यांनी घालून दिलेली परंपरा हुतात्मा हिराजी पाटील तरुण मंडळ यांच्या माध्यमातून साजरी करीत आहेत. छत्रपती शिवाजी महाराज जयंतीला नसरापूर ग्रामपंचायत सरपंच जयवंती कोळंबे, सदस्या पूजा कोळंबे, सुनिल रसाळ, माधव कोळंबे, महेश कोळंबे, मोहन गवंडी आदी मान्यवर उपस्थित होते. या शिवजयंती सोहळ्यात मानाचा शिवछत्रपती पुरस्कार हुतात्मा हिराजी पाटील यांचे वारस अनुसया जामघरे यांना देऊन सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमात डॉ. निखिल डायरे, डॉ. अर्चना कोळंबे, सी. ए. संदेश कोळंबे, नयन वाघ, ॲड. गौतमी गायकवाड आणि २०२१ च्या पोलीस भरतीमध्ये उत्तीर्ण झालेले अंकुश माळी या गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला.

### पिंपळभाट येथे शिवजयंती साजरी



**रेवदंडा** : पिंपळभाट येथे गुरुवारी (दि. १९) फेब्रुवारी रोजी उज्ज्वल भविष्य सामाजिक संस्था व माणुसकी प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती मोठ्या उत्साहात व जल्लोषात साजरी करण्यात आली.या कार्यक्रमाच्या वेळी उज्ज्वल भविष्य सामाजिक संस्थेच्या अध्यक्ष श्रीमती उज्ज्वला चंदनशिव यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच माणुसकी प्रतिष्ठानचे अध्यक्ष व उज्ज्वल भविष्य सामाजिक संस्थेचे सचिव डॉ. राजाराम हुलवान यांच्यासह संस्थेचे पदाधिकारी, कर्मचारी व स्टाफ मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमादरम्यान छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी शिवाजी महाराजांच्या कार्याचा आदर्श घेऊन समाजकार्य अधिक प्रभावीपणे करण्याचा संकल्प व्यक्त केला. या उत्सवामुळे परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून सर्वांच्या सहकार्यामुळे शिवजयंती आनंदमय वातावरणात साजरी करण्यात आली.



### वनसमितीतून स्वच्छता राखण्यास मदत

**माथेरान** : माथेरान नगरपरिषदेच्या सत्ताधारी गटाच्या माध्यमातून वन संरक्षण समिती कार्यरत असते. सत्ताधारी गटाच्या मर्जीतील विश्वासू कार्यकर्ते या समितीवर उत्तम प्रकारे विकास कामे करण्यासाठी नेहमीच सज्ज असतात.एकूण वीस सदस्यांची या समितीवर निवड केली जाते. जोपर्यंत सत्ताधारी गट नगरपरिषदेच्या सभागृहात अस्तित्वात असतो तोवर नेमून दिलेले कार्यकर्ते यामध्ये पन्नास टक्के महिला सदस्य असतात. ही सर्व मंडळी एकदिलाने कामे करत असतात. दस्तुरी वाहन पार्किंगच्या माध्यमातून दरवर्षी लाखो रुपयांचे उत्पन्न या समितीला प्राप्त होते. त्यातूनच काहीवेळा वृक्षारोपण, ठराविक पॉईंट्सची सुरक्षा व्यवस्था, कचराकुंडी लावणे अशी महत्वपूर्ण कामे समितीचे पदाधिकारी, सदस्य करीत असतात. विशेष म्हणजे ही सर्व मोठया रक्कमेची कामे करताना कोणत्याही प्रकारची निविदा प्रक्रिया पूर्ण केली जात नाही. समितीचे पदाधिकारी,सदस्य ह्यांच्या सामोपचारातुन कामे पूर्ण करून गावाच्या विकास कामात मदत होत असते. लाखो रुपयांची शिल्लक आजही जमा असल्याने यावेळी गावातील एकूण पाच गरजवंत महिलांना स्वच्छता कामे दिली आहेत.याकामी दर महिन्याला साठ ते सत्तर हजार रुपये पगाराच्या रूपाने या पाच महिलांना दिला जात आहे. प्लास्टिक मुक्ती त्याचप्रमाणे अन्य कचरा गोळा करण्यासाठी वन संरक्षण समितीने पुढाकार घेतला आहे.

### आरोग्य शिबिराचे आयोजन

**पनवेल** : बिरमोळे मेडिकल फाउंडेशन व सिटीझन्स युनिटी फोरम या सेवाभावी सामाजिक संस्थांच्या संयुक्त विद्यमाने कफनगर पनवेल येथील बिरमोळे हॉस्पिटलमध्ये सुमारे सव्वाशे रुग्णाची आरोग्य तपासणी करण्यात आली. या शिबिरामध्ये क्ष-किरण तपासणी, हृदयस्पंदन आलेख, रक्ताच्या विविध चाचण्या, दंतचिकित्सा,नाक कान व घसा तपासणी,अस्थि घनता चाचणी, दमा आजाराविषयी तपासणी, इत्यादी विविध प्रकारच्या चाचण्या करण्यात आल्या. बिरमोळे हॉस्पिटलमधील तज्ञ डॉक्टर व समीर सहस्त्रबुद्धे, ऋषभ नेमा, किरण नाईक,आकाश भारती, शैलेश शर्मा या नामवंत डॉक्टरांनी सहभाग नोंदवला. कफचे पदाधिकारी मयूर भोसले,विलास दातार व कार्यकर्ते पंकज रुपारेल,भारती खानोलकर, राजश्री देसाई, संदेश बुटाला, साधना पाटील तसेच बिरमोळे हॉस्पिटलमधील कांचन पुजारी,प्राजक्ता वातारे, सुचिता मयेकर व इतर कर्मचारी वर्ग यांनी शिबिराच्या यशस्वीतेसाठी विशेष परिश्रम घेतले.



# रस्त्याच्या दुरुस्तीची मागणी

## • कर्जत-नेरळ-कल्याण रस्त्याची मशीनने स्वच्छता



| नेरळ | प्रतिनिधी |

कर्जत तालुक्यातील सर्वाधिक रहदारी असलेल्या कर्जत-कल्याण राज्यमार्ग रस्त्याची दुरुस्ती करण्याची गरज आहे. मात्र या रस्त्याचे ठेकेदार यांच्याकडून केवळ रस्त्यावरील माती स्वच्छ केली जात आहे. दरम्यान, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण आणि सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडून या रस्त्याची तात्काळ दुरुस्ती करावी, अशी मागणी स्थानिक वाहनचालक यांनी केली आहे.

कर्जत-कल्याण राज्यमार्ग रस्त्यावरील कर्जत ते नेरळ आणि पुढे डोणे फाटा हा २१ किलोमीटर लांबीचा भाग कर्जत तालुक्यात येतो. या रस्त्यावर दहा वर्षापूर्वी कर्जत ते वडवली या भागात करण्यात आलेले काँक्रीटीकरण खराब झाले आहे. त्यानंतर वडवलीपासून पुढे डोणे फाटयापर्यंत असलेला रस्ता डांबरी आहे. हा रस्ता बनवून दहा वर्षाहून अधिक काळ लोटला असून या रस्त्यावर असलेली वाहतूक लक्षात घेऊन रस्त्याची दुरुस्ती शासनाने करावी, अशी मागणी सातत्याने केली जात आहे. मात्र या रस्त्यावर मागील काही वर्षात किरकोळ दुरुस्ती वगळता अन्य कोणतीही मोठी कामे करण्यात आलेली नाहीत.त्यामुळे खराब झालेल्या रस्त्यावर सातत्याने वाहतूक कोंडी होत असते. या रस्त्यावरील खड्डेमुक्त प्रवास होईल अशा अपेक्षेत असलेल्या वाहनचालकांना सार्वजनिक बांधकाम खात्याचे ठेकेदार कंपनी यांच्यामुळे भ्रमनिरास होताना दिसत आहे. ठेकेदार कंपनी सध्या रस्त्याच्या कडेने साचून राहिलेली माती बाजूला करण्यात व्यस्त आहे. मात्र हा रस्ता खड्डे मुक्त व्हावा, यासाठी कोणत्याही प्रकारची खबरदारी घेताना दिसत नाही. रस्त्याच्या दोन्ही बाजूला साचलेली माती काढण्यासाठी मशिनरी लावली जात आहे. मशीन लावून माती काढली जात आहे. तेवढ्या खर्चात कर्जतपासून डोणे फाटा येथील रस्त्यावर डांबराचा थर बसू शकला असता. परंतु या रस्त्याची देखभाल दुरुस्ती करणाऱ्या नामांकित ठेकेदाराचे वर्चस्व आणि दबाव सार्वजनिक बांधकाम खात्यावर असल्याने बांधकाम खाते देखील या बड्या ठेकेदाराच्या कारनामे यांच्यापासून चार पाऊले लांब असल्याचे दिसून येत आहे. या ठेकेदार कंपनीचा दबाव बांधकाम खात्यावर असल्याने कर्जत येथील सार्वजनिक बांधकाम उप विभागाचा हा रस्ता आता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उरण उप विभागाचा भाग बनला आहे. त्यामुळे ठेकेदाराची मनमानी आणखी वाढली आहे. बांधकाम विभाग ठेकेदाराची मनमानी सहन करीत असल्याने वाहनचालकांना खड्डेमय रस्त्याने प्रवास करावा लागत आहे. दरम्यान, या रस्त्यावरील खड्डे आधी डांबर टाकून भरा आणि नंतर रस्त्याची स्वच्छता करा, असा टोका मानवाधिकार आयोगाचे गोरख शेप यांनी लगावला आहे. या रस्त्याबाबत मानवाधिकारकडून सातत्याने आवाज उठवला जात असून बांधकाम विभाग गप्प कशासाठी आणि कधीपर्यंत बसणार हे त्यांनी जाहीर करायला हवे.

# शैक्षणिक साहित्य वाटप करून शिवजयंती साजरी

| मुंबई | प्रतिनिधी |

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९६ व्या जयंतीनिमित्त भायखळा विभागात तरुणांच्या पुढाकाराने शालेय विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करत शिवजयंती महोत्सव साजरा करण्यात आला. महाराजांचा आदर्श घेत समाजहिताचे नवनवे उपक्रम राबवण्यात संघटनेचा कल असतो. त्यामागे छत्रपतींचे कार्य नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचा त्यांचा प्रामाणिक प्रयत्न असतो.

अखंड महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती देशभर साजरी करण्यात आली. भायखळ्यातील भीमनगर येथे तरुणांच्या पुढाकाराने साजरी करण्यात आलेल्या शिवजयंतीचे विशेष कौतुक होताना दिसत आहे. यावर्षी शिवजयंतीनिमित्त विविध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मनोज कदम, जितेंद्र कदम, सुजल शिर्के, रोहन कांबळे, तुषार सरोदे, सुजल पवार, प्रतिक पवार, अक्षय पवार, आर्दश जाधव, आशिष जाधव, योगेश गायकवाड, चंदन ठाकुर, जय सुर्वे, सुमेध सुर्वे, आदिराज जाधव, कार्तिक शिर्के, मोक्ष आगने, नितीन सोनवणे, मुकेश शिर्के, राकेश शिर्के, श्रीकांत वाढाणे, स्वप्निल रोकडे यांनी मेहनत घेतली.



### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२२ फेब्रुवारी

१) अनंत चांगदेव कुलपे थळ, अलिबाग



२) श्रीमती सुलोचना दत्तात्रेय खोत, मापगाव, अलिबाग

### कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**



**अमीर जुनैद घट्टे, वाढदिवस अलिबाग**



**कै. कुमुदिनी नरहरी रानवडे, अलिबाग**

## अंडी वाटप

**चिरनेर:** वशेणी इतिहास संपादकीय मंडळाच्या वतीने राजिप शाळा वशेणी व राजिप शाळा पुनाडे येथील विद्यार्थ्यांना पोषण आहाराच्या कार्यक्रमात अंडी वाटप करण्यात आली.

# किशोरवयीन मुलींना स्वसंरक्षणाचे धडे



| पाली/बेणसे | प्रतिनिधी |

आयएसओ नवघर शाळेत राजमाता जिजाऊ जयंतीचे औचित्य साधून लेक शिकवा अभियान अंतर्गत मुलींसाठी विशेष मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात शाळेतील इयत्ता ६ वी ते ८ वीच्या विद्यार्थिनींना 'गुड टच-बॅड टच' आणि किशोरवयीन आरोग्याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली.

समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. ज्योती लहरिया आणि आरोग्य सेविका सुवर्णा दुर्गे यांनी यावेळी मुख्य मार्गदर्शक म्हणून काम पाहिले. डॉ. ज्योती लहरिया यांनी मुलींना 'गुड टच-बॅड टच'मधील फरक समजावून सांगितला. स्वतःच्या शरीराचे रक्षण कसे करावे आणि अनुचित प्रकार घडल्यास न घाबरता कोणाकडे मदत मागावी, याचे सोप्या भाषेत मार्गदर्शन केले. तर आरोग्य सेविका सुवर्णा दुर्गे यांनी किशोरवयीन मुलींना या वयात शरीरात होणारे बदल, मासिक पाळी दरम्यान घ्यायची काळजी आणि वैयक्तिक स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले.

शासनाच्या लेक शिकवा अभियान या कार्यक्रमांतर्गत हा उपक्रम राबवण्यात आला. मुलींना केवळ शिक्षणच नव्हे, तर त्यांच्या आरोग्याबाबत आणि सुरक्षिततेबाबत जागरूक करणे हा या मागचा मुख्य उद्देश होता. या शिबिरासाठी शाळेतील इयत्ता ६ वी ते ८ वीच्या सर्व विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

> **या मार्गदर्शनामुळे आमच्यात आत्मविश्वास वाढण्यास मदत होईल. स्वतःच्या शरीराचे रक्षण कसे करावे, याची माहिती मिळाली.**
> **- सृष्टी अडसूळ, विद्यार्थिनी, शाळा नवघर**

# रॅलीच्या माध्यमातून कुष्ठरोग जनजागृती

| रेवदंडा | प्रतिनिधी |

सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा (कुष्ठरोग) रायगड-अलिबाग यांच्या वतीने महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथीचे औचित्य साधून कुष्ठरोग जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीमध्ये उज्ज्वल भविष्य सामाजिक संस्था, माणुसकी प्रतिष्ठान व इतर सामाजिक संस्था यांच्या सहयोगाने तसेच कर्मचारी व स्वयंसेवकांनी सहभाग नोंदविला.

या कार्यक्रमास जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.निशिकांत पाटील, सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा (कुष्ठरोग) डॉ. प्राची नेहुलकर (अलिबाग), माणुसकी प्रतिष्ठान अध्यक्ष डॉ. राजाराम हूलवान, जन शिक्षण संस्थान अध्यक्ष डॉ. नितीन गांधी, जन शिक्षण संस्थान संचालक डॉ. विजय कोकणे, अवैद्यकीय अधिकारी भगवान जाधव यांच्यासह विविध सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी, नर्सिंग स्टाफ व आरोग्य कर्मचारी तसेच उज्ज्वल भविष्य सामाजिक संस्थेच्या अध्यक्षा उज्वला चंदनशिव या रॅलीमध्ये सक्रिय सहभाग नोंदविला. ही रॅली सिव्हिल हॉस्पिटल, अलिबाग येथून सुरू करण्यात आली. रॅलीदरम्यान नागरिकांना कुष्ठरोगाबाबत जनजागृती, वेळेवर तपासणी व उपचाराचे महत्त्व याबाबत माहिती देण्यात आली.




# साप्ताहिक राशिभविष्य २३ फेब्रुवारी ते १ मार्च २०२६

**ज्योतिषी : मिलिंद पाटील, सारळ-अलिबाग**
**मोबा.९४०४७९१७९८**

## हिशोबी राहणे आवश्यक

**मेष :** राशीधारकांना या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपण आपली अस्मिता शुल्लक कारणाने दुखावली जाणार नाही याची दक्षता घेतल्यास आपल्या मनाप्रमाणे पुष्कळशा गोष्टी साध्य होणे शक्य आहे. नातलगात व मित्रमंडळींत उधार-उसनवारी टाळणे हितकारक राहू शकेल. आर्थिक बाजू ठीक असली तरी अनावश्यक खर्च होणार नाही याची दक्षता बाळगा. व्यापारात प्रगती होण्यासाठी प्रसारमाध्यमांचा उपयोग केल्यास उत्तम. मुलांना प्रगती करता येणे शक्य होईल. प्रवासात मात्र सावधानता बाळगा, किमती वस्तु सांभाळणे गरजेचे राहील. नोकरदारांनी वरिष्ठांशी जुळवून घेण्याचे धोरण स्वीकारावे. महत्त्वाच्या वस्तू सांभाळा. आपल्या कामाचा उत्साह वृद्धिंगत होईल आणि आपल्या ध्येयाजवळ जाता येणे शक्य होईल. व्यवसायाला चालना मिळेल. नोकरदारांना दिलासा मिळेल. आप्तेष्ट, मित्रमंडळींच्या गाठीभेटीचे योग संभवतात. काही नवीन प्रस्ताव मिळतील. **महिलांना:** मुलांना अध्ययनात प्रगती करण्याची संधी मिळेल. जागेसंबंधीच्या प्रश्नांना चालना मिळेल. घरातील अनावश्यक खर्चाला आळा घाला त्यामुळे मनावर ताण येणार नाही. **शुभ दिनांक:** २४,२५

## प्रलोभनात अडकू नका

**वृषभ :** राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपण बोलण्यावर नियंत्रण ठेवून कृतीवर भर दिल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करता येतील. नोकरदारांना दिलासा मिळेल. कलाक्षेत्राला चांगले प्रोत्साहन मिळेल, विशेषतः महिलांना त्यांच्या अंगभूत कलागुणांना वाव मिळेल. शेतीविषयक कामांना प्राधान्य द्याल. वकिलांना हा काळ उत्तम राहील. प्रकृतीस्वास्थ्याबाबत अधिक दक्ष राहावे, विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये पाळावीत व पोटाच्या विकाराबाबत सावध राहावे. प्रवासाचे य़ोग संभवतात. आपल्या कार्यक्षेत्रात व कौटुंबिक जीवनात येणाऱ्या प्रसंगांना स्थितप्रज्ञेने उत्तरे देण्याचे धोरण स्वीकारल्यास हा आठवडा चांगला जाईल. बौद्धिक क्षेत्राला वाव मिळेल. इतरांच्या बोलण्याने विचलित न होता त्यांना सामोरे जा. आपली शारीरिक प्रतिकारशक्ती वाढविण्याचा प्रयत्न करा. नको त्या प्रलोभनात अडकू नका. सरकारी नियमांना प्राधान्य द्या व ते पार पाडण्याचा प्रयत्न करा. **महिलांना:** प्रकृतीस्वास्थ्य जपा. विरोधकांच्या कारवायांवर नजर ठेवा. आपल्या घरात एखादी किमती वस्तूची खरेदी होणार आहे. मोठ्या व्यक्तिनचे रागाचे बोलणे मनावर घेऊ नका. **शुभ दिनांक:** २६,२७

## कामांना गती मिळेल

**मिथुन :** राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपण प्रत्येक बाबतीत सामंजस्याने वागण्याचा प्रयत्न केल्यास अपेक्षित गोष्टी साध्य करता येतील. एखादी नेतृत्वाची संधी मिळण्याची शक्यता आहे पण बडेजाव मात्र टाळा. काही महत्त्वाच्या गोष्टींबाबत मौन पाळणे अधिक लाभदायक ठरू शकते. शेतीविषयक व कोर्टाच्या कामांना गती मिळेल. दूरच्या आप्तेष्टांच्या, मित्रमंडळींच्या संपर्कात राहाल. आर्थिक व्यवहारात योग्य व्यक्तींचा सल्ला घ्या. हितशत्रूंवर नजर ठेवा. अचानक साहसी कृती आपल्याकडून होण्याची शक्यता आहे. आपली बलस्थाने कोणती यांचा मागोवा घ्या व भावी आयुष्याचा विचार करून वागा. सरकारी नियमांचे पालन करणे हिताचे राहील. सामाजिक कामाला प्राधान्य द्या त्याचे पडसाद आपल्यासाठी फायद्याचे असतील. विद्यार्थ्यांना अध्ययनात प्रगती करता येईल. नेहमी आशावादी राहण्याचा प्रयत्न करा. महिन्याच्या सुरुवातीला कानावर चांगली बातमी येईल. **महिलांना:** मुलांचे प्रकृतीस्वास्थ्य जपा, विशेषतः त्यांची खाण्याची पथ्ये सांभाळा व आपण कफ विकारांपासून सावध राहा. व्यापार-उद्योगाला चालना मिळेल. **शुभ दिनांक:** २३,२४

## कामाची प्रशंसा होईल

**कर्क :** राशीधारकास या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपण सर्वांशी बोलताना शब्द जपून वापरल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करता येणे शक्य आहे. कलाक्षेत्राला प्रोत्साहन मिळेल. कलाकारांच्या कलागुणांना वाव मिळेल त्यांचा गौरव होण्याची शक्यता राहील. काही भाग्यवंतांना प्रसिद्धीचे वलय प्राप्त होण्याची शक्यता आहे. शेती व कोर्टकचेरीच्या कामांना गती मिळेल. घरगुती वातावरण चांगले राहील. सरकारी नियमांचे पालन करा. नको त्या जबाबदाऱ्या स्वीकारू नका. मुलांनी अध्ययनासाठी ज्येष्ठांच्या संपर्कात राहावे. वैवाहिक जोडीदाराशी जुळवून घ्या. आपल्या ध्येयासाठी प्रयत्नशील राहा. विरोधकांची धास्ती बाळगण्याचे कारण नाही. थोरामोठ्यांच्या भेटी होण्याची शक्यता राहील. कोणालाही पैसे उधार देऊ नका. जमीन राहू नका. कामावर आपले काम हलके करण्यासाठी योग्य व्यक्तीची कामासाठी निवड करा व आपली जबाबदारी कमी करा. **महिलांना:** आपल्या कामाची प्रशंसा केली जाईल. नको त्या विचारात अडकू नका. तब्बेत ठीक वाटत नसेल तर प्रवास टाळा, मित्र, मैत्रिणी खुशखबर देतील. सप्ताहाच्या मध्यावर धनलाभ संभवतो. **शुभ दिनांक:** २५,२६

## वरिष्ठांची मर्जी संपादन करा

**सिंह :** राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपण आपल्या कामावर एकाग्रता पाळून आपले नियोजित ध्येय गाठण्याचा प्रयत्न केल्यास यशाचा मार्ग सुकर होईल. आपल्या रागावर नियंत्रण ठेवून शांतता बाळगल्यास आपण सर्व बाबतीत अग्रेसर राहू शकाल. संगणक व तांत्रिक क्षेत्रात काम करणाऱ्यांनी यशाची अपेक्षा ठेवू शकतील. नोकरदारांना दिलासा मिळेल. वरिष्ठांची मर्जी संपादन करता येईल. आर्थिक व्यवहारात मात्र सावधानता बाळगा आपण आपल्या नोकरी-व्यवसायात चैतन्य आणण्यासाठी प्रयत्नशील राहिल्यास आपल्या आशा-आकांक्षा पुऱ्या होऊ शकतील. गुरूकृपेचा लाभ मिळू शकेल व घेतलेल्या कामात सफलता मिळेल. वरिष्ठांशी जुळवून घेण्यासाठी प्रयत्नशील राहा. कौटुंबिक वादाचे प्रसंग उद्भवणार नाहीत याची दक्षता घ्या. आर्थिक बाजू ठीक राहील. उधारी घेऊ नका देऊ नका. **महिलांना :** कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य द्या. आपण सत्याच्या मार्गाचा अवलंब केल्यास व त्यानुसार कृती केल्यास आपला यशाचा मार्ग सुलभ होईल. कुटुंबातील आप्तेष्टांशी सामंजस्याने वागणे हितकारक राहील. धार्मिक कार्यात अधिक रस घ्याल. **शुभ दिनांक :** २८,०१

## वादाचे प्रसंग टाळा

**कन्या :** राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपण सकारात्मक दृष्टिकोनातून वागण्याचा प्रयत्न केल्यास पुष्कळशा आशा-अपेक्षा पुऱ्या होऊ शकतील. विद्यार्थीवर्गाने अध्ययनात परिश्रम वाढविल्यास अपेक्षित यश प्राप्त होऊ शकेल. दुसऱ्यांवर अवलंबून न राहता स्वयंसिद्ध होण्याचा प्रयत्न करा. नोकरदारांनी वरिष्ठांशी जुळवून घेण्याचा प्रयत्न करावा, वादाचे प्रसंग टाळावेत. आर्थिक व्यवहारात सावधानता बाळगावी. गुंतवणूक करणे टाळावेत. राजकारणापासून दूर राहणे चांगले. कोर्टाच्या कामांना गती मिळेल. दूरच्या आप्तेष्टांच्या संपर्कात राहाल. आपण आपल्या कामाचे योग्य नियोजन केल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करू शकाल. शेतीविषयक कामांना चालना मिळेल. प्रकृतीबाबत अधिक चोखंदळ राहा, विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये पाळा आपल्या रागावर योग्य नियंत्रण ठेवा. वादाचे प्रसंग कटाक्षाने टाळा. कलाक्षेत्राला प्रोत्साहन मिळेल. **महिलांना :** त्यांच्या अंगभूत कलागुणांना प्रोत्साहन मिळेल. प्रवासाचे योग संभवतात. वैवाहिक जोडीदाराशी सामंजस्याने वागावे. प्रेमासंबंधी मंडळींना सबुरीचा सल्ला देण्यात येत आहे. **शुभ दिनांक :** २७,०१

## साहसी कृत्ये करु नका

**तुळ :** राशीसाठी या सप्ताहात आपण प्रत्येक बाबतीत नम्रतेचे धोरण स्वीकारल्यास हाती घेतलेल्या कार्यात यश मिळू शकेल. आपल्या आवडीच्या गोष्टी करण्यात आनंद घेता येईल. दूरच्या आप्तेष्टांशी वार्तालाप होण्याची शक्यता आहे. व्यापार-उद्योगात प्रगती करता येईल. साहसी कृत्ये करण्याचे टाळावीत नाहीतर संकटात पडू शकता, मुलांकडे अधिक लक्ष देणे गरजेचे आहे. आपण कोणतेही निर्णय घेण्याआधी त्याचा साधक-बाधक विचार करूनच अवलंब करणे हितकारक ठरू शकेल. कुठलीही गोष्ट ताणून घेऊ नका. नको त्या प्रलोभनात अडकू नका. हितशत्रूंना संधी मिळणार नाही याची दक्षता घ्या. कौटुंबिक वातावरण बिघडणार नाही याची खबरदारी घ्या. प्रकृतीबाबत अधिक निर्बंध पाळा, विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये पाळा व्यापाराला चालना मिळेल. कामाचा उत्साह वृद्धिंगत होईल, शेतीत लाभ होईल. **महिलांना :** आपल्या रागावर मात्र योग्य नियंत्रण ठेवा, जेणेकरून इतरांची नाराजी होणार नाही याकडे लक्ष द्या. कामात आपला स्वार्थ न बघता इतरांकडे बघण्याचा दृष्टिकोन ठेवल्यास त्याचा आनंद घेऊ शकाल. **शुभ दिनांक :** २३,२५

## दुसऱ्यांवर अवलंबून राहू नका

**वृश्चिक :** राशीसाठी या सप्ताहात आपण दुसऱ्यांवर अवलंबून न राहता आपल्या आत्मविश्वासाने स्वयंसिद्ध होण्याचा प्रयत्न केल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करू शकाल. राजकारण, क्रीडा क्षेत्रांत प्रगती करण्याची संधी प्राप्त होईल. हितशत्रूंवर कडक नजर ठेवा, त्यांना संधी मिळणार नाही याची दक्षता घ्या. साहसी वृत्तीने वागणे टाळा. इतरांकडून मदतीची अपेक्षा न ठेवता स्वतःच्या कामात झोकून द्या. कलाक्षेत्राला उत्तम प्रतिसाद मिळेल. आपण सर्वांशी प्रेमाने वागल्यास हीच मंडळी आपल्याला आपल्या ध्येयापर्यंत पोहोचू शकतिल. काही घरगुती प्रश्न सोडविताना भावनिक बाजू बाजूला ठेवा. कामात वाढ झाल्याने आपण व्यस्त राहाल तरीही जोडीदाराकडे दुर्लक्ष करू नका. आर्थिक व्यवहारात सावधानता बाळगा. हाती घेतलेली कामे पार पाडू शकाल. कलाकार मंडळीना कलाक्षेत्रात उत्तम प्रतिसाद मिळेल. **महिलांना :** आप्तेष्टांच्या संपर्कात राहता येईल व त्यांची ख्याली-खुशाली घेता येईल. आर्थिक बाजू ठीक राहील. कौटुंबिक वातावरण बिघडू देऊ नका. सार्वजनिक ठिकाणी आपले मतप्रदर्शन करण्याचे टाळावे. खिसा पाकीट भरलेले राहील. **शुभ दिनांक :** २४,२६.

## रागावर नियत्रंण ठेवा

**धनु :** राशीसाठी या सप्ताहात आपले ग्रहमान पाहता आपण प्रत्येक बाबतीत सामंजस्याने वागण्याचे धोरण अवलंबिल्यास पुष्कळशा गोष्टी सफल होऊ शकतात. व्यापारात प्रगती करण्याची संधी प्राप्त होईल. कौटुंबिक वातावरण वादासारख्या प्रसंगांनी बिघडणार नाही याची दक्षता घ्या. कामानिमित्त प्रवास योग संभवतात. कोणालाही राग येणार नाही अशा दृष्टीने वागणे हितकारक राहील. प्रकृतीची काळजी घ्या, आर्थिक बाजू ठीक राहील. आपण आपल्या बोलण्यावर योग्य नियंत्रण ठेवून वागल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करता येणे शक्य होईल. आपल्या बोलण्याने इतरांचा 'इगो' दुखावणार नाही याची दक्षता घ्या. भविष्याचा विचार न करता वर्तमानकाळाचा आनंद घेऊन सुखी-समाधानी राहण्याचा प्रयत्न करा. जागरण टाळा सरकारी नियम व कायद्याचे पालन कटाक्षाने पाळा. चुकीच्या पैशाचा मोह करू नका सरकारी देणी त्वरित भरा. भक्तिमार्गाचा अवलंब केल्यास आनंद मिळू शकेल. **महिलांना :** आपण सामंजस ठेवल्यास ही वेळ आपल्यासाठी संधि देणारी असेल, आपल्या ओळखीचा फायदा कसा करायचा ही ठरवा बाकी सर्व सोप होईल. **शुभ दिनांक :** २५,२७

## तडजोडीची भूमिका घ्या

**मकर :** हा साप्ताह मकरराशीसाठी आपण शनी पर्वातून प्रवास करीत आहात हे विसरू नका व प्रत्येक बाबतीत सावधानता बाळगल्यास हा आठवडा चांगला जाऊ शकेल. आपल्या बोलण्यावर नियंत्रण ठेवा, जेणेकरून आपल्याबद्दल गैरसमज व नाराजी होणार नाही. आपली कुवत पाहूनच जबाबदारी स्वीकारा. सर्वांशी प्रेमाने वागल्यास आपल्याला मदतीचा हात येऊ शकेल. सरकारी नियम व कायदा यांचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घ्या. खर्चाचे प्रमाण वाढणार आहे, तेव्हा प्रथमपासून अनावश्यक खर्च टाळण्याचा प्रयत्न करा. काही समस्या आल्यास आपल्या बुद्धिचातुर्याचा उपयोग करून त्या सोडविण्याचा प्रयत्न करा. आर्थिक बाजू ठीक राहील. हितशत्रूंचा ससेमिरा जाणवणार नाही. बौद्धिक क्षेत्राला वाव मिळेल. व्यवहारात सावधानता बाळगा. लांबचे प्रवास टाळा. **महिलांना :** सर्वांशी सामंजस्याने वागणे हितकारक राहील. नियमित व्यायाम व योगाचा अवलंब करावा. दम लागे पर्यंत काम करू नका. ज्येष्ठांचा आदर राखा. नको त्या प्रलोभनांना भुलू नका, सरळ मार्ग अवलंबा. बौद्धिक क्षेत्राला वाव मिळेल. धार्मिक गोष्टींना प्राधान्य द्याल. **शुभ दिनांक :** २६,२८

## इतरांच्या आनंदात सहभागी व्हा

**कुंभ :** राशी या सप्ताहातील ग्रहमान पाहता आपणास मिळणारे समाधान हीच खऱ्या आनंदाची खूण आहे. याबाबतीतला विचार करून वागण्याचा प्रयत्न केल्यास हा आठवडा खऱ्या अर्थाने उत्तम घालवू शकाल. कौटुंबिक व कार्यालयीन कामे चातुर्याने पुरी करण्याचा प्रयत्न करा. कामाचा उत्साह वाढेल मात्र कटू बोलण्याचे प्रसंग कटाक्षाने टाळा. विद्यार्थ्यांना अध्ययनात प्रगती करता येईल. प्रकृती स्वास्थ्याबाबत खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. या सप्ताहात आपले ग्रहमान आपणास कलाक्षेत्राच्या कलागुणांना प्रोत्साहन मिळू शकेल. महिलांना त्यांच्या अंगभूत कलागुणांना चांगला वाव मिळेल, मात्र अहंकारापासून दूर राहा. अनावश्यक गोष्टींची चर्चा करण्यापेक्षा स्वतःच्या कामात अधिक लक्ष दिल्यास ते हितकारक ठरू शकेल. वादविवादाचे प्रसंग कटाक्षाने टाळावेत. **महिलांना :** बोलण्यावर मात्र नियंत्रण ठेवावे म्हणजे गैरसमज होणार नाहीत. आपण आर्थिक व्यवहारात सावधगिरी बाळगल्यास हा आठवडा सर्व दृष्टीने चांगला जाऊ शकेल. आपण प्रकृतीस्वास्थ्यासाठी तेलकट व मसालेदार पदार्थांचे सेवन टाळल्यास प्रकृतीच्या तक्रारी उद्भवणार नाहीत. **शुभ दिनांक :** २७, ०१

## विचारपूर्वक निर्णय घ्या

**मीन :** राशीसाठी आपले ग्रहमान पाहता आपण प्रत्येक बाबतीत संयमाने वागणे स्वीकारल्यास आपणास हा आठवडा चांगला जाऊ शकेल. शनी महाराज आपल्या राशिस्थानी आहे हे विसरू नका. नोकरदारांना दिलासा मिळेल. आर्थिक बाबतीत मात्र तज्ञांचा सल्ला घेऊनच व्यवहार करणे योग्य राहील. आप्तेष्ट, मित्रमंडळींशी सामंजस्याने वागणे हितकारक ठरेल. आपण सर्व बाबतीत गोड बोलून आपले कार्य साध्य करण्याचे धोरण स्वीकारल्यास हा सप्ताह चांगला जाऊ शकेल, मात्र आपल्या बोलण्यावर योग्य नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. कोणाशीही नाराजी पत्करू नका. मुलांकडे अधिक लक्ष दिल्यास उत्तम. त्यांच्या अध्ययनात आपले सहकार्य द्या. हाती घेतलेल्या कामात सफलता मिळेल. सरकारी नियम व कायदा यांचे कटाक्षाने पालन करा. कामात गुरुची कृपा अनुभवण्यास मिळेल, मनातिल वाईट विचारांना दूर सारा. एकाग्रता वाढवण्यासाठी ध्यान करा. **महिलांना :** आपली माहेरची माणसे घरी येतील त्यांची ऊठबस करावी लागेल, कामात असताना तब्बेतिकडे दुर्लक्ष करू नका. **शुभ दिनांक :** २४,२७

# कर्जत महावीर पेठेत वीज समस्या तीव्र

## दैनंदिन कामकाजात अडथळे; महावितरणकडे केबल टाकण्याची मागणी

**। कर्जत । प्रतिनिधी ।**

शहरातील महावीर पेठ परिसरात ट्रान्सफॉर्मर बसवून अनेक महिने उलटूनही अद्याप वाढीव केबल टाकण्यात आलेली नसल्याने नागरिकांना कमी दाबाने वीजपुरवठा मिळत असल्याची गंभीर समस्या निर्माण झाली आहे.

कमी दाबामुळे घरगुती उपकरणे नीट कार्यरत नसून दैनंदिन कामकाजात अडथळे निर्माण होत असल्याची तक्रार स्थानिकांनी केली आहे. या पार्श्वभूमीवर राजाभाऊ कोठारी, महेंद्र चंदन, प्रशांत पाटील, परेशभाई शाह, जयवंत म्हसे यांनी संबंधित अधिकाऱ्यांकडे पाठपुरावा करत थेट भेट घेण्याचा निर्णय घेतला. त्यांनी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादितचे अधिकारी चंद्रकांत केंद्रे यांची प्रत्यक्ष भेट घेऊन लेखी निवेदन सादर केले व परिसरातील वीज समस्येबाबत सविस्तर चर्चा केली. नगरसेवकांनी महावीर पेठेत तातडीने वाढीव केबल टाकून वीजदाब सुरळीत करण्याची मागणी केली. यावर अधिकाऱ्यांनी परिस्थितीची दखल घेत दोन ते तीन दिवसांत आवश्यक काम पूर्ण करण्याचे आश्वासन दिले आहे. दरम्यान, स्थानिक नागरिकांनी या आश्वासनाची तातडीने अंमलबजावणी होण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे. वाढीव केबल टाकल्यानंतर वीजदाबाची समस्या कायमची सुटेल, असा विश्वास नागरिकांनी व्यक्त केला आहे.



# साई मंदिरात धार्मिक कार्यक्रम

**पनवेल ग्रामीण** : श्री साई मंदिर, आसुडगांव येथे द्वितीय वर्धापन दिन सोहळा रविवारी (दि.२२) रोजी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. ग्रामस्थांच्या सहकार्याने व जनसामान्यांच्या सहभागातून उभारलेल्या या मंदिराच्या वर्धापन दिनानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यात संत साईबाबा महिला हरिपाठ मंडळ, तोंडरे यांचा हरिपाठ, जय हनुमान भजन मंडळ, आसुडगाव यांचे भजन सादर होईल. तसेच शिरसाई प्रासादिक महिला भजन मंडळ, शिरसे-कर्जत यांचे भजन व कीर्तनाचा कार्यक्रम रंगणार आहे.

# रस्ता सुरक्षा सप्ताहनिमित्त संस्थांचा सन्मान

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

समाजातील सर्व सामाजिक कार्यकर्ते आणि संस्था यांच्या मदतीने होणारे अपघाताचे प्रमाण कमी झाले असून, असेच सहकार्य राहू द्या, अशी अपेक्षा अपर पोलीस महासंचालक प्रवीण साळुंखे यांनी व्यक्त केली.

रस्ता अपघात नियमांविषयी जनजागृती करण्यासाठी दरवर्षी राष्ट्रीय रस्ता सुरक्षा सप्ताह साजरा केला जातो. या उपक्रमाचा मुख्य उद्देश वाहनचालकांना शिस्त लावणे, हेल्मेट-सीटबेल्टचा वापर वाढवणे आणि रस्ता सुरक्षा- जीवन रक्षा हा संदेश घराघरात पोहोचवणे हा आहे.

या काळात जनजागृती रॅली, हेल्मेट सक्ती तपासणी, ट्रॅफिक नियमांचे शिबीर, चित्रकला व निबंध स्पर्धा आयोजित केल्या जातात. दुचाकीस्वारांनी हेल्मेट घालणे, कारमध्ये सीटबेल्ट वापरणे, वेगमर्यादा पाळणे, मद्यपान करून गाडी न चालवणे आणि मोबाईलचा वापर टाळणे या जागृतीवर भर दिला जातो.

यावेळी रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक (वाहतूक) तानाजी चिखले, पोलीस उप अधीक्षक पुष्पलता दिघे, भरत शेंडगे, विनोद माळवे, दीपाली जाधव, गुरूनाथ साठेलकर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे आयोजन प्रभारी अधिकारी वैभव रोंगे, पोलीस देवीदास नाईक, संजय संजय टिळेकर, सर्व पोलिस अंमलदार यांनी केले. यावेळी रत्नागिरी,रायगड येथील वाहतूक पोलिस,नागरिक, सामाजिक कार्यकर्ते, सामाजिक संस्था यांचे कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खाली नमुंद केलेली जमीन खालील जमीन मालक यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जातील खालील वर्णन केलेली जमीन मिळकत आमचे खरेदीदारांनी विकत घेण्याचे ठरविले असुन त्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे:-मोजे ताडगाव ता. सुधागड, जि. रायगड. येथील जमीन बिनशेती प्लॉट मिळकत. जमिन मालकाची नांवे वैभव डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन.

**मिळकतींचे वर्णन :-**

| क्र. | स.नं. | प्लॉट नं. | क्षेत्र चौ.मी. | क्र. | स.नं. | प्लॉट नं. | क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २७ | ४८६ | ५०० | १६ | २८/१ | ४४९ | ५०० |
| २ | २७ | ४८७ | ५०० | १७ | २८/१ | ४५३ | ५०० |
| ३ | २७ | ४८८ | ५०० | १८ | २८/१ | ४५६ | ५०० |
| ४ | २७ | ४८९ | ४४६ | १९ | २८/१ | ४५८ | ५०० |
| ५ | २८/१ | ४८९ | ५४ | २० | २८/१ | ४१६ | ४८८ |
| ६ | २८/१ | ४९० | ५०० | २१ | २८/१ | ४१७ | ५०० |
| ७ | २८/१ | ४९१ | ५०० | २२ | २८/१ | ४१८ | ५०० |
| ८ | २८/१ | ४४१ | २७५ | २३ | २८/१ | ४१९ | ५०० |
| ९ | २८/१ | ४४२ | ५०० | २४ | २८/१ | ४२२ | ५०० |
| १० | २८/१ | ४४३ | ५०० | २५ | ३०/१ | ४२३ | ५०० |
| ११ | २८/१ | ४४४ | ५०० | २६ | २८/१ | ४२५ | १६५ |
| १२ | २८/१ | ४४५ | ५०० | २७ | २७ | ४२५ | ३६० |
| १३ | २८/१ | ४४६ | ५०० | २८ | २७ | ४२७ | ५०० |
| १४ | २८/१ | ४४७ | ५०० | २९ | २८/१ | ४२८ | ५०० |
| १५ | २८/१ | ४४८ | ५०० | ३० | २८/१ | ४३० | ५०० |

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही वहिवाट ताबा बयाणा पावती, साठेकरार, गहाण बोझा, भाडेपट्टा, जप्ती, लिज, लीएन जाणे येणेचे मार्ग अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क, हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसांच्या आत खालील सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथम दर्शनी पुराव्यासह समक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. त्याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजुन त्यासंबंधी कोणाचेही कायदेशीर हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी ते जाणीवपुर्वक सोडुन दिले आहेत, असे गृहीत धरून आवश्यक त्या कायदेशीर बाबींची पुर्तता करून आमचे खरेदी घेणार खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत बंधनकारक राहणार नाही हे कळावे. येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे.

दिनांक :- २२/०२/२०२६

खरेदीदारांचे लेखक,
**राठोड एण्ड एसोसिएट्स**
श्री.सरदारमल जोरावरमल राठोड स्टॅम्प व्हेंडर,
श्री. राजेश एस. राठोड
२८६ अ राठोड सदन, ऑफिस नं.७ पाली,
ता.सुधागड, जि.रायगड.
मो. ९४२११६८७६३/९२७०३६७२९०

# मुस्लिम बांधवांचे रोजे सुरु

**माणगाव** : इस्लामी शाबान महिन्यानंतर रमजान महिना सुरु होतो. बुधवार दि.१८ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी चंद्र दर्शन झाल्यावर पवित्र रमजान महिना सुरु होऊन मुस्लिम बांधवांचे गुरुवार दि,१९ फेब्रुवारीपासून पवित्र रमजानचे रोजे सुरु झाले आहेत. इस्लाम धर्मात नमाज,रोजा , जकात, हाज, इमान हि पाच मूलभूत तत्वे मानली जातात. त्यापैकी रोजा हा एक असून पवित्र रमजान महिन्यात मुस्लिम बांधव अल्लहाच्या नावावर पवित्र रमजानचे रोजे महिनाभर धरीत असतात. पहाटे ३ वाजता उठून मुस्लिम भगिनी स्वयंपाक करतात.

# सागरगडावर स्वच्छता अभियान

**। रेवदंडा । प्रतिनिधी ।**

माफी असावी महाराज आम्ही तुमचे गड-किल्ले जपू शकलो नाही; मात्र यापुढे सर्वांनी मिळून जास्तीत जास्त प्रयत्न करू आणि सोशल मीडियामध्ये गुंतलेल्या पिढीपर्यंत तुमचा गौरवशाली इतिहास पोहोचवून गड-किल्ल्यांची आवड निर्माण करू, अशी शपथ अलिबागकर एक हात मदतीचा या ग्रुपतर्फे घेण्यात आली. गुरूवारी (दि.१९) रोजी अलिबागकर ग्रुपतर्फे सागरगडावर शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी शिवप्रेमी सदस्यांनी गडावर स्वच्छता अभियान राबवून ऐतिहासिक वारसा जतन करण्याचा संदेश दिला. शिवजयंती निमित्त सागरगड येथे हायकिंग व ट्रेकिंग उपक्रमाचेही आयोजन करण्यात आले.

या उपक्रमासाठी विविध गावांतील सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. गावे वेगवेगळी असली तरी अलिबागकर या नात्याने सर्व सदस्य नियमितपणे एकत्र येऊन सामाजिक व ऐतिहासिक जतनाचे कार्य करत असल्याचे यावेळी सांगण्यात आले. प्रत्येक गावातून किमान एक सदस्य ग्रुपशी जोडला जावा व ही संख्या वाढवण्याचा प्रयत्न सुरू असल्याचेही सदस्यांनी नमूद केले.

ग्रुपचे प्रमुख अमरेश ठाकूर, उज्ज्वल भविष्य सामाजिक संस्थेच्या अध्यक्षा उज्ज्वला चंदनशिव, माणुसकी प्रतिष्ठान अध्यक्ष डॉ. राजाराम हुलवान तसेच त्यांच्या सहकाऱ्यांकडून छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार जपण्याबरोबरच गड-किल्ले, ऐतिहासिक स्मारके, पुरातत्व स्थळे व प्राचीन अवशेषांचे सर्वेक्षण, जतन आणि संवर्धनासाठी सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. यावेळी पुरातत्व विभागाने गड-किल्ले व ऐतिहासिक वारसा संवर्धनाकडे अधिक लक्ष देऊन आवश्यक कामे सुरू करावीत, अशी विनंती ग्रुपतर्फे करण्यात आली.

उपक्रमासाठी मनोज माळी, डॉ. राजाराम हुलवान, अजित हरवडे, मिलिंद समेळ, प्रितेश पाटील, प्रथमेश घरत, उज्ज्वला चंदनशिव, सुरेश साळुंखे , अमरेश ठाकूर, आसावरी राऊत, अभिषेक कोळी, साक्षी राऊत, अश्विन शिंदे उपस्थित होते.

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहिर नोटिसीने कळविण्यात येते की, मौजे- देवीचापाडा, तालुका-पनवेल, जिल्हा रायगड येथील खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही माझे अशिल श्री. मोहम्मद मोबिन मोहम्मद हाफीज राईन, रा-राजू इस्टेट, रूम नं. १०/११, खैराणी रोड, साकीनाका, मुंबई ४०००७२ यांचेकडून नोंदणीकृत खरेदीखताने मालकीहक्काने कायम स्वरूपी विकत घेण्याचा विचार करीत आहेत.

**वरीलप्रमाणे परीशिष्ट**
**मौजे देवीचापाडा, तालुका पनवेल, जिल्हा-रायगड**

| गट नं.व उपविभाग क्र | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|
| १४/१/ब | क्षेत्र ०.१५.०० ०.०३.०० एकुण क्षेत्र ०.१८.०० पैकी ०.१.७५ एवढे खरेदीक्षेत्र आणि त्यावरील तळमजला अधिक दोन मजली बांधलेली एकुण १५ खोल्याची चाळ | ३.०० |

सर्व जनतेस कळविण्यात येते की, वरील परिशिष्टातील वर्णन केलेल्या मिळकती मधील हक्क, हितसंबंध व अधिकार आणि/किंवा इतर फायदे याबाबत ज्या कुणाची समझोता करार, साठेकरार, विकसनकरार, फरोक्त, विक्री, विनिमय, गहाण, बोजा, दान, पोटगी, चार्ज, वारसाहक्क, ट्रस्ट, न्यास, ताबा, कुळ, वहिवाट, भाडेपट्टा, सबलीज, अंडरलीज. लियन किंवा इतर बाबींद्वारें हरकत, तक्रार दावा, हितसंबंध असेल तर त्यांनी तशा प्रकारची हरकत, तक्रार, दावा, हितसंबंध ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून खालील सही करणार यांच्या खालील पत्त्यावर १५ (पंधरा) दिवसांच्या आत लेखी कागदोपत्री पुराव्यासह सादर करावी वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा वगैरे न आल्यास वरील परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकती या निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार, दावा, हितसंबंध नाही असे समजून माझे अशिल वरील परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार, दावा माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

दिनांक:-२१/०२/२०२६

Sd/-
**KISHORA. DHAKAD**
Advocate High Court
Advocate En.Roll No. MAH / 1913/2006
Office Add.: Office, First Floor,
Municipal Complex, Near Vasudev Balvant
Phadke Natyagruha, P410206, Raigad.

# महामार्ग सुरक्षा पथकाच्या कार्यालयाचे उद्घाटन

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

रस्ते सुरक्षा अभियान २०२६ च्या समारोप कार्यक्रमानिमित्त रायगड परिक्षेत्रातील महामार्ग सुरक्षा पथकाच्या पळस्पे येथील नूतन प्रशासकीय कार्यालयाचे उद्घाटन उत्साहात संपन्न झाले. अप्पर पोलीस महासंचालक (वाहतूक), महाराष्ट्र राज्य प्रवीण साळुंखे यांच्या हस्ते कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले.




रायगड परिक्षेत्रात वाढती वाहतूक, सातत्याने घडणारे अपघात आणि प्रशासकीय अडचणी लक्षात घेता स्वतंत्र प्रशासकीय कार्यालयाची गरज भासत होती. संबंधित अधिकाऱ्यांनी शासनाची जागा निश्चित करून अतिक्रमण हटवले व आवश्यक प्रशासकीय पाठपुरावा पूर्ण करत हे कार्यालय उभारण्यात यश मिळवले. या उपक्रमामुळे महामार्ग सुरक्षा व्यवस्थेला स्वतंत्र व सक्षम अधिष्ठान प्राप्त झाले आहे.

या कार्यालयामुळे रस्ते सुरक्षा उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी, वाहतूक नियमन व सातत्यपूर्ण देखरेख, ई-चलान प्रणालीची काटेकोरपणे राबवता येईल, अपघात नियंत्रण व तात्काळ मदत व्यवस्थेचे बळकटीकरण होईल.

कार्यक्रमात अपघातग्रस्तांना मदत करून जीवनदान देणाऱ्या 'देवदूत' स्वयंसेवकांचा, हेल्प फाऊंडेशन, सह्याद्री वन्यजीव संरक्षक समिती अशा सामाजिक संस्था, महामार्गावरील देवदूत यंत्रणा, लोकमान्य हॉस्पिटल, डेल्टा फोर्स, मृत्युंजय देवदूत यांच्यासह कर्तव्यदक्ष पोलीस अधिकारी, पत्रकार, उद्योजक, वाहतूकदार आणि नागरिकांचा सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. अपघाताच्या क्षणी तत्परतेने धावून जाणाऱ्या या मदतनीसांमुळे अनेक कुटुंबांना आधार मिळाल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले.

यावेळी पोलीस अधीक्षक तानाजी चिखले, उपअधीक्षक पुष्पलता दिघे, पोलीस निरीक्षक भरत शेंडगे, विनोद माळवे, दिपाली जाधव, वैभव रोंगे, देविदास नाईक, संजय टिळेकर तसेच जिल्ह्यातील महामार्ग पोलीस अधिकारी, कर्मचारी, कंटेनर यार्ड प्रतिनिधी, वाहतूकदार व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेली शेतजमीन मिळकत असून त्या मिळकतीचे विद्यमान मालक रविंद्र बाबू राऊत, अनिल बाबू राऊत, राजन बाबू राऊत, सुनिल बाबू राऊत, वंदना रमेश पाटील, अश्विनी अनिल भगत, अमिता अशोक राऊत, अमित अशोक राऊत, अमोल अशोक राऊत, पुनम रणजीत पाटील, मूळ सर्व रा. नागाव ता.अलिबाग,जि रायगड, सध्या रा. मुंबई यांच्याकडून कायम विकत घेण्याबाबत आमच्या अशिलांनी व्यवहार ठरविलेला आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरून आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार रु. पैसे |
|---|---|---|---|
| नागाव ता.अलिबाग, जि.रायगड | १७७३ | ०-३३-५० पो.ख. ०-००-०० एकूण ०-३३-५० | ४.८७ |

सदर वर नमूद केलेली शेती मिळकत हि या जाहीर नोटीसचा विषय आहे.

सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क हितसंबंध बोजा अथवा गहाण, दान, लीज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेंटेनन्स, मेहेर, कर्ज वगैरेबाबत कसलाही हक्क हितसंबंध व हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यांसह आपली हरकत खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून (१४) चौदा दिवसांचे आत आणून द्याव्यात. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाची कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे व या मिळकतीबाबत क्लिअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व आमच्या अशिलांस सदर मिळकतीचा नंतर निर्वेध असल्याचा दाखला देण्यात येईल, हे सर्वास कळावे.

अलिबाग
तारीख : २०/०२/२०२६

सही/-
**ॲड. शैलेश प्रभाकर पाटील**
दुय्यम निबंधक अलिबाग कार्यालयासमोर
पो. अलिबाग ता. अलिबाग जि.रायगड.


# क्लासिफाईड

## जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **बोअरवेल, विहीरीसाठी** इलेक्ट्रॉनिक मशीनद्वारे अचूक भूजल संशोधन म्हात्रे - ९२२६७६६१२९/९७६५४६५६६६
- **शुभमुहूर्त विवाह मंडळ** अलिबाग शाखेत सर्वजातीय प्रथमद्वितीय वधूवरांची नावनोंदणीसाठी ९२२६७६६१२९/९७६५४६५६६६
- **हॉस्पिटलमध्ये काम करण्यास हवे आहेत.** १) नर्स ANM/GNM २) नर्स PRIVATE NURSING COURSE ३) मुले/मुली १२ वी पास ४)X-Rayसाठी मुले ५) मावशी/आयाबाई आधारकार्ड व अनुभव असल्यास प्रमाणपत्र आणावे. अंजली हॉस्पिटल अलिबाग. ७७४५०५००२५/९११९५६५०२२/९३२१३०३९३८
- **मंगलग्रेन स्टोअर्स, बाजारपेठ,** अलिबाग येथे Packing व डिलेवरी व इतर कामासाठी मुल, मुली पाहिजेत. संपर्क :- ७८७५९९००९२
- **शर्वरी एंटरप्रायजेस चेंढरे-अलिबाग येथे सोलर**/इलेक्ट्रिकल दुकानात काम करण्यासाठी बारावी पास मुलगा पाहिजे. BA/BCom शिक्षण घेत असलेला सुद्धा चालेल. संपर्क : ७७५५९३२२२९
- **शिवाजी पेटशॉप अलिबाग /चोंढी**/ पेण येथे कामासाठी कमीत कमी १२ वी पास मुलगी पाहिजे. ९२७२३८३४७६

**जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९० / २२२७६१**


# मोकाट गुरांमुळे शेतकरी त्रस्त

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यातील चिरनेर, कळंबुसरे, पुनाडे, साई, दिघाटी, नागाव, केगाव यासह अन्य गावातील, शेतकरी वर्गाने आपआपल्या शेतात लागवड केलेल्या कडधान्य पिकास चांगलाच बहर आल्याने, शेतकरी वर्ग पुरता समाधानी झाला असला तरी जंगली वानरे व रानटी मोकाट गुरांमुळे येथील शेतकरी वर्ग पुरता चिंतेत पडला आहे. गुरांना पांगविण्यासाठी रात्रीचा जागता पहारा द्यावा लागत आहे. दीपावली सणानंतरही परतीचा पाऊस कायमच सक्रिय राहिल्याने शेतीमध्ये कडधान्य पिकांच्या लागवडीस बराच विलंब झाल्याने, चालू हंगामात कडधान्य पिकांबाबत थोडीशी साशंकतच होती.परंतु आपली शेती ओसाड ठेवून वाया घालविण्यापेक्षा शेतकरी वर्गाने वेळ उशिरा आपापल्या शेतात कडधान्य पिकांची लागवड केली. कडधान्य पिके चांगलीच बहरली असल्याचे पहावयास मिळत आहे. तर डिसेंबर जानेवारी मध्ये पडणाऱ्या दवबिंदूमुळे कडधान्य पिके फोफावली त्यातच अधूनमधून पडणारे धुकेही पिकांच्या लागवडीस पोषक ठरत असल्याचे विभागातील कृषीमित्र शेतकरी प्रफुल्ल खारपाटील, शेतकरी कृष्णा म्हात्रे, सचिन घबाडी, काशिनाथ घबाडी चंद्रकांत म्हात्रे, रमाकांत म्हात्रे, यांनी याबाबत माहिती देताना सांगितले. दरवर्षीप्रमाणे यावर्षीही शेतकरी वर्गाने आपआपल्या शेतात वाल, चवळी, हरभरे, मूग, मटकी, तूर, घेवडा आदी कडधान्य पिके घेतली आहेत. तर वेळ उशिरा की होईना सद्यस्थितीत कडधान्य पिके चांगलीच बहरली आहेत. तर चवळी, मूग, वाल व मटकीची पिके तयार होऊ लागली आहेत. दरम्यान पुढील काही दिवसांनी सर्वच कडधान्य पिके तयार होतील. मात्र, रानटी उनाड गुरांच्या व जंगली वानरांच्या त्रासामुळे शेतकरी वर्ग चिंतेत पडला असून, गुरे व वानरांच्या तावडीतून कडधान्य पिके वाचली तर अखेरच्या मोसमापर्यंत सर्वच पिकातून चांगले उत्पादन मिळेल अशी अशा शेतकरी वर्गाला वाटू लागली आहे.

# नंदनपाडा येथे आरोग्य तपासणी

**। पाताळगंगा । प्रतिनिधी ।**

लायन्स क्लब सातत्याने अनेक उपक्रम राबवित असताना आज एक पाऊल पुढे टाकत नंदन पाडा ग्रामस्थ व लायन्स क्लब खालापूर यांच्या वतीने न्यू-ईरा हॉस्पिटल वाशी व समर्पण रक्तपेढी घाटकोपर यांच्या संयुक्त विद्यमाने महाआरोग्य शिबीर राबविण्यात आले.

यावेळी या परिसरातील शेकडो ग्रामस्थांनी आरोग्य तपासणीसह रक्तदान केले. तसेच बीपी, शुगर, ईसीसी करण्यात आली. या कार्यक्रमाचे आयोजन लायन्स क्लब अध्यक्ष किशोर पाटील, यांच्या माध्यमातून करण्यात आले.

### जाहीर सुचना

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे पवेळे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील परिशिष्टात नमूद केलेल्या शेतजमिन मिळकतीमधील ०-१५-१० (हे.आर) शेतजमिन मिळकत श्री. वैभव किरण पाटील, राहणार झिराड, ता. अलिबाग यांच्या निर्वेध मालकी हक्काची असून, सदर शेतजमिन मिळकत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझ्या अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाचा करार सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला स्वाक्षरित झाला आहे. सदरील जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्या बाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

खालील परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या मिळकतीवरील श्री. वैभव किरण पाटील, यांच्या मालकी हक्काचा तपास करुन, मालकी हक्क निर्वेध असले बाबतचा दाखला त्यांस देणेचा आहे. तरी ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतीमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी, हे सर्वांस कळावे.

**वर नमूद केलेल्या मिळकतीचे परिशिष्ट**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| पवेळे, ता.अलिबाग, | ५१/४ | ०-८३-८० ०-०१-३० पो.ख. ०-८५-१० एकूण | ०७-१० |

सदरील शेतजमिन मिळकतीमधील श्री. वैभव किरण पाटील यांच्या मालकीची ०-१५-१० (हे. आर),आकार रू. १-३५ पैसे, ही शेतजमिन मिळकत.

अलिबाग,
दिनांक : २१/०२/२०२६

सही/-
**(ॲड.संजय म.भगत)**
हिराबाग सोसायटी,
अे विंग, टिळक रोड,
अलिबाग- रायगड.
खरेदीदारांचे वकील

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की खालील वर्णन केलेल्या शेतजमिन मिळकतीचे मालक श्री. राहुल राजेंद्र गुप्ता, मनिषा राजीव राजगरीया व निधी निकुंज खेमानी यांनी त्यांचे सामाईक मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जातील मिळकत आमचे अशिल यांना कायम स्वरूपी खरेदीखताने विकत देण्याचे ठरविले असून तशी बोलणी आमचे अशिलांचे बरोबर केलेली आहेत. मौजे - कवठेवाडी, तालुका- कर्जत, जिल्हा - रायगड ४१०२०१ येथील शेतजमिन मिळकत व त्या जमिनीमध्ये खालील वर्णन केलेली सर्व मिळकत :-

| भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.चौ.मी) | आकार (रू.पै) |
|---|---|---|
| १०/६ब | क्षेत्र ०.४८.०० हे.आर.चौमी पो ख क्षेत्र ०.०७ ०० हे.आर.चौमी असे एकुण ०.५५.०० हे.आर.चौमी व त्या मिळकतीत असलेले २ बीएचके बंगलो ग्रामपंचायत कशेळे घर क्र.११४१. | ०.३२ |

तरी शेतजमिन मिळकतीच्या बाबतीत कोणाचाही कुळवहिवाट, ताबा, वहीवाट, बयाणा, पावती, साठेकरार, गहाण, बोजा, बक्षीस, दान, जप्ती, लिज, अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा कायदेशिर हक्क, भारतातील कोणत्याही कोर्टाचे केसेस व मनाईहुकूम, करारनामा व इतर कोणतेही हितसंबंध असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ (सात) दिवसांचे आत खाली सही करणार वकील यांच्या नमुद केलेल्या कार्यालयाचे पत्त्यावर आपल्या हरकती लेखी पुराव्यासह देण्यात यावे. दिलेल्या मुदतीनंतर कोणाचीही हरकत आली तर ती हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्व जनतेने नोंद घ्यावी.

कर्जत
तारीख २२/०२/२०२६

सही /-
**ॲड.जगदिश पांडूरंग कराळे**
कार्यालय : गाळा नंबर १०, पंकज रेसिडेन्सी,
साई हॉस्पीटल जवळ, आगरी समाज हॉल
शेजारी धामोते. नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड
४१०१०१. मो. नं. ८३६९२१७३१३

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**



# कोंडगाव शाळेत संगणक कक्षाचे उद्घाटन

**नागोठणे** : रायगड जिल्हा परिषदेच्या नागोठण्याजवळील कोंडगाव प्राथमिक शाळेतील संगणक कक्षाचे उद्घाटन सुमित काते यांच्या हस्ते शुक्रवारी (दि.२०) झाले. याप्रसंगी कृष्णा धामणे, विजय धामणे, राजू धामणे, रामचंद्र धामणे, प्रभाकर धामणे, मंगेश बुरूमकर, नितेश धाडसे, नारायण खोपरे, कोंडगाव प्राथमिक शाळेच्या सुषमा भटकर, शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्ष दिपाली बुरमकर, शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष सुहास मालुसरे, अंगणवाडी शिक्षिका रसिका धामणे, अंगणवाडी सेविका ममता वाघ, दीपिका बुरुमकर आदींसह ग्रामस्थ यावेळी उपस्थित होते. यावेळी सुषमा भटकर यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानले.


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**




## राशीभविष्य

- **मेष** : महत्त्वाच्या कामांना विलंब लागेल. कौटुंबिक वाद-विवाद संभवतात. विद्यार्थ्यांना अडचणी येतील.
- **वृषभ** : सुवार्ता कानी येईल. नोकरीत वरिष्ठांची मर्जी संपादन कराल. व्यवसायात उन्नतीचे योग आहेत.
- **मिथुन** : कामासाठी बरीच धावपळ होईल. वाहन जपून चालवावं. स्थावर प्रश्न तडजोडीनं मार्गी लागतील.
- **कर्क** : दिलासादायक घटना घडतील. सरकारी कामांना गती येईल. आपापल्या क्षेत्रात प्रभाव पाडू शकाल.
- **सिंह** : कौटुंबिक समस्या निर्माण होतील. जुनी दुखणी उद्‌भवतील. कर्ज प्रकरणात दिलासा मिळेल.
- **कन्या** : व्यवसायात बदल हितकर ठरतील. महत्त्वाच्या भेटीतून लाभ होईल. प्रवासात काळजी घ्यावी.
- **तूळ** : नोकरीत बदलाचा विचार होईल. विद्यार्थ्यांची विद्याभ्यासात प्रगती होईल. धार्मिक यात्रा घडेल.
- **वृश्चिक** : मनाजोग्या घटना घडतील. चैनीवर अधिक खर्च होईल. जमीन व्यवहाराची बोलणी सफल होतील.
- **धनु** : व्यवसायाचा व्याप वाढेल. अंगभूत कला-गुणांचा विकास होईल. सरकारी कामांना चालना मिळेल.
- **मकर** : चिंता वाढवणाऱ्या घटना संभवतात. संयम बाळगणं हिताचं ठरेल. कुलदेवतेची उपासना करावी.
- **कुंभ** : नोकरीत नव्या जबाबदाऱ्या येतील. विमा, स्थापत्य क्षेत्रात संधी लाभतील. मानसिक लाभेल.
- **मीन** : आपापल्या क्षेत्रात उत्तम कामगिरी होईल. व्यवयासात जुनी येणी वसूल होतील. आनंदी रहाल.

## २२ फेब्रुवारी

दिनविशेष

- १९३१ : रत्नागिरीत पतितपावन मंदिराचे उद्‌घाटन.
- १९४४ : महात्मा गांधी यांच्या पत्नी कस्तुरबा गांधी यांचे निधन.
- १९५८ : स्वातंत्र्यलढ्यातील थोर नेते अब्दुल कलाम आझाद यांचा मृत्यू.
- २०१४ : विविध मागण्या मान्य न झाल्यास देशव्यापी संपावर जाण्याचा गॅस वितरकांचा इशारा.
- २०१८ : मधू मंगेश कर्णिक यांना कविवर्य विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्कार जाहीर.

## नवउद्यमींना नवे बळ

उद्योग वार्ता

राज्यात येणारे उद्योग इतर राज्यात जात असल्याच्या आरोपावरून मध्यंतरी राजकीय वातावरण अधिक तापले असल्याचे पाहायला मिळते. नवीन उद्योजकांना राज्यात आणण्यासाठी सरकार कमी पडल्याचा आरोप विरोधक करत आहे. एकीकडे हा वाद सुरू असतानाच आता नवीन उद्योग राज्यात आणण्यासाठी प्रशासनाने जोरदार प्रयत्न सुरु केले आहेत. आता नवीन उद्योजकांसाठी राज्यात 'एक खिडकी' योजना राबवली जाणार असून एकाच ठिकाणी आणि एकाच महिन्यात नवीन उद्योजकांना परवानग्या मिळणार आहेत. आज देशाच्या जीडीपीमध्ये महाराष्ट्राचा वाटा मोठा आहे. यामध्ये निर्यात इनोव्हेशन, पायाभूत सुविधा, उद्योग, नोकऱ्या अशा सर्व गोष्टींबाबत महाराष्ट्र पहिल्या स्थानावर आहे, त्याचे श्रेय उद्योजकांना जाते. यामध्ये वाढ होण्यासाठी उद्योजकांशी संवाद वाढवून एक खिडकी योजनेची पद्धत निर्माण करण्यात येत असून त्याचे लवकरच कायद्यामध्ये रूपांतर केले जाणार आहे. एक खिडकी योजनेतून नवीन उद्योजकांसाठी आणि उद्योगांसाठी लागणाऱ्या सर्व परवानग्या एकाच ठिकाणी एक महिन्यात मिळणार आहेत. राज्य शासनाने प्रत्येक विभागात उद्योग व्यवसाय वाढवण्यासाठी तसेच त्याद्वारे बेरोजगारांना संधी मिळण्याच्या उद्देशाने पावले उचलली आहेत. त्याचाच भाग म्हणून किचकट अटी आणि उद्योजकांना येणाऱ्या अडचणी दूर करून जुन्या नियमांमध्ये सुधारणा करण्यासाठी उद्योजकांकडून सूचना मागवून त्यामध्ये बदल करण्याचा निर्णय घेतला आहे.



## मॅनेजमेंटचे नवे पर्याय

कोण होणार?

अनेकांना एमबीए करायचं असतं. एमबीए म्हटलं की विशिष्ट क्षेत्रच आपल्या समोर येतात. पण सध्याच्या काळात विविध ३० क्षेत्रांमध्ये तुम्ही एमबीए पदवी मिळवू शकता. त्यापैकीच काही वेगळ्या क्षेत्रांची ओळख करून घेऊ या.

* मार्केटिंगसारख्या क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी बऱ्याच कौशल्यांची गरज असते. संवादकौशल्यं, वैचारिक क्षमता आणि कल्पकता यांच्या बळावर तुम्ही मार्केटिंगमध्ये पुढे जाऊ शकता. 'कम्युनिकेशन मॅनेजमेंट' सारख्या क्षेत्रात एमबीए केल्यानंतर एडव्हरटायजिंग, ब्रँड कम्युनिकेशन, पब्लिक रिलेशन्स, मीडिया व मनोरंजन मॅनेजमेंट, मार्केटिंग व डिजिटल मार्केटिंगसारख्या कम्युनिकेशनवर आधारित क्षेत्रांमध्ये पुढे जाऊ शकता. या अभ्यासक्रमामुळे तुमच्यात संवादकौशल्यं विकसित होतात.

* फॅशन आणि लक्झरी ब्रँड्सचं क्षेत्र खूप विस्तारत आहे. या ब्रँड्सच्या उत्पादनांना जगभरातून मागणी असते. सध्या महागड्या आणि जागतिक स्तरावरच्या ब्रँड्सना कुशल तज्ज्ञांची गरज असते. **(क्रमश:)**

## मायक्रोकरंट फेशियलविषयी...

ब्युटी ट्रेंड्स

फॅशनप्रमाणेच सौंदर्याच्या क्षेत्रातही निरनिराळे ट्रेंड येतात. चेहऱ्याची काळजी घेणाऱ्या महिला नित्यनेमाने फेशियल करतात. फेशियलचे विविध प्रकार आहेत. त्यातच आता भर पडली आहे ती मायक्रोकरंट फेशियलची. मायक्रोकरंट फेशियल हा सौंदर्य क्षेत्रातला सध्याचा हिट ट्रेंड आहे. यामुळे चेहरा उजळतो. सुरकुत्या आणि डाग कमी झाल्याने त्वचा नितळ आणि टवटवीत दिसू लागते.

फेशियलच्या या प्रकारामुळे चेहऱ्याच्या स्नायूंना उभारी मिळते. त्वचेचा पोत सुधारतो. इतर फेशियल्सच्या तुलनेत याचं वेगळेपण सांगायचं तर यात काही उपकरणं आणि केमिकलयुक्त प्रॉडक्ट्सचा वापर होतो. असं असलं तरी ही वेदनारहित सौंदर्यसाधना आहे. त्यामुळे घाबरून जायचं काहीच कारण नाही.

डेर्मेटोलॉजिस्ट म्हणजे त्वचा तज्ज्ञ ही सेवा पुरवतात. मायक्रोकरंट फेशियल तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली करणं योग्य ठरतं. हे फेशियलची सुरूवात क्लिंजिंग म्हणजे चेहऱ्याच्या स्वच्छतेने होते. यानंतर भिंग घेऊन डॉक्टर त्वचेची तपासणी करतात. **(क्रमश:)**

## पंचांग

**रविवार, २२ फेब्रुवारी २०२६**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७,
फाल्गुन शु. ५, चंद्रराशी : मेष,
नक्षत्र : अश्विनी, योग : शुक्ल,
सूर्योदय ७.०५, सूर्यास्त ६.४०

## फॉरवर्डस

**वक़्त क़े साथ वो सारें समंदर नाप लियें जायेंगें...**

**जो अपनें आप क़ो ग़हरा होनें क़ा दावा करतें हैं...!**

## फॅशन पॅशन

* सँडल्स किंवा स्निकर्सही अजिबात घालू नका. सँडलमध्ये पाय उघडे राहतात. ते अजिबात चांगलं दिसत नाही.

* टॅटू शक्यतो दर्शनी भागावर काढून घेऊ नका. टॅटू काढले असतील तर ते झाकणारे कपडे घाला. पिअर्सिंग केलं असेल तर तेही लपवा. इंटरव्ह्यू घेणाऱ्याचे विचार, दृष्टिकोन आपल्याला माहित नसतो. त्याला हे सगळं विचित्र वाटू शकतं. त्यामुळे अशा वेळी साधा फॉर्मल लूक करणं योग्य ठरतं.

## व्हा ॲग्रीकल्चर इंजिनिअर

करिअरवाटा

दोस्तांनो, वाढत्या लोकसंख्येच्या मानाने येत्या काळात भारतीय बाजारपेठेत अन्नधान्याच्या मागणीत प्रचंड वाढ होणार आहे. २० वर्षांनंतर भारतीय बाजारात ३४५ दशलक्ष टन धान्याची गरज लागेल. अन्नधान्याची ही गरज भागवण्यासाठी धान्य उत्पादनात दर वर्षी ५.५ दशलक्ष टनांची वाढ व्हायला हवी. यासाठी कृषी क्षेत्रात नवतंत्रज्ञानावर भर दिला जात आहे. हे लक्षात घेऊन देशात कृषीक्षेत्राशी संबंधित नव्या ३६६ कंपन्या सुरू झाल्या. साहजिक या कंपन्यांमध्ये कृषी पदवीधरांना संधी उपलब्ध होत आहे. या संधीचा लाभ घेत ॲग्रीकल्चरल इंजिनिअरींग करून उत्तम करिअर घडवू शकता.



ॲग्रीकल्चलर इंजिनिअरींग ही इंजिनिअरींगचीच एक शाखा आहे. या अभ्यासक्रमातला यामध्ये पदवी मिळवल्यानंतर पुढे प्रोसेसिंग अँड फूड इंजिनिअरींग, सॉईल अँड वॉटर इंजिनिअरींग, फार्म मशिनरी अँड पॉवर इंजिनिअरींगमध्ये नैपुण्य मिळवता येऊ शकतं. ॲग्रीकल्चरल इंजिनिअरींग केल्यानंतर खाजगी आणि सरकारी क्षेत्रात संधी मिळू शकते. ऑटोमोबाईल, प्रोसेसिंग अँड फूड, सिंचन उपकरणांची निर्मिती करणाऱ्या कंपन्या या ठिकाणी नोकरी मिळू शकते. क्रॉप इंजिनिअर, ॲग्रीकल्चर इन्स्पेक्टर, ॲग्रीकल्चर स्पेशालिस्ट, फार्म शॉप मॅनेजर, पर्यावरण नियंत्रण इंजिनिअर, फूड सुपरवायझर, प्लांट सायकोलॉजिस्ट्स, मायक्रोबायोलॉजिस्ट्स अशा पदांवर तुम्ही काम करू शकता.

## कौन बनेगा करोडपती

खेचाखेची

एका मंत्र्यांची बायको त्यांना म्हणाली, 'तुम्ही कौन बनेगा करोडपती हा खेळ उलटा खेळता...'

.
.
.
.
.

आधी करोडो रुपये मिळवता आणि नंतर सगळी उत्तरे देत बसता!

## वेगळं काही

२०१३ मध्ये हे बेट ७.१ रिश्टर स्केलच्या भूकंपाने हादरलं. यामुळे इथली जमीन जवळपास एक मीटरपर्यंत खचली. यामुळे भरतीचं पाणी लोकांच्या घरात शिरू लागलं. भविष्यात इथली अनेक बेटं पाण्याखाली जाण्याची शक्यता व्यक्त होत आहे. अर्थात घरात शिरलेल्या समुद्राच्या पाण्यापासून घरातल्या वस्तू सुरक्षित ठेवण्यासाठी बऱ्याच उपाययोजनाही करण्यात आल्या आहेत. शाळांमध्ये दप्तरं ठेवण्यासाठी कपाटं तयार करण्यात आली असून फर्निचर भिजू नये म्हणून त्यांचे पाय थोडे लांब करण्यात आले आहेत. या पाण्यामुळे काही समस्याही निर्माण झाल्या आहेत. इतक्या प्रतिकूल परिस्थितीतही इथल्या लोकांना बेटावरच रहायचं आहे.

## ट्रेंड रफल साड्यांचा

स्टाईल स्टेटमेंट

मैत्रिणींनो, सध्या मॉडर्न, इंडो-वेस्टर्न लूक देणाऱ्या साड्यांची बरीच चलती आहे. मधल्या काळात लेहंगा साडीची बरीच चलती होती. धोती स्टाईल,पँट स्टाईल साडीही चर्चेत होती. आता रफल साड्यांचा ट्रेंड आहे. रफल साडी खूप स्टायलिश दिसते. नव्या जमान्याच्या नवरीसाठी 'इंडो-वेस्टर्न' स्टाईलची ही साडी बेस्ट ठरते. ही स्टाईल करण्याच्या काही टिप्स...

* रफल साडी प्लेन, डिझायनर, प्रिंटेड अशा विविध प्रकारांमध्ये उपलब्ध आहे. यावर बेल्ट लावल्याने तिचा लूक अधिक खुलतो. कोणत्याही साडीवर बेल्ट लावता येईल.

* लग्नाआधीच्या समारंभांसाठी फ्रीलवाली रफल साडी चांगला पर्याय ठरेल. साडीचा हा प्रकार कोणत्याही ऑकेजनला चालून जाईल.

* इव्हिनिंग गाउन स्टाईल रफल साडीही खूप छान दिसते. रिसेप्शनला ही साडी नेसता येईल. वेगळं कॅरी करायचं समाधान मिळेल.

* कमी वजनाच्या रफल साड्याही खूप आरामदायी असतात. त्या तुम्हाला हटके लूकही मिळवून देतात.

* लेहंगा स्टाईल रफल साडी हा प्रकार मेहंदी, संगीत सोहळ्याची शान ठरेल.



## सुडोकू ६८

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ७ | २ | | ९ | | | | ३ | ६ |
| | ३ | | ६ | | | | | ७ |
| | ९ | | | ३ | ४ | २ | १ | |
| | | ७ | ५ | ६ | | | | ९ |
| ५ | ४ | | | ९ | | | ७ | ८ |
| ९ | | | | ४ | ७ | १ | | |
| | ७ | २ | १ | ८ | | | ९ | |
| ४ | | | | | ९ | | ६ | |
| ६ | १ | | | | ५ | | २ | ३ |

टीप -
* या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ ह ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
* आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
* अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू ६७चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ९ | ८ | १ | ५ | २ | ३ | ७ | ६ | ४ |
| २ | ३ | ६ | ९ | ७ | ४ | १ | ८ | ५ |
| ५ | ४ | ७ | ८ | १ | ६ | ९ | २ | ३ |
| ६ | ५ | ८ | १ | ४ | ९ | ३ | ७ | २ |
| ७ | ९ | ३ | २ | ५ | ८ | ४ | १ | ६ |
| १ | २ | ४ | ६ | ३ | ७ | ५ | ९ | ८ |
| ३ | ६ | २ | ७ | ९ | ५ | ८ | ४ | १ |
| ४ | १ | ९ | ३ | ८ | २ | ६ | ५ | ७ |
| ८ | ७ | ५ | ४ | ६ | १ | २ | ३ | ९ |

## शब्दकोडे क्रमांक ६८

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ■ | ४ | | | ■ | ५ | ६ | ७ | ■ | ८ | | ■ |
| ९ | | | ■ | | ■ | ■ | १० | ■ | ११ | | १२ | | ■ | १३ |
| | ■ | १४ | | | ■ | १५ | | १६ | | ■ | १७ | | १८ | |
| ■ | १९ | | ■ | ■ | २० | | ■ | २१ | | ■ | | ■ | २२ | |
| ■ | ■ | | ■ | २३ | | ■ | २४ | | | २५ | ■ | २६ | | ■ |
| २७ | २८ | ■ | २९ | ■ | | ■ | ■ | | ■ | ३० | ३१ | ■ | ३२ | ३३ |
| ३४ | | ३५ | | ३६ | | | ■ | ३७ | ३८ | | | ३९ | ■ | |
| | ■ | | ■ | | ■ | ■ | ४० | ■ | | ■ | ४१ | | ■ | |
| ■ | ■ | ४२ | ४३ | | ■ | ४४ | | ■ | ४५ | ४६ | | ■ | ४७ | |
| ४८ | ४९ | | | ■ | ५० | | | ५१ | ■ | ५२ | | ■ | | ■ |
| ■ | ५३ | | ■ | ५४ | ■ | ■ | ५५ | | ■ | | ■ | ५६ | | ५७ |
| ५८ | | ■ | ५९ | | | ६० | ■ | ६१ | ६२ | | ■ | | ■ | |
| ६३ | | ६४ | | | ■ | | ■ | ६५ | | ■ | ६६ | | | |
| | ■ | ६७ | | ■ | ६८ | | ६९ | ■ | ७० | | | | ■ | ■ |
| ७१ | | | | | | ■ | ७२ | | | ■ | | ■ | ७३ | |

**आडवे शब्द :-**
१) गावातील जुनी वस्ती
४) गणपतीचे एक नाव
५) बारीक खडा (हिं.)
८) पाय, चरण
९) ठाणवई
११) धमकी
१४) खुमारी
१५) पुरुषश्रेष्ठ
१७) धान्य कुटण्याचे घरगुती जोड साधन
१९) जुनेच्या विरुद्ध
२०) गुणाकार
२१) नेहमी
२२) कशा प्रकारचा
२३) नवऱ्याचा भाऊ
२४) अंबट-गोड चवीचे एक मोठे फळ
२६) अंकुर
२७) कुंभाराची भट्टी
३०) लहान बाळ
३२) रेशमी धोतर
३४) युद्ध करताना आलेला मृत्यू
३७) जिवंत असे तोवर
४१) पावसाची झड
४२) खाटीक
४४) अभिप्राय
४५) ताबा, अंमल
४७) भूपती
४८) मवाळ धोरण
५०) दासबोध लिहिणारे संत
५२) गमन करणे
५३) अंत:करण
५५) एक श्वास रोग
५६) गणपतीचे एक नाव
५८) मौज
५९) सूट
६१) पळणे
६३) खळबळजनक
६५) तोटी
६६) प्रतिवर्षी
६७) सापाने टाकलेली त्वचा
६८) मर्कट
७०) वस्ती
७१) सर्वस्व
७२) विष
७३) फिकीर, काळजी

**उभे शब्द :-**
१) कसब असलेला
२) सारखा
३) स्त्रीलंपट
४) एक ऋतू
६) कदर करणारा
७) दारूचा एक प्रकार
८) ग्रामप्रमुख
१०) चंद्राची कड
१२) येऊन पोहोचणे
१३) साखरेची फुगीर वडी
१५) अभिनेता
१६) उसनवार
१८) बडबड
२०) दुर्दशा
२५) जमाव, गट
२७) टेका, आश्रय
२८) मरुत, पवन
२९) मतलबी, अप्पलपोट्या
३१) नाश पावणे
३३) दार
३५) धनुष्य बाण
३६) एक फळ
३८) कापडाचा एक प्रकार
३९) होडी
४०) संपत्ती
४३) साय, मलई, स्वामी
४४) राघव
४६) हडसून-खडसून सांगणे
४७) कष्टकरणे
४९) मुसलमानांचा उपवासाचा महिना
५१) संतोष
५४) डोक्याचे हाड
५६) चूक
५७) शहर, गाव
५८) सूट
५९) शाश्वत, चिरंतन
६०) पूजा साहित्याचे ताट
६२) सततची हालचाल
६४) मनात हेतू धरुन केलेले काम
६६) धैर्य
६८) गळ्यामागचा अवयव
६९) भय, भीती, शंका, झडप

(उत्तर उद्याच्या अंकात)

## मागील शब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| तू | सु | ख | क | र्ता | तू | दुः | ख | ह | र्ता | ■ | हं | ब | र | डा |
| ■ | द | र | ड | ■ | ■ | ख | ■ | ज | ■ | ख | डा | ■ | ख | स |
| ■ | र्श | ■ | क | पा | र | ■ | स | र | ब | त | ■ | हे | वा | ■ |
| मा | न | व | ■ | य | ज | मा | न | ■ | द | रा | रा | ■ | ल | वा |
| ■ | च | र | च | री | त | ■ | द | श | क | ■ | रा | म | दा | स |
| च | क्र | ■ | क | ■ | म | ■ | शी | र | ■ | पा | ■ | ग | र | ■ |
| ल | ■ | स | म | ■ | हो | का | र | ■ | ध | न | ग | र | ■ | व |
| न | फा | ■ | क | ■ | त्स | ■ | ■ | का | म | गा | र | ■ | स | खा |
| व | र | ■ | ■ | आ | व | क | जा | व | क | ■ | म | धु | क | र |
| ल | क | वा | ■ | णि | ■ | प | र | का | ■ | सा | ■ | र | स | ■ |
| न | त | म | स्त | क | ■ | डा | ■ | व | त | न | ■ | क | ■ | मा |
| ■ | ■ | ना | व | ■ | क | ल | ■ | ■ | या | क | ■ | ट | पा | ल |
| उ | प | व | न | ■ | स | त्ता | धि | का | री | ■ | सु | ■ | ट | क |
| जे | ■ | ता | ■ | त | र | ■ | क्का | ■ | नि | शि | गं | ध | ■ | ■ |
| ड | ब | र | ■ | म | त | दा | र | ■ | शी | ■ | ध | ड | ध | ड |

एका वर्षाच्या काळात भारताचा पुरुष टी-२० संघ, महिला संघ आणि युवा क्रिकेटपटूंच्या संघाने विश्वचषक विजेतेपद पटकावणे या ट्रिपल क्राउन कामगिरीला एका सुवर्णयुगाची सुरुवात म्हणून गौरवण्यात येत आहे. या संपूर्ण वर्चस्वामुळे भारतीय क्रिकेटमध्ये संरचनात्मक आणि सांस्कृतिक बदल घडण्याची अपेक्षा आहे. यातून क्रिकेटमध्ये भारत नवनवे विक्रम प्रस्थापित करेलच, पण अजोड स्थानीही पोहोचेल.

# जल्लोश ट्रिपल क्राउन व्हिक्टरी!

**शंतनु चिंचाळकर**

भारताच्या पुरुष संघाने आणि महिला संघाने टी ट्वेंटी विश्वचषक जिंकल्यानंतर, १९ वर्षांखालील युवकांच्या क्रिकेट संघाने झिम्बाब्वेमधील हरारे स्पोर्ट्स क्लब येथे झालेल्या ५० षटकांच्या रोमांचक सामन्यात इंग्लंडचा पराभव करून विक्रमी सहावे विश्वचषक विजेतेपद पटकावले. सुरुवातीला एक विकेट गमावल्यानंतर वैभव सूर्यवंशीच्या ऐतिहासिक वादळी खेळीने भारताचा डाव गाजवला. कर्णधार आयुष म्हात्रे (५३) आणि अभिज्ञान कुंडू (४०) यांनी त्याला चांगली साथ दिली, तर कनिष्क चौहानने (नाबाद ३७) अखेरीस फटकेबाजी केली. संघाच्या संयमाचे कौतुक झाले. ॲरॉन जॉर्ज आणि आयुष म्हात्रे यांसारख्या खेळाडूंनी वेगवेगळ्या सामन्यांमध्ये चांगली कामगिरी केली. त्यांना सातत्याने बळी घेणाऱ्या प्रभावी गोलंदाजी विभागाची साथ मिळाली. भारताने संपूर्ण स्पर्धेत अपराजित राहून सामने सुरू असलेल्या नामिबिया आणि झिम्बाब्वे दोन्ही ठिकाणी आपले वर्चस्व दाखवले. उपांत्य फेरीत भारताने अफगाणिस्तानविरुद्ध ३१० धावांचे लक्ष्य यशस्वीरित्या गाठले. स्पर्धेत यापूर्वी त्यांनी कट्टर प्रतिस्पर्धी पाकिस्तानवर ५८ धावांनी उल्लेखनीय विजय मिळवला होता. या संपूर्ण स्पर्धेत भारताचे क्षेत्ररक्षण उत्कृष्ट दर्जाचे होते. अनेक अर्धवट संधींचे विकेट्समध्ये रूपांतर करण्यात आले. यामुळे संघ पूर्णपणे एकाग्र आहे आणि आपल्या गोलंदाजांना पाठिंबा देत आहे, हे पहायला मिळाले. यातूनच भारतीय संघाचा जागतिक किर्तीचा संघ बनण्याचा प्रवास नव्या टप्प्यामध्ये पोहोचतो.

अंतिम सामन्यात भारताने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आणि ५० षटकांमध्ये ९ गडी गमावून ४११ धावांचा डोंगर उभारला, जो १९ वर्षांखालील विश्वचषक अंतिम सामन्यातील आतापर्यंतची सर्वोच्च धावसंख्या ठरला. इंग्लंडने कडवी झुंज दिली, परंतु त्यांचा डाव ४०.२ षटकांमध्ये सर्वबाद ३११ धावांवर संपुष्टात आला. यामुळे भारताला शंभर धावांनी विजय मिळाला. इंग्लंडला भारताच्या गोलंदाजीसमोर संघर्ष करावा लागला. कॅलेब फाल्कनरने एकाकी झुंज देत ६७ चेंडूंमध्ये शानदार ११५ धावा केल्या, परंतु मधल्या फळीतील फलंदाजांच्या घसरणीमुळे त्यांनी केवळ तीन धावांमध्ये चार विकेट गमावल्या. तिथेच त्यांच्या विजयाच्या आशा संपुष्टात आल्या. आर. एस. अंबरीश ५६ धावांमध्ये तीन बळी घेऊन भारतीय गोलंदाजांमध्ये सर्वात यशस्वी ठरला, तर कनिष्क चौहान आणि दीपेश देवेंद्रन यांनी महत्त्वपूर्ण वेळी बळी मिळवून दिले. १४ वर्षीय सनसनाटी खेळाडू वैभव सूर्यवंशी स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडू ठरला. त्याने अंतिम सामन्यातील सर्वोत्तम खेळाडू आणि स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडू हे दोन्ही पुरस्कार जिंकले. अंतिम सामन्यात त्याने केवळ ८० चेंडूंमध्ये १७५ धावांची धडाकेबाज खेळी केली आणि १९ वर्षांखालील विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यातील सर्वोच्च वैयक्तिक धावसंख्येचा विक्रम प्रस्थापित केला. त्याच्या खेळीमध्ये १५ चौकार आणि १५ षटकारांचा समावेश होता. हा एका युवा एकदिवसीय सामन्यातील सर्वाधिक षटकारांचा विक्रम ठरला. पूर्ण स्पर्धेदरम्यान त्याने ६२.७१ च्या सरासरीने आणि १६९.४९ च्या स्ट्राइक रेटने ४३९ धावा करून, सर्वाधिक धावा करणाऱ्या खेळाडूंमध्ये दुसरे स्थान पटकावले.





वैभवने १९ वर्षांखालील विश्वचषकाच्या इतिहासातील ५५ चेंडूत दुसरे सर्वात वेगवान शतक झळकावले. या वयोगटातील क्रिकेटमध्ये शंभरपेक्षा जास्त षटकार मारणारा तो पहिला खेळाडू ठरला. अंतिम सामन्यातील त्याच्या १५ षटकारांनी एका डावातील १२ षटकारांचा पूर्वीचा विक्रम मोडला. ६ फेब्रुवारी हा भारतीय क्रिकेटसाठी एक ऐतिहासिक दिवस होता. वैभव सूर्यवंशीची कामगिरी, विशेषतः १४ वर्षांच्या मुलासाठी, एखाद्या दंतकथेपेक्षा कमी नव्हती. अंतिम सामन्यातील पराक्रमापूर्वी त्याने अफगाणिस्तान विरुद्धच्या उपांत्य फेरीच्या सामन्यातही महत्त्वाची भूमिका बजावली. त्यात त्याने दडपणाच्या परिस्थितीत ३३ चेंडूंमध्ये ६८ धावा केल्या. अंतिम सामन्यातील एक मनोरंजक तथ्य म्हणजे वैभव सूर्यवंशीने ४३९ धावांसह स्पर्धेचा शेवट केला आणि गोल्डन बॅटसाठी तो इंग्लंडच्या बेन मेयसपेक्षा (४४४ धावा) फक्त ५ धावांनी मागे राहिला. तथापि, त्याच्या स्फोटक स्ट्राईक रेटमुळे आणि अंतिम सामन्यातील विक्रमी १७५ धावांच्या खेळीमुळे त्याला 'प्लेअर ऑफ द टूर्नामेंट'चा सन्मान मिळाला. अंतिम सामन्यातल्या विजयासाठी कर्णधार आयुष म्हात्रेने ५३ धावा, यष्टिरक्षक अभिज्ञान कुंडूने ४० धावा तर कनिष्क चौहानने नाबाद ३७ धावा काढत मोलाची साथ दिली. इंग्लंडकडून गोलंदाजी करणाऱ्या जेम्स मिंटोने ६३ धावांमध्ये तीन, ॲलेक्स ग्रीनने ४९ धावांमध्ये दोन आणि सेब मॉर्गनने ७४ धावांमध्ये दोन गडी बाद केले.

भारताने नामिबिया आणि झिम्बाब्वेमधील स्पर्धेत विविध मैदानांवर प्रत्येक टप्प्यात आपली ताकद दाखवत, स्पर्धेत अपराजित राहून विजेतेपद पटकावले. संघाने आपल्या गटात वर्चस्व गाजवताना बांगलादेश आणि झिम्बाब्वेसारख्या संघांविरुद्ध मोठे विजय नोंदवले. सातत्याने उच्च स्ट्राइक रेटने धावा करण्याची किंवा लक्ष्याचा पाठलाग करण्याची क्षमता भारतीय युवा क्रिकेटपटूंना सुरुवातीपासूनच इतरांपेक्षा वेगळे ठरवत होती. स्पर्धेदरम्यान संपूर्ण संघाने योगदान दिले असले तरी ही स्पर्धा १४ वर्षीय वैभव सूर्यवंशीच्या उदयासाठी स्मरणात राहील. त्याने 'प्लेअर ऑफ द टूर्नामेंट'चा पुरस्कार पटकावला आणि एकाच अंडर १९ विश्वचषक स्पर्धेत सर्वाधिक षटकारांचा विक्रम मोडीत काढला. हेनिल पटेल आणि आर. एस. अंबरीशसारखे गोलंदाज संपूर्ण बाद फेरीच्या सामन्यांमध्ये महत्त्वपूर्ण ठरले. जेव्हा जेव्हा प्रतिस्पर्धी संघाने चांगली भागीदारी उभारण्याचा प्रयत्न केला, तेव्हा त्यांनी निर्णायक क्षणी बळी मिळवून दिले. भारतीय संघाचा हा विजय तरुण भारताच्या आत्म्याचा एक शक्तिशाली संकेत आहे. 'महत्त्वाकांक्षेत निर्भयता, सांघिक कार्यात एकजूट आणि उत्कृष्टतेच्या शोधात अथक मेहनत घेण्याचे हे फळ आहे' या शब्दांमध्ये नीता अंबानी यांनी भारताच्या विजयाचे वर्णन केले. कारण भारत मागील आवृत्त्यांच्या तुलनेत अधिक आक्रमक क्रिकेट खेळला. २०२६ आणि २०२२ च्या संघांची तुलना केल्यास २०२२ चा संघ शांत स्वभावासाठी ओळखला जात होता. तो अनेकदा तांत्रिक अचूकतेने लक्ष्याचा पाठलाग करत असे किंवा भक्कम धावसंख्या उभारून देत असे. याउलट, २०२६ च्या संघाने पॉवर गेमची व्याख्याच बदलली.

२०२२ चा संघ एक संतुलित संघ होता, जिथे धुल, बावा, रशीद, ओस्तवाल सारख्या खेळाडूंनी वेगवेगळ्या वेळी चांगली कामगिरी केली. २०२६ चा संघ मजबूत असला तरी, त्यावर सूर्यवंशीच्या वादळाचे वर्चस्व होते. त्याने ४३९ धावा आणि ३० षटकारांसह स्पर्धा पूर्ण केली आणि जागतिक क्रिकेटमधील सर्वात चर्चेतील किशोरवयीन खेळाडू बनला. भारताने २०२६ ची स्पर्धा अपराजित राहून संपवली. २०२२ मध्येही असेच घडले होते. हे दोन्ही स्पर्धांमधील साम्य आणि वैशिष्ट्य म्हणावे लागेल. एकाच वेळी भारताच्या पुरुष टी-२०, महिला आणि युवा संघांनी विश्वचषक विजेतेपद पटकावणे या ट्रिपल क्राउन कामगिरीला एका सुवर्णयुगाची सुरुवात म्हणून गौरवण्यात येत आहे. या संपूर्ण वर्चस्वामुळे खेळाची नव्याने व्याख्या करणारे संरचनात्मक आणि सांस्कृतिक बदल घडण्याची अपेक्षा आहे. जागतिक विजेतेपदे पटकावल्यानंतर, बीसीसीआयने विजेतेपदाच्या कामगिरीबद्दल प्रचंड आर्थिक प्रोत्साहन देऊन गौरव करण्याची परंपरा कायम राखली. आयसीसी अंडर-१९ विश्वचषकाला विकास स्पर्धा मानत असल्याने अधिकृत बक्षीस रक्कम देत नसली तरी, बीसीसीआय त्याची उणीव पुरेपूर भरून काढते. युवा पुरुष २०२६ च्या संघातील प्रत्येक खेळाडूच्या मानधनाबद्दलची अधिकृत घोषणा येत्या काही दिवसांमध्ये अपेक्षित असली तरी, मागील विजय आणि सध्याच्या अंदाजानुसार एक निकष निश्चित करण्यात आला आहे. त्यानुसार संघ आणि सहाय्यक कर्मचाऱ्यांमध्ये अंदाजे एकूण पाच कोटी रुपयांचा निधी विभागला जाईल. २०२२ च्या विजयासाठी, खेळाडूंना प्रत्येकी ४० लाख तर सहाय्यक कर्मचाऱ्यांना २५ लाख रुपये मिळाले होते.

ताज्या विजयाचे विक्रमी स्वरूप पाहता जाणकारांना बक्षिसाचे आकडे वाढण्याची अपेक्षा वाटत आहे. संघाच्या बक्षिसातील वैयक्तिक वाट्याव्यतिरिक्त प्लेअर ऑफ द टूर्नामेंट म्हणून वैभव सूर्यवंशीला वैयक्तिक ट्रॉफी मिळाल्या आहेत आणि त्याच्या ब्रँड मूल्यामध्ये मोठी वाढ होण्याची अपेक्षा आहे. यामुळे त्याच्या आधीच ऐतिहासिक असलेल्या आयपीएल करारात आणखी भर पडेल.

## दहावीची लढाई कागदी घोडदौड की आयुष्याची पूर्वतयारी?



**धनंजय शेटये**

दहावी हा केवळ अभ्यासक्रमाचा टप्पा नाही; ती कोवळ्या स्वप्नांची पहिली कसोटी आहे, पहिल्या उड्डाणापूर्वीचा धावपट्टीवरील वेग आहे. एकेकाळी उन्हाळ्याची सुट्टी म्हणजे आजीच्या गावच्या विहिरीवरचे पाणी, आंब्याच्या बागेतला सुगंध आणि मोकळ्या आकाशाखालील खेळ. पण आज १५ एप्रिल उजाडताच 'व्हेकेशन बॅच'च्या नावाने पुस्तकांच्या गठ्ठ्याखाली स्वप्नांची पाखरे दडपली जातात. जूनमध्ये शैक्षणिक वर्ष सुरू होत असले, तरी दहावीच्या 'महायुद्धाची' रणधुमाळी एप्रिलपासूनच सुरू होते. नकळत विद्यार्थ्यांच्या मनावर अपेक्षांचे, तुलना-तक्रारींचे आणि गुणांच्या स्पर्धेचे अदृश्य ओझे ठेवले जाते.

काळ बदलला, पद्धती बदलल्या; पण प्रश्न आहे तो गुणवत्तेचा. नव्वदच्या दशकात मॅट्रिक उत्तीर्ण होणे हे एखाद्या दिव्याप्रमाणे तेजस्वी वाटायचे. इंग्रजी आणि गणित हे जणू दोन दुर्गम किल्ले; ३५ गुणांची शिदोरी गोळा करताना घाम फुटायचा. ५५-६० टक्के निकाल लागला तरी शाळांच्या दालनात आनंदाचा जल्लोष व्हायचा. आज मात्र टक्केवारीचे फुगे आकाशात झेपावले आहेत. अंतर्गत मूल्यमापनाच्या भरघोस गुणांनी निकाल उजळला असला, तरी त्या उजेडामागे खरी ज्ञानज्योत किती प्रखर आहे? दहावीत ९० टक्क्यांच्या वर असलेले हजारो विद्यार्थी बारावीपर्यंत पोहोचेपर्यंत संख्येने घटतात, तेव्हा 'भपकेबाज' गुणवत्तेच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह उमटते. कागदी घोडदौड करून मिळवलेली चमक आयुष्याच्या वादळात किती टिकेल?



स्पर्धेच्या या रणांगणात शिक्षणाचे बाजारीकरण वेगाने फोफावले आहे. चकचकीत जाहिराती, टॉपरांच्या छायाचित्रांची माळ आणि हमखास यशाची आश्वासने या सगळ्या जाळ्यात विद्यार्थी नकळत 'बकरा' बनतो. पण सत्य इतकेच की, कोणताही क्लास कुणाला गुणवान बनवू शकत नाही; गुणांची बीजे विद्यार्थ्याच्या अंतर्मनातच दडलेली असतात. गरज असते ती एका 'गुणग्राहक' शिक्षकाची, जो कच्च्या हिऱ्याला ओळखून त्याला पैलू पाडेल, जो पाठांतराच्या पलिकडे जाऊन विचारांची मशाल पेटवेल. पैशाच्या बळावर नव्हे, तर तळमळीच्या बळावर घडणारे शिक्षकच खऱ्या अर्थाने पिढ्या घडवतात.

शाळेतील बाकांवर कोरलेली नावे, हृदयाची चिन्हे किंवा पिंपळाची पानेही केवळ खोडकरपणाची खूण नसते; ती अस्वस्थ मनाची साक्ष असते. जेव्हा अध्यापनात ओघ, अद्ययावतपणा आणि प्रेरणा नसते, तेव्हा विद्यार्थ्याचे मन भटकते. शिक्षकाची वाणी अशी असावी की शब्दांच्या लयीत विद्यार्थी हरवून जावा; ज्ञानाचा प्रवाह असा असावा की त्यात प्रश्नांची नौका सहज तरंगावी. जुन्या, कालबाह्य चौकटी मोडून आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देत जेव्हा अध्यापन सजीव होईल, तेव्हाच शिक्षण खऱ्या अर्थाने अर्थपूर्ण ठरेल.

दहावी म्हणजे केवळ एका वर्षाचा अभ्यास नाही; ती पहिलीपासून रुजवलेल्या संस्कारांची, कुतूहलाची आणि परिश्रमांची एकत्रित परीक्षा आहे. आपण 'कागदी गुणवत्ता'च्या झगमगाटापेक्षा 'अनुभवजन्य गुणवत्ता'चा दीप प्रज्वलित केला पाहिजे. पुस्तकी गुण थोडे कमी असले तरी चालतील; पण व्यवहारज्ञान, नैतिकता आणि आत्मविश्वास यांची शिदोरी भक्कम असावी. शिक्षण व्यवस्था कितीही वळणे घेऊ दे, शिस्त, आदर आणि प्रभावी अध्यापन यांच्या त्रिवेणी संगमातूनच भविष्यातील पिढी खऱ्या अर्थाने 'गुणवंत' घडेल.

दहावीची लढाई ही शेवट नव्हे; ती तर आयुष्याच्या विराट प्रवासाची पूर्वतयारी आहे. या लढाईत गुणांची तलवार नव्हे, तर जिद्दीची ढाल आणि ज्ञानाची मशाल हातात असू द्या मग कोणतीही परीक्षा जिंकणे अशक्य राहणार नाही. **

## सर्वोच्च न्यायालयाच्या अजब निर्णयाची गजब कहानी!

**शिवाजी चौगुले**

मोफत जेवण मिळाल्यावर लोक काम करतील का? हा प्रश्न जर चहाच्या टपरीवर कोणी विचारला असता तर त्यावर दोन मिनिटांत गप्पा रंगल्या असत्या, चार उदाहरणं दिली गेली असती आणि शेवटी 'अरे, सगळं राजकारण आहे' म्हणून विषय मिटला असता. पण हा प्रश्न जेव्हा देशाच्या सर्वोच्च न्यायालयातून आला, तेव्हा तो आपल्या धोरणांना, सवयींना आणि मानसिकतेला आरसा दाखवणारा ठरला. सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी तामिळनाडू सरकारला सुनावणीदरम्यान विचारलेल्या या प्रश्नाने अनेक प्रतिप्रश्नही उपस्थित केले आहेत. कल्याणकारी योजना आणि 'फुकट संस्कृती' यामधील रेषा नेमकी कुठे आखायची? गरजूंना आधार देणे आणि सर्वांना मोफत देत राहणे यात फरक आहे की नाही? आणि तो असेल तर तो कोण ठरवणार? न्यायालयाने स्पष्ट शब्दांत म्हटले की, गरिबांना मदत करणे समजण्यासारखे आहे. पण जो पैसे भरू शकतो आणि जो भरू शकत नाही, यांच्यात कोणताही फरक न करता सर्वांना मोफत सुविधा देणे योग्य नाही. राज्ये महसुली तुटीत असताना विकासाऐवजी मोफत सुविधा देण्यात गुंतली आहेत, असे निरीक्षणही नोंदवले गेले.

ग्रामीण भागात म्हण आहे, 'फुकटचं मिळं अन् गटकन गिळं.' एखाद्या गावात जत्रेत लाडू वाटले तर लोक दोनदा रांगेत उभे राहतात. पण त्याच गावात स्वच्छतागृह बांधायला सांगितले तर 'उद्या पाहू' अशी भूमिका घेतात. ही केवळ ग्रामीण मानसिकता नाही, ती राष्ट्रीय प्रवृत्ती झाली आहे. विविध राज्यांतील योजना पाहिल्या तर चित्र आणखी गडद होते. महाराष्ट्रात लाडकी बहीण योजनेत महिलांना दरमहा आर्थिक मदत दिली जाते. मध्य प्रदेशातही तत्सम योजना आहे. तामिळनाडूमध्ये महिलांना मासिक आर्थिक सहाय्य दिले जाते. दिल्लीमध्ये महिलांना मोफत बस प्रवास आणि नागरिकांना ठराविक प्रमाणात पाणी मोफत दिले जाते. छत्तीसगडमध्ये गॅस सिलेंडरवर अनुदान, हरियाणात महिलांना आर्थिक मदत अशी यादी लांबतच जाते. या सर्व योजनांना सामाजिक न्याय, सक्षमीकरण, महिलांना आधार, गरिबांना दिलासा अशी लेबले लावली जातात. याला काही अपवाद आहेत. खरोखरच समाजात विषमता आहे. अनेकांना दोन वेळचे जेवण मिळणे कठीण आहे. पण प्रश्न पडतो की, आपण गरजूंना या माध्यमातून मदत करतो की सर्वांना समान रीतीने मदत केल्याचे नाटक करतो ?



राजकारणाची गणिते साधी असतात. मतदारांची संख्या जितकी मोठी, तितका मतांचा पाऊस जोरात पडतो. मोफत योजना ही मतांच्या ढगांना पावसात बदलणारी जादूची कांडी बनते. निवडणुकीआधी घोषणा होते, प्रचारसभेत टाळ्यांचा कडकडाट होतो आणि निकालानंतर अर्थसंकल्पात आकडेमोडीची कसरत सुरू होते. महसुली तुटीचा आकडा वाढतो, पण घोषणांच्या पोस्टर्सवरील हसणारे चेहरे मात्र कमी होत नाहीत. असे असले तरी, न्यायालयाने उपस्थित केलेला मुद्दा कार्यसंस्कृतीचा आहे. जर मुलभूत गरजा राज्य पूर्ण करणार असेल, तर व्यक्तीने काम का करावे? हा प्रश्न थोडा अतिशयोक्तीचा वाटू शकतो. कोणालाही केवळ मोफत वीज किंवा पाण्यावर आयुष्य काढता येत नाही. पण मानसिकतेत तर बदल होतो. 'काहीतरी मिळेलच' ही भावना कार्यक्षमतेवर निश्चितच परिणाम करणारी ठरू शकते. आपण कल्याणकारी राज्य आहोत, हे आपण वारंवार म्हणतो. पण कल्याणकारी राज्य म्हणजे प्रत्येकाला सर्व काही मोफत देणे नव्हे. कल्याणकारी राज्य म्हणजे ज्यांना गरज आहे त्यांना संधी देणे, शिक्षण, आरोग्य, रोजगाराची साधने उपलब्ध करून देणे, म्हणजे व्यक्ती स्वावलंबी होईल. मोफत संस्कृती मात्र स्वावलंबनाऐवजी अवलंबित्व वाढवते. अर्थात मोफतच्या योजना जाहीर करताना त्यांना कोणीही मोफत म्हणत नाही. त्या 'ऐतिहासिक निर्णय' असतात. ते एक 'क्रांतिकारी पाऊल' असते. त्यात 'गरिबांचा विजय' असतो. पण त्याच योजना जेव्हा अर्थसंकल्पाचा तोल बिघडवतात, तेव्हा त्या अचानक 'आर्थिक बोजा' बनतात. न्यायालयाने म्हटले की, विजेचे बिल भरू न शकणाऱ्यांना मदत करा, पण सक्षम आणि असमर्थ यांच्यात फरक करा. हा फरक करणे प्रशासनासाठी कठीण असते. त्यासाठी माहिती, पडताळणी, निकष लागतात आणि त्यात राजकीय धोका असतो. सर्वांना मोफत देणे सोपे, निवडकांना देणे अवघड. कारण निवडकतेत नाराजीचा धोका असतो. लोकांनीही विचार करायला हवा, आपण मतदान करताना रोजगार, उद्योग, पायाभूत सुविधा, शिक्षण, आरोग्य यावर चर्चा करतो का? अनेकांचा 'काय मिळणार?' हा पहिला प्रश्न असतो. जर मतदारांनीच अपेक्षा बदलल्या नाहीत, तर राजकारणात बदलाची अपेक्षा तरी कशी करणार? फुकट मिळालेल्या वस्तूंचा आनंद क्षणिक असतो, पण टिकाऊ प्रगतीसाठी मेहनत, धोरणात्मक गुंतवणूक आणि संयम लागतो. यात दुसरी बाजूही आहे. अनेकदा सरकारे म्हणतात की मोफत सुविधा या सामाजिक गुंतवणूक आहेत. उदाहरणार्थ, महिलांना आर्थिक मदत दिल्यास त्यांची कुटुंबातील निर्णयक्षमता वाढते, मुलांच्या शिक्षणावर खर्च वाढतो, पोषण सुधारते. या दाव्यांमध्ये तथ्य असू शकते. त्यामुळे सर्व मोफत योजना वाईटच, असेही म्हणता येत नाही. मूळ प्रश्न आहे तो संतुलनाचा. न्यायालयाचा सवाल हा केवळ सरकारला नाही, तर समाजालाही आहे. आपण कोणती संस्कृती विकसित करतो आहोत? मेहनतीची की अपेक्षांची ? स्वावलंबनाची की सवलतींची? 'फुकटचं मिळं अन् गटकन गिळं' ही म्हण आपण विनोदाने वापरतो, पण तीच जर धोरणाचा पाया बनली तर....?

## देणाऱ्याने देत जावे.....

**सुनील गवळी**

जीवन हा व्यवहार नाही; तो अनुभव आहे. तो मालकीचा प्रश्न नाही; तो प्रवाहाचा प्रश्न आहे. आणि म्हणूनच जीवनाचा खरा अर्थ ''मिळवण्यात'' नसून ''देण्यात'' आहे.

माणूस जन्माला येतो तेव्हा त्याच्या हातात काहीच नसतं. तो फक्त श्वास घेऊन येतो. आणि जातानाही तो काहीच घेऊन जात नाही फक्त आठवणी, कृती आणि त्याने निर्माण केलेली माणुसकी मागे ठेवून जातो. या दोन टोकांमधील काळ म्हणजेच जीवन. आणि त्या काळात आपण काय दिलं हाच आपल्या अस्तित्वाचा खरा मोजमाप ठरतो.



देणं म्हणजे कमी होणं नाही विस्तार होणं आहे आपण अनेकदा असा समज करून घेतो की दिलं तर आपल्याकडे कमी उरेल. परंतु निसर्गाचा नियम अगदी उलटा आहे. दीप दुसऱ्या दिव्याला पेटवतो, पण स्वतःचा प्रकाश कमी करत नाही. झाड सावली देतं, पण स्वतः उभंच राहतं. नदी पाणी वाटते, म्हणूनच ती नदी राहते; साठवून ठेवली असती तर ती डबकं झाली असती. देणं म्हणजे स्वतःचा विस्तार. जेव्हा आपण प्रेम देतो, तेव्हा आपलं हृदय मोठं होतं. जेव्हा आपण ज्ञान देतो, तेव्हा आपली बुद्धी अधिक समृद्ध होते. जेव्हा आपण क्षमा देतो, तेव्हा आपलं मन हलकं होतं.

जीवनात आपण काय देऊ शकतो? देणं म्हणजे केवळ पैसा नव्हे. खरं तर सर्वात मौल्यवान देणग्या पैशाने विकतच मिळत नाहीत. आपण देऊ शकतो एखाद्याला ऐकून घेण्याची तयारी, निराश व्यक्तीला आशेचा शब्द, मुलांना प्रोत्साहन, समाजाला प्रामाणिकपणा, कुटुंबाला वेळ चुकलेल्या व्यक्तीला क्षमाशीलता हीच खरी जीवनसंपत्ती आहे.

''सोडून देणं'' ही देखील देण्याचीच एक प्रक्रिया देणं जितकं महत्त्वाचं, तितकंच सोडून देणं महत्त्वाचं आहे. आपण अनेकदा मनात राग साठवतो, मत्सर साठवतो, अहंकार साठवतो, जुन्या आठवणींचं ओझं साठवतो. हे ओझं आपण घेऊन चालतो आणि मग जीवन कठीण वाटतं. सोडून देणं म्हणजे विसरणं नाही, हार मानणं नाही, तर स्वतःला मुक्त करणं आहे. ज्याने सोडायला शिकलं, तोच खऱ्या अर्थाने जगायला शिकतो.

खरी कमाई म्हणजे लोकांच्या मनात मिळालेली जागा आपण किती कमावलं हे बँक सांगते. पण आपण किती दिलं हे लोकांच्या डोळ्यांत दिसतं. माणूस गेला की त्याची संपत्ती वाटली जाते, पद दुसऱ्याला मिळतं, नाव हळूहळू विसरलं जातं पण त्याने दिलेला आधार, त्याची माया, त्याचं मार्गदर्शन हे लोकांच्या आयुष्यात कायम जगत राहतं. हीच खरी अमरता आहे.

व्यक्तिमत्व विकासाचा गाभा : ''मी काय घेतलं?'' नव्हे, ''मी काय दिलं?''

विद्यार्थी असो, शिक्षक असो, अधिकारी असो किंवा सामान्य माणूस ज्याने देण्याची वृत्ती अंगीकारली, त्याचं व्यक्तिमत्व आपोआप उंचावतं. कारण देणारा माणूस आत्मविश्वासी असतो, सकारात्मक असतो, सहकार्यशील असतो, नेतृत्वगुणांनी समृद्ध असतो आणि सर्वात महत्त्वाचं तो समाधानी असतो. समाधान हीच सर्वात मोठी यशाची पायरी आहे. आजपासून काय बदल करू शकतो? दररोज स्वतःला एक प्रश्न विचारूया ''आज मी कोणासाठी काय केलं?'' एक चांगला शब्द बोलूया. एखाद्याची मदत करूया. राग धरायचा असेल तर सोडून देऊया. कृतज्ञता व्यक्त करूया. आणि जे काही करू ते मनापासून करू. लहान कृतींचं मोठं व्यक्तिमत्त्व तयार होतं. जीवनाचा अंतिम संदेश जीवन थांबणार नाही. वेळ मागे वळणार नाही. आपण काहीही सोबत नेऊ शकणार नाही. म्हणूनच देणाऱ्याने देत जावे, घेणाऱ्याने घेत जावे, पण माणुसकीचा प्रवाह अखंड वाहत राहावा. आपण इतकं देऊन जाऊया की आपल्या जाण्यानंतरही आपल्या आठवणींचा उजेड इतरांच्या जीवनात मार्ग दाखवत राहील. देऊन जा प्रेम. सोडून जा अहंकार. जगा कृतज्ञतेने. हेच अर्थपूर्ण जीवन आणि हेच खऱ्या व्यक्तिमत्त्व विकासाचं तत्त्वज्ञान.

**(लेखक गटशिक्षणाधिकारी, तथा विद्यार्थी, शिक्षक, पालक समुपदेशक आहेत.)** **

# कालीमातेचे निस्सीम भक्त : श्रीरामकृष्ण परमहंस

बंगालमधील कामारपुकुर या गावात वर्ष १८३६ मध्ये १८ फेब्रुवारीला एका गरीब ब्राह्मणाच्या घरी गदाधराचा म्हणजेच रामकृष्ण परमहंसांचा जन्म झाला. गदाधरच्या वडीलांचे नाव क्षुदिराम चॅटर्जी आणि आईचे नाव चंद्रामणीदेवी. लहानपणापासून शालेय शिक्षणात त्यांना विशेष रुची नव्हती. शाळेत शिकण्याचा विषय काढला, तर गदाधरांनी म्हटले, 'मला भातभाकरीची विद्या नको, ईश्वरदर्शन होईल अशी विद्या हवी'. देवपूजा, भजन, सत्संग यांची आवड होती. तरुण वयात दक्षिणेश्वर येथे राहून त्यांनी कालीमातेची उपासना केली. १८४३ साली पितृनिधनानंतर परिवाराचा भार त्यांचे थोरले भाऊ रामकुमार यांनी स्वीकारला. या घटनेचा गदाधराच्या मनावर खोल परिणाम झाला. १८५५ साली कलकत्त्याच्या कैवर्त समाजातील एका धनिक जमीनदार पत्नी राणी रासमणीने दक्षिणेश्वर मंदिराची प्रतिष्ठापना केली. रामकुमार त्या मंदिरात प्रमुख पुजारी बनले. १८५६ साली रामकुमारांच्या मृत्यूनंतर गदाधरांनी त्यांची जागा घेतली. रामकुमारांच्या मृत्यूनंतर रामकृष्णांची भावतन्मयता आणखी वाढली. कालीस ते आई आणि विश्वजननीभावाने पाहू लागले. या काळात ते देवीच्या प्रत्यक्ष दर्शनासाठी व्याकूळ झाले. गदाधरांचे शिक्षण जेमतेम दुसरीपर्यंत झाले होते तरीही ते बंगाली विद्वान समाजाचे आणि सुशिक्षित मध्यमवर्गाचे लक्ष वेधण्यास यशस्वी ठरले. १८७० च्या दशकाच्या मध्यापासून पाश्चात्य शिक्षण घेतलेल्या बुद्धिजीवींवर त्यांचा प्रभाव पडला. नंतर ते बंगालमधील हिंदू प्रबोधनाचे उद्गाते ठरले

त्यांचे गुरु तोतापुरी महाराज यांच्या मार्गदर्शनानुसार साधना करून गदाधर 'परमहंस' पदाला प्राप्त झाले. याच गदाधरांना लोक 'रामकृष्ण परमहंस', या नावाने ओळखू लागले. श्रीराम आणि श्रीकृष्ण हे दोघेही आपल्या हृदयात असल्याचे ते सांगत. सहस्रो जणांनी त्यांचे शिष्यत्व पत्करले. त्यातील काही पाश्चिमात्त्य देशांतीलही होते. त्यांच्या कार्याची धुरा स्वामी विवेकानंद यांनी समर्थपणे पेलली. १८५९ मध्ये वयाच्या तेविसाव्या वर्षी जयरामवाटी येथील रामचंद्र मुखोपाध्याय यांची पाच वर्षांची कन्या शारदामणी हिच्याशी त्यांचा विवाह झाला. पण लौकिक अर्थाने त्यांनी वैवाहिक जीवन स्वीकारले नाही. पुढे शारदामणी यांनी श्रीरामकृष्ण परमहंस यांचे शिष्यत्त्व स्विकारले आणि त्या शारदा देवी या नावाने ओळखल्या जाऊ लागल्या. श्रीरामकृष्ण परमहंस यांची ईश्वरभक्ती उत्कट होत चालली. मंदिराजवळच्या पंचवटीतील वडाच्या झाडाखाली ते रात्री जात आणि ध्यानधारणा करीत. रात्र व दिवस यांचे भान नष्ट होत असे. 'आई, दर्शन दे' असा आक्रोश ते करत असत. अशा वेळी तहानभुकेची वा अंगावरच्या वस्त्राचीही शुद्ध त्यांना राहत नसे. अखेर एके दिवशी आवेगाच्या भरात गाभाऱ्यातील कालीमातेचे खड्ग घेतले व ते मानेवर चालवणार, एवढ्यात जगन्मातेचे दर्शन त्यांना झाले. यावेळी त्यांचे वय अवघे २५ वर्षे होते. यानंतरचे त्यांचे सारे दैनंदिन जीवन ईश्वरानुभवाच्या प्रकाशात उजळून निघाले. विवाहानंतर पुन्हा त्यांनी मंदिराचे कामकाज पाहायला सुरुवात केली.



रामकृष्ण अन्य रूपांतील दैवी तत्त्व आणि

जगन घाणेकर

भक्तीच्या विविध पद्धती जाणून घेण्यासाठी पुढे जात राहिले. रामायणामध्ये श्रीरामाच्या दर्शनासाठी हनुमानाला ध्यास लागला होता, तसा त्यांनाही लागला. जेव्हा रामकृष्णांनी हनुमानाप्रमाणे श्रीरामाला अनुभवण्याचा प्रयत्न केला, तेव्हा त्याच्या भक्तीमध्ये ते इतके तीव्रतेने गुंतले की, त्यांनी माकडाची लक्षणे आत्मसात करण्यास आरंभ केला. शेवटी त्यांना श्रीरामाचे दर्शन झाले. 'भगवान कृष्णासमवेत राहतांना आणि त्याची भक्ती करतांना गोपींना त्याच्या दर्शनाची इच्छा होत असे, त्याप्रमाणे रामकृष्णांना श्रीकृष्णाच्या दर्शनाची इच्छा झाली. एका स्त्रीच्या दृष्टीकोनातून श्रीकृष्णाची भक्ती करतांना ते स्त्रीप्रमाणे दिसू आणि वागू लागले. त्यांचे वर्तन आणि दिसणे इतके स्त्रीप्रमाणे झाले की, इतर त्यांना प्रत्यक्षात स्त्री मानू लागले. त्यांनी स्वतःमध्ये गोपिकेप्रमाणे श्रीकृष्णाच्या दर्शनाची ओढ जागृत केली आणि शेवटी त्यांना श्रीकृष्णाच्या दर्शनाचा लाभ झाला.' (आधार : सनातन डॉट ऑर्ग.)

रामकृष्णांनी आयुष्यभरात एकही ग्रंथ वाचला नव्हता. काही पुराणे-प्रवचने ऐकली होती. त्यांनी तीव्र आध्यात्मिक साधना केली होती. त्यांच्यातील मुमुक्षत्वामुळे त्यांना अनेक अनुभूती आल्या होत्या, देवी-देवतांचे प्रत्यक्ष दर्शन त्यांना झाले होते. साधनामार्गातील त्यांचा हा अनुभव त्यांच्या विचारांचा एकमेव आधार होता. प्रवचनांतून ते त्यांनी साधनेत केलेले प्रयत्न आणि त्यातून त्यांना आलेल्या अनुभूती सांगत. त्यामुळे स्वामी दयानंद, बंकिमचंद्र चॅटर्जी, पं. ईश्वरचंद्र विद्यासागर, केशवचंद्र सेन अशा नामवंत व्यक्तीही त्यांच्या अनुभूतींतून प्रभावित झाल्या. बलराम बसू, डॉ. रामचंद्र दत्त, साधू नागमहाशय, महेंद्रनाथ गुप्त, गिरीशचंद्र घोष, सुरेंद्रनाथ मित्र हे त्यांचे प्रमुख गृहस्थाश्रमी शिष्य होते. काही स्त्रियाही त्यांच्या शिष्यवर्गात होत्या. दहा बारा तरुण अंतरंगशिष्य हे सारे संन्यासी होते. त्यांतील अग्रणी म्हणजे स्वामी विवेकानंद.

रामकृष्णांच्या ज्ञानाच्या प्रभावामुळेच सामान्य असलेल्या नरेंद्रचा स्वामी विवेकानंद झाला. भारतासह जागतिक पातळीवर विवेकानंदांनी आपल्या ज्ञानाच्या, बुद्धीच्या आणि उपदेशाच्या जोरावर विशेष ठसा उमटवला. अमेरिकेतील शिकागो येथील भाषणामुळे स्वामी विवेकानंद जगविख्यात झाले. आपल्या गुरुंच्या स्मरणार्थ विवेकानंदांनी रामकृष्ण मिशनची स्थापना केली. रामकृष्ण मिशन या संस्थेच्या देशविदेशांतील शंभरहून अधिक शाखांच्या द्वारा रामकृष्णांचा आध्यात्मिक संदेश आज जगात सर्वदूर पसरलेला आहे. रामकृष्ण अखेरचे सात-आठ महिने घशाच्या कर्करोगाने आजारी होते. १६ ऑगस्ट १८८६ या दिवशी कलकत्त्यामधील काशीपूरच्या उद्यानगृहात त्यांनी महासमाधी घेतली.

**

## मार्गदर्शक व वाचनीय

# कुमारांशी संवाद

कुमारांशी संवाद, हे डॉ. रुपेश पाटकर लिखित पुस्तक गोव्यातील राई प्रकाशनने प्रकाशित केले आहे. या पुस्तकाला कोल्हापूर येथील, अनंत घोटगाळकर यांची सविस्तर आणि समर्पक प्रस्तावना लाभली आहे. मुले अभ्यासच करत नाहीत, अशी शिक्षक, पालकांची नेहमीच तक्रार असते. कोणत्याही वयात अभ्यास ही करायला लावण्याची गोष्ट नसून, आनंदाने करायची गोष्ट आहे. कृतीतून, प्रयोगातून शिकवण्याचे प्रमाण वाढले पाहिजे, असे ते सुचवतात. शिकवण्यात आनंद कसा पेरला पाहिजे, मुलांचा आत्मविश्वास कसा वाढवत नेला पाहिजे, अभिव्यक्तीच्या अनोखेपणाला साचेबंद नव्हे, अनुभवजन्य अभिव्यक्तीला कसे प्रोत्साहन दिले पाहिजे. त्यांना योग्य वाट कशी दाखवली पाहिजे, याबद्दल लेखकाने स्वतः केलेले निरीक्षण, प्रयोग आणि विवेचन या पुस्तकात मुळातूनच वाचायला मजा येईल, असे अनंतराव सुचवतात. या पुस्तकात छोटे-मोठे एकूण, चाळीस लेख समाविष्ट आहेत. पुस्तकाचे समर्पक, रंगीत मुखपृष्ठ डॉ. राजेंद्र चव्हाण यांचे आहे.




मनोविकारतज्ज्ञ डॉ.रुपेश पाटकर यांना वेळोवेळी, भोवतालच्या शाळांमधून मुलांना मार्गदर्शन करण्यासाठी निमंत्रण येत असते. त्यावेळी रुपेश मुलांजवळ विविध प्रकारे संवाद साधून त्यांना बोलते करत असत. त्यामुळे मुलांसोबत त्यांचे एक मैत्रीचे नाते निर्माण होत असे. यामधील विविध अनुभव डॉ. रुपेश पाटकर यांनी विविध लेखांतून मांडले आहेत. अभ्यास एके अभ्यास? या पहिल्या लेखात रुपेश यांनी मुलांसोबत व्याख्यानामध्ये आवडीनिवडी, छंद, मैत्री अशा विविध विषयांवर गप्पा मारल्या. मुलेही उत्साहाने सहभागी झाली. शिक्षकांना, त्यांनी अभ्यासाविषयी मुलांना काही मार्गदर्शन करावे असे वाटत होते. शेवटी रुपेश मुलांना सोदाहरण सांगतात की, अभ्यास म्हणजे काही वेगळे नसतं, अभ्यासाशिवाय मुले अनेक गोष्टी शिकतात. अभ्यासामध्ये जर गंमत वाटली तर मुलेही अभ्यास करतील. अभ्यासक्रमात गंमत निर्माण करणे हे शिक्षकांसमोरचे आव्हान आहे, असे रुपेश यांना वाटते. नंतरच्या दोन लेखांतूनही रुपेश आनंददायी शिक्षणाचे महत्त्व सांगतात. ''मुलं हुशार आहेत, पण त्यांना बोलता येत नाही'' असे एका शाळेचे शिक्षक रुपेश यांना म्हणाले. त्यानंतर त्या शाळेत रुपेश यांनी मुलांचा निवासी कॅम्प घेतला. प्रत्येक मुलाला बोलायला लावलं, पुन्हा पुन्हा बोलायला लावलं. त्यामुळे तिसऱ्या दिवशी समारोपाच्या कार्यक्रमाला ते शिक्षक आले, तेव्हा त्यांच्या विद्यार्थ्यांनी पुढे येऊन निर्भयपणे अनुभव कथन केले. केवळ व्याख्यान देऊन बोलण्याची भीती जात नाही. त्यासाठी काय करावे 'हे बोलते व्हा!' या लेखात सांगितले आहे. ''घोका आणि ओका?'' या लेखातून आपल्या देशातील परीक्षा पद्धतीचे दोष स्पष्ट होतात. लवचिकता, या लेखात अध्यापन आणि अध्ययन या दोन्ही बाजूंनी चालणाऱ्या प्रक्रिया कशा काम करतात, हे रुपेश यांनी उत्तम प्रकारे स्पष्ट केले आहे. त्यांच्या मते, शिस्त हे चांगल्या अध्यापनाचं फलित आहे. शिकवताना जितका सखोल अनुभव विद्यार्थ्याला दिला जाईल, तितकी त्याची अभ्यासातली आवड बळकट होईल.

फुग्याची गोष्ट, हा लेख विद्यार्थी, एखादी

पुस्तक परीक्षण
प्रा. शाम जोगळेकर
मो. ९२७३३४३१७७

गोष्ट ऐकून त्यावर वेगळ्या पद्धतीने विचार करू शकतात, हे उत्तम प्रकारे स्पष्ट करतो. प्रत्येक फुगा हेलियम भरल्यानंतर उडतो. मग त्या विक्रेत्याने काळा फुगा विकायला का ठेवला नाही? विद्यार्थी म्हणाला, ''फुगा जरी त्यात काय भरलं यावर उडत असला तरी बाजारात कोणता फुगा खपणार हे बाहेरच्या रंगावरून ठरत असतं!'' विशेष म्हणजे ही गोष्ट सांगणाऱ्या लेखकाच्याही मनात हे आले नव्हते. मुलांमधील सृजनशीलता वाढण्यासाठी, तसेच त्यांचे अपेक्षित वर्तन होण्यासाठी, कोणत्या प्रकारची शिक्षा द्यावी हे 'मूल्यांकन' आणि 'फुकटचं टॉनिक' या लेखांतून उत्तम प्रकारे स्पष्ट होते. लेखकाने शालेय जीवनातील आपल्या सिधये गुरुजींविषयी अत्यंत आत्मीयतेने लिहिले आहे. ते स्वतःला 'मास्तर' म्हणत असले तरी विद्यार्थ्यांना ते 'गुरु' का वाटत, ते त्यामधून स्पष्ट होते. त्यांचे शिकवणे नवी अनुभूती देत असे, आनंद देत असे. शिकवत असलेल्या संस्कृत भाषेविषयी कुतूहल निर्माण करीत असे. ते सांगत असलेली उदाहरणे रोजच्या जीवनातील असल्यामुळे सहज समजत आणि उपयोगाची वाटत असत. त्यामुळे अशा शिक्षकांशी त्यांचे कायमचे नाते निर्माण झाले. आत्मविश्वासाच्या शोधात, या लेखात लेखकाने आपल्या क्षमतांची जाणीव असणे, तसेच त्यांच्या मर्यादाही समजून घेणे म्हणजे आत्मविश्वास असे सोदाहरण सांगितले आहे. लेखकाने आपल्या वडिलांच्या विशेष गुणांचा आपल्यावर कसा परिणाम झाला हे सांगितले आहे. तसेच त्यांच्या काही मर्यादाही मोकळेपणाने स्पष्ट केल्या आहेत. प्रेम आणि आकर्षण, लैंगिक शिक्षण या विषयांवर रुपेश यांनी विविध लेखांतून उत्तम विवेचन केले आहे. रागवायचं कसं?, सह+अनुभूती हे लेख सर्वांनाच उपयुक्त आणि मार्गदर्शक ठरणारे आहेत. लैंगिकता आणि मानसिकता या लेखामध्ये रुपेश यांनी, मेडिकल कॉलेजमध्ये शिकत असताना, प्रा. डॉ. लोमटे यांची अप्रतिम आठवण सांगितली आहे. मानवी लैंगिकतेवर मानसिकतेचा किती प्रभाव पडतो, हे उत्तम प्रकारे स्पष्ट होते. उमलताना...,या शेवटच्या लेखात, शेवटी लेखकाने जे सांगितले आहे, त्यामुळे सुजाण वाचक अंतर्मुख होतो. या पुस्तकाच्या वाचनाने शिक्षक, पालक आणि विद्यार्थी यांना निश्चितच लाभ होईल. यासाठी जास्तीत जास्त वाचकांपर्यंत हे पुस्तक आणि त्यातील विचार पोहोचणे, यामुळेच अत्यावश्यक ठरते. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील बांदा येथे राहणारे, डॉ. रुपेश पाटकर आपल्या व्यवसायापेक्षा समाजप्रबोधनाचे कार्य महत्त्वाचे मानतात आणि ते त्यांच्या पद्धतीने सातत्याने करीत आहेत. हे निश्चितच अभिनंदनीय आहे आणि अनुकरणीयही ! **

पुस्तकाचे नाव : कुमारांशी संवाद
लेखक : डॉ. रुपेश पाटकर
प्रकाशक : राई प्रकाशन, गोवा
प्रथम आवृत्ती : २ ऑक्टोबर २०२२
पृष्ठे : १०४. मूल्य : रु. १५०/-

# पंतप्रधान संसदेत असुरक्षित

**अजितदादांच्या निधनानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षावर शरद पवार ताबा मिळवतील, अशा भयगंडाने अजितदादांच्या पक्षातील अनेकांना पछाडले. खरे तर अजित पवार आणि शरद पवार यांच्यामध्ये गेल्या काही दिवसांपासून विलिनीकरणाची चर्चा सुरु होती. पण 'आम्हाला त्यातले काहीच ठाऊक नाही' असे सांगत प्रफुल्ल पटेल, सुनिल तटकरे आदी प्रभृतींनी हात वर केले. यासंदर्भात नेमके काय घडत आहे?**

काँग्रेस पक्षाचे सर्वोच्च नेते राहुल गांधी लोकसभेत विरोधी पक्षनेते झाल्यापासून भाजपा विरूध्द काँग्रेस अशा संसदेतील संघर्षाला धार चढली आहे. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीमध्ये नरेंद्र मोदी यांनी 'काँग्रेसमुक्त भारत' अशी घोषणा केली. काँग्रेसला देशभरात कमजोर करणे हा अजेंडा गेली बारा वर्षे भाजपाकडून राबवला जात आहे. लोकसभेत तसेच राज्यसभेत विरोधी पक्ष नेतेपद काँग्रेस पक्षाकडे आहे. लोकसभेत राहुल गांधी आणि राज्यसभेत मल्लिकार्जुन खरगे मोदी सरकारवर रोज तुटून पडत आहेत. काँग्रेसच्या खासदारांची संख्याही आता शंभरीकडे पोचली आहे. पंडित नेहरूंपासून राहुल गांधींपर्यंत काँग्रेसच्या सर्व नेत्यांना कमी लेखणे, त्यांच्यामुळे देशाचे कसे नुकसान झाले, हे भाजपाचे नेते आणि मंत्री सातत्याने सांगत असतात. संसदेच्या प्रत्येक अधिवेशनात जनतेच्या प्रश्नांपेक्षा सरकार आणि विरोधी पक्षांमध्ये आरोप-प्रत्यारोप आणि भाजपा विरूद्द काँग्रेस असा संघर्ष बघायला मिळतो आहे. राहुल गांधी यांनी संसदेत नुसता पंतप्रधान असा शब्द उच्चारला की सर्वांचे कान टवकारले जातात. विरोधी पक्षनेता म्हणून त्यांना विशेषाधिकार आहेत. सरकारच्या चुका दाखवणे, चुकीच्या निर्णयांवर प्रहार करणे, चुकीचे निर्णय सरकारला बदलायला भाग पाडणे हे विरोधी पक्षनेत्याचे कामच असते. राहुल गांधींना पप्पू ठरवण्यापासून 'अबोध बालक' म्हणून भाजपाच्या मोठमोठ्या नेत्यांनी त्यांची टिंगलटवाळी केली आहे. पण राहुल कोणाचे ऐकत नाहीत आणि आपला हेका सोडत नाहीत. त्यावरुन आणखी रण पेटते. अलिकडे या अनुषंगाने पेटलेला वाद थेट लोकसभा अध्यक्षांवर अविश्वास ठराव आणण्यापर्यंत पोहोचला.

विरोधी पक्ष नेत्याला लोकसभेत बोलूच दिले जात नाही. पंतप्रधानांनवर आरोप करू लागले की त्यांना थांबवण्यात येते, त्यांचा माईक बंद केला जातो किंवा सरकारमधील पहिल्या फळीतील मंत्र्यांची रांग त्यांच्यावर तुटून पडताना दिसते. विरोधी पक्षाला बोलू द्यावे आणि त्याला सरकारने उत्तर द्यावे हे संसदीय लोकशाहीत अपेक्षित असते. पण दोन्ही बाजू ताठर भूमिका घेतात. हेच रोज घडत आहे. एनडीए सरकारकडे भक्कम संख्याबळ आहे. मग सरकारला विरोधी पक्षाची भीती का वाटावी? विरोधी नेता म्हणून राहुल गांधींना पूर्णपणे भाषण करू दिले जात नाही. त्यांनी केलेल्या आरोपांचे सरकारकडून खंडन झाले असेही घडत नाही. सरकारकडून उत्तर दिले जाताना पंडित नेहरूंपासून काँग्रेसने या देशाचे कसे वाटोळे केले, हे वारंवार सांगितले जाते. विरोधी पक्षाने कोणताही मुद्दा उपस्थित केला की त्यावर तो योग्य की अयोग्य याचे उत्तर ऐकायला मिळत नाही तर काँग्रेसला देशातील जनतेने निवडणुकांमध्ये पाठोपाठ कसे नाकारले आहे, हेच ऐकायला मिळते. त्यामुळे विरोधी पक्षाने विचारलेले प्रश्न आणि सरकारने दिलेले उत्तर याचा काहीच ताळमेळ नसतो. संसदीय परंपरा, प्रतिष्ठा, इतिहास असे गुळगुळीत झालेले शब्द वापरून कुणाला काय साध्य करायचे आहे?

राष्ट्रपतींच्या अभिभाषणावर आभार व्यक्त करणारा प्रस्ताव लोकसभेत चर्चेविना किंवा पंतप्रधानांच्या उत्तराविना आवाजी मतदानाने मंजूर करण्यात आला, ही नामुष्की आहे. याला जबाबदार कोण? सरकार की विरोधी पक्ष? २००४ मधे तत्कालीन पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील चर्चेला उत्तर देण्यास सुरूवात करताच विरोधी बाकांवरील भाजपाने युपीए सरकारमधील कलंकित मंत्र्यांच्या निषेधार्ह सभागृहात मोठा गोंधळ घातला. त्यामुळे डॉ. सिंग यांना भाषण करता आले नाही पण अभिभाषणावर चर्चा झाली होती. २००५ मधे डॉ. सिंग यांनी राष्ट्रपतींच्या अभिभाषणावर दोनदा धन्यवाद व्यक्त केले होते, याची आठवण काँग्रसचे नेते जयराम रमेश यांनी करून दिली. सर्वात गंभीर आणि धक्कादायक म्हणजे लोकसभेच् अध्यक्ष ओम बिर्ला यांनीच पंतप्रधान मोदींना सभागृहात येऊ नका, अशी सुचना केली आणि त्यांनी ती स्वीकारली म्हणून आभारही मानले. ओम बिर्ला म्हणाले, पंतप्रधान राष्ट्रपतींच्या अभिभाषणाच्या चर्चेला उत्तर देण्यासाठी सभागृहात येणार होते, त्यावेळेस मला विश्वासार्ह माहिती मिळाली की, काँग्रेसचे अनेक खासदार त्यांच्या आसनापर्यंत पोहोचू शकतात आणि काही अनपेक्षित कृत्य करू शकतात. त्यामुळे मी पंतप्रधानांना सभागृहात येऊ नका, असा सल्ला दिला. पंतप्रधानांच्या पारंपारीक उत्तराशिवाय धन्यवाद प्रस्ताव

डॉ. सुकृत खांडेकर



मंजूर झाला, असे यापुर्वी कधी घडले नव्हते. विरोधी पक्षनेत्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना उत्तरे टाळण्यासाठी हे सर्व घडले का? माजी लष्करप्रमुख मनोज नरवणे यांच्या 'फोर स्टार ऑफ डेस्टिनी' या अप्रकाशित पुस्तकावर राहुल गांधी यांनी मांडलेले मुद्दे आणि विचारलेलेप्रश्नसरकारला आवडले नाहीत म्हणून पंतप्रधान लोकसभेत आले नाहीत का? काँग्रेसच्या खासदारांकडून पंतप्रधानांच्या जीवाला धोका आहे, असे नरेटिव्ह पसरवण्यात आले, त्यातून जनतेची सहानभुती मिळवण्याचा सरकारचा प्रयत्न होता का? मुंबईच्या काँग्रेस खासदार वर्षा गायकवाड यांच्यासह काँग्रेसच्या काही महिला खासदारांनी लोकसभेत पंतप्रधानाच्या आसनासमोर फलक फडकावून योग्य तो निर्णय घ्या अशा घोषणा दिल्या; त्याचा सरकारला राग आला का? अटलबिहारी वाजपेयी पंतप्रधान असतानाच्या काळातही काँग्रेससह विरोधी पक्षांनी गोंधळ घातल्यानंतर कामकाज विस्कळीत होत असे. तत्कालीन संसदीय कार्यमंत्री सर्वपक्षीय नेत्यांची बैठक बोलावून कामकाज सुरू करण्याविषयी चर्चेतून तोडगा काढत असत. तसे यावेळी होताना दिसत नाही. लोकसभेत पंतप्रधान सुरक्षिततेच्या कारणास्तव अभिभाषणावर धन्यवाद प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देण्यास आले नाहीत. पण अध्यक्षांनीच तशी माहिती दिली. कायदे करणाऱ्या संसदेच्या सभागृहात देशाच्या पंतप्रधानांना असुरक्षित वाटत असेल तर सर्वसामान्य जनतेला वाली कोण आहे? काँग्रेसच्या महिला खासदार म्हणे पंतप्रधानांवर हल्ला करणार होत्या. खासदार महिला दहशतवादी आहेत काय, असा प्रश्न काँग्रेसचे पवन खेरा आणि वर्षा गायकवाड यांनी विचारला.

माजी लष्करप्रमुख मनोज नरवणे हे २०१९ ते २०२२ या काळात लष्कर प्रमुख होते. सैन्य दलातील आपल्या चाळीस वर्षांच्या अनुभवावर त्यांनी 'फोर स्टार्स ऑफ डेस्टिनी' हे पुस्तक लिहिले आहे. गेल्या चार वर्षांमध्ये सरकारने त्यांच्याकडे मंजुरीसाठी आलेल्या ३५ पैकी ३४ पुस्तकांना हिरवा कंदील दिला. पण जनरल नरवणे यांच्या पुस्तकावर दोन-अडिच वर्षांच्या काळात निर्णयच घेतला नाही. या पुस्तकात जनरल नरवणे यांनी ३१ ऑगस्ट २०२० च्या घटनेचा उल्लेख केला आहे. त्या रात्री चीनी सैन्य चार रणगाड्यांसह पूर्व लडाखच्या हद्दीकडे येत होते. सरकारच्या संमतीशिवाय भारतीय सैन्याला कारवाई करणे शक्य नव्हते. त्यांनी संरक्षणमंत्री राजनाथ सिंग यांच्याशी संपर्क साधला आणि या आव्हानाबाबत काय करायचे असे विचारले. त्यांच्याकडून वेळेत उत्तर न आल्याने त्यांनी अजित डोवाल यांच्याशी संपर्क साधला. तब्बल अडिच तासांनी राजनाथ सिंग यांनी लष्करप्रमुखांना पंतप्रधान कार्यालयातून 'जो उचित है, वो करो' असा संदेश आल्याचे सांगितले. चीनबाबत भारताची भूमिका काय आहे यावरून नेहमीच संभ्रम असतो. चीनी सैन्य चालून येत असताना कारवाई करण्यासाठी सरकारने विलंब का लावला? निर्णय घेण्यास टाळाटाळ का केली? योग्य असेल ते करा असे सांगून सर्व काही सैन्य दलावर सोपवून सरकारने हात झटकले का? लष्कराला स्वातंत्र्य दिले होते असे सांगण्याची हिंमत सरकारने का दाखवली नाही? राहुल गांधी यांचे भाषण पूर्ण ऐकून सविस्तर उत्तर देण्याची संधी सरकारने गमावली. त्यातून सरकारने काही तरी दडवले, लपवले असा संदेश सर्वत्र गेला. सर्वात महत्वाचे म्हणजे पंतप्रधानांच्या सुरक्षिततेला लोकसभेत धोका होता तर तो नेमका कोणापासून, याची चौकशी होणार का? **

# मीच माझा दुश्मन

या जगामध्ये माझा सर्वात मोठा कुणी शत्रू असेल तर तो मी स्वतःच आहे. कारण पुढे जाण्या वाचून मला कोणी जर रोखलं असेल तर तो फक्त मीच आहे. मीच माझे पाय खेचतो आहे. मीच स्वतःला कारणे देतो बहाणे सांगतो. कुठल्याही क्षेत्रात पुढे जायचं असेल तर कारणे देऊन नाही चालत. बहाणे सांगून चालत नाही हे कळतंय पण बऱ्याच अंशी वळत नाही. मग नक्की कमी कुठे पडतोय. जिद्द आणि चिकाटी नाही. मेहनत करायची तयारी आहे पण तग धरून राहायचं तंत्र जमेना की काय. खरं तर मला कमी मेहनतीत जास्त पैसा पाहिजे ही माझी मानसिकता झाली आहे आणि हे केवळ दिवास्वप्नच असू शकतं. पैसाही जास्त पाहिजे आणि मेहनतही करायची नाही हे कसं शक्य आहे. व्यवसाय करताना अडीअडचणी येतात, अडथळे येतात, संकटे येतात हे मला मान्यच नाही. सगळं कसं सरळ आणि व्यवस्थित चाललं पाहिजे असं मला वाटतं. छोटा मोठा व्यवसाय करायचा असेल तर भांडवल असं कितीसं लागतं. मी ते कुठूनही आणि कसेही उभा करू शकतो. पण मी ते नाही करत. मी दुसऱ्याकडून अपेक्षा करतो. आळस माझा मित्र झालेला आहे. कधीही उठायचं कधीही कामाला जायचं. फालतू टाईमपास करायचा. विनाकारण कुठेही फिरायचं. चित्रपट पाहायचे. उगाचच वादविवादामध्ये सहभागी व्हायचं. कुठल्याही प्रकारचे प्रशिक्षण नाही घ्यायचं. स्वतःलाच शहाणा समजायचं. टवाळ आणि असफल लोकांच्या संगतीत राहायचं. आणि एखाद्या क्षेत्रात अपयश आलं तर लगेच दुसरे क्षेत्र निवडायचं. धरसोड वृत्ती इत्यादी गुणामुळे मी पुढे जाऊ शकलो नाही. पुस्तके वाचायचे नाहीत. मिटींगला हजर राहायचं नाही. मोटिवेशनल कार्यक्रम ऐकायचे नाहीत. आणि असे असेल तरीसुद्धा मला मोठे बनायचं आहे. स्वप्न तर मोठे बनायचं पण कृती मात्र शून्य. शेठ आणि सावकार बनून फिरायचं आहे. कसं शक्य आहे. बरं कोणी कितीही सांगितलं तरी मी ऐकतही नाही. मी स्वतःच्या दुनियेत मस्त रमलोय. ध्येय चिकाटी मेहनत आणि संयम कोणताही व्यवसाय करण्यासाठी हे गुण हवेतच . हे सर्व माहीत आहे. कळतंय पण वळत नाही म्हणतात ते यालाच. वरून प्रगती होत नाही म्हणून दुसऱ्यांना दोष द्यायचा. स्वतःची चूक कबूलही करायची नाही. कोणाचं ऐकायचं ही नाही. आणि नशिबाला ही दोष द्यायचा. मग माझं नुकसान दुसरे कोणी करत आहे की मी स्वतःच करतोय. माझ्या प्रगतीच्या आड दुसरे कोणी येतंय का. मीच माझा स्वतःचा विकास साधू शकत नसेल तर माझा दुश्मन कोण.

निलेश साठे

**

# भारताला दुखापतींचे ग्रहण

## संघ व्यवस्थापनाची डोकेदुखी वाढली; खेळाडूंच्या आरोग्याच्या तक्रारीत वाढ



। अहमदाबाद । वृत्तसंस्था ।

भारतात सुरू असलेल्या टी- २० वर्ल्डकप २०२६ चा सुपर ८ चा राऊंड सुरू होत आहे. भारताचा सुपर ८ मधील पहिला सामना हा दक्षिण अफ्रिकेसोबत होणार आहे. यापूर्वी भारतीय संघाने नेटमध्ये घाम गाळला आहे. या नेट सेशनवेळी भारताचे टेन्शन वाढवणारी एक घडना घडली. शुक्रवारी, भारताचा वेगवान गोलंदाज मोहम्मद सिराजला नेटमध्ये सराव करत असताना चेंडू लागला. त्यामुळे तो जबर जखमी झाला आहे.

टी-२० वर्ल्डकपमध्ये भारताला दुखापतींचे ग्रहण लागले आहे. हर्षित राणाला दुखापत झाल्यामुळे शेवटच्या क्षणी मोहम्मद सिराजला संघात स्थान देण्यात आले.

हर्षित राणा हा संपूर्ण स्पर्धेलाच मुकला आहे. त्याची रिप्लेसमेंट म्हणून संघात आलेला मोहम्मद सिराजने आतापर्यंत फक्त एकाच सामन्यात प्लेईंग ११ मध्ये खेळला आहे. आता त्याला दुखापत झाल्यानं संघ व्यवस्थापनाची डोकेदुखी वाढली आहे.

रेव्ह स्पोर्ट्सने दिलेल्या माहितीनुसार नेटमध्ये सराव करत असताना मोहम्मद सिराज हा हार्दिक पंड्याला गोलंदाजी करत होता. त्यावेळी हार्दिक पंड्याने एक जोरदार फटका मोहम्मद सिराजच्या दिशेने मारला. चेंडू थेट सिराजच्या गुडघ्याला जाऊन आदळला. त्यामुळे सिराज मैदानावर पडला. यानंतर सिराजला खूप वेदना होत असल्याने त्याने मैदान सोडले.

मोहम्मद सिराजनं टी २० वर्ल्डकपमध्ये टीम इंडियात पुनरागमन केल्यानंतर युएसएविरूद्धचा सामना खेळला. या सामन्यात त्याने दमदार कामगिरी करत २९ धावात ३ बळी टिपले. मात्र, यानंतर मोहम्मद सिराजला प्लेईंग ११ मध्ये खेळण्याची संधीच मिळाली नाही. सिराजला नामिबिया, पाकिस्तान आणि नेदरलँड्स विरूद्धच्या सामन्यात खेळण्याची संधी मिळाली नाही.

सुपर ८ मध्ये देखील भारतीय संघ प्लेईंग ११ मध्ये जसप्रीत बुमराह आणि अर्शदीप सिंग सोबतच जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे मोहम्मद सिराजला सुपर ८ मधील सामन्यात देखील प्लेईंग ११ मध्ये जागा मिळण्याची शक्यता नाही. असे असले तरी भारताच्या १५ च्या संघात मोहम्मद सिराजचा एकमेव बॅक-अप वेगवान गोलंदाज म्हणून समावेश आहे.

टी-२० वर्ल्ड कप सुरू झाल्यापासून भारतीय संघाला खेळाडूंच्या आरोग्याच्या तक्रारींची चिंता आहे. स्पर्धेच्या सुरुवातीला वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह आणि अभिषेक शर्मा आजारी पडले होते. याशिवाय नुकताच दुखापतीतून सावरून वॉशिंग्टन सुंदर संघात दाखल झाला आहे. तसेच स्पर्धेच्या सुरुवातीलाच हर्षित राणा दुखापतीमुळे संपूर्ण स्पर्धेलाच मुकला, ज्यामुळे सिराजला शेवटच्या क्षणी भारतीय संघात स्थान देण्यात आले.

### भारताची संभाव्य प्लेईंग ११

अभिषेक शर्मा, इशान किशन, तिलक वर्मा, सूर्यकुमार यादव (कर्णधार), अक्षर पटेल, शिवम दुबे, हार्दिक पंड्या, रिंकू सिंह, अर्शदीप सिंह, वरूण चक्रवर्ती, जसप्रीत बुमराहराखीव खेळाडूसंजू सॅमसन, मोहम्मद सिराज, कुलदीप यादव, वॉशिंग्टन सुंदर.

# अंजुमन इस्लाम विजेता

**मुंबई** : मुंबई शालेय क्रीडा संघटना आणि जेबीसीएन यांच्या पुढाकाराने आयोजित सुपर कप शालेय क्रिकेट स्पर्धेत हॅरिस शील्ड विजेत्या अंजुमन इस्लाम संघानेच शेष शालेय संघाचा ५ विकेट राखून सहज पराभव केला. शेष शालेय संघाने शौर्य पाटीलच्या ६७ धावांच्या जोरावर सर्वबाद १८८ अशी मजल मारली




होती तर अंजुमनने लक्ष्मीप्रसाद विश्वकर्मा (६६) आणि युवराज भिंगारे (नाबाद ३७) यांच्या फटकेबाजीमुळे विजयी लक्ष्य ३३.२ षटकांतच गाठत बाजी मारली. शेष शालेय संघाकडून विराट यादवने ४२ धावांत ३ विकेट घेतले. या स्पर्धेचा पुरस्कार वितरण सोहळा रणजीपटू अभिज्ञान पुंडू, एमसीए सचिव उन्मेष खानविलकर, एमएसएसए क्रिकेट सचिव नदीम मेमन यांच्या उपस्थितीत पार पडला.



# रणजीत कर्नाटक अंतिम फेरीत

## जम्मू-काश्मीरला इतिहास घडवण्याची संधी

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

रणजीच्या रनभूमीवर कर्नाटकने पुन्हा एकदा आपली परंपरा जिवंत ठेवली. उत्तराखंड विरुद्धचा उपांत्य सामना अपेक्षेप्रमाणे अनिर्णित राहिला, पण पहिल्या डावातील ५०३ धावांच्या प्रचंड आघाडीच्या जोरावर कर्नाटकने तब्बल ११ वर्षांनंतर रणजी करंडकाच्या अंतिम फेरीत धडक मारली. २४ फेब्रुवारीपासून हुबळी येथे रंगणाऱ्या अंतिम लढतीत त्यांचा सामना जम्मू-कश्मीरशी होणार आहे.

पाचव्या आणि अखेरच्या दिवशी ६ बाद २९९ धावांवरून पुढे खेळताना कर्नाटकचा डाव ३२३ धावांवर आटोपला. मात्र पहिल्या डावातील भक्कम कामगिरीमुळे त्यांना तब्बल ८२६ धावांची एकूण आघाडी मिळाली आणि हीच आघाडी त्यांच्या अंतिम फेरीच्या तिकिटाची खात्री ठरली.संघाने ६ बाद २६० धावांवर दुसरा डाव घोषित केला. एका टप्प्यावर उत्तराखंडची अवस्था ६ बाद १५६ अशी बिकट होती; मात्र नेगी आणि रावत यांनी सातव्या विकेटसाठी १०४ धावांची भागीदारी करत सामना रंगतदार केला. अखेरीस चहापानानंतर दोन्ही कर्णधारांनी सामन्यातील निकाल ड्रॉवर शिक्कामोर्तब केला. पहिल्या डावातील आघाडीमुळे कर्नाटकचा मार्ग मोकळा झाला आणि २०१४-१५ हंगामानंतर प्रथमच अंतिम फेरीत पोहोचण्याची संधी त्यांनी साधली. जम्मू-कश्मीरसमोर इतिहास घडवण्याची सुवर्णसंधी आहे.

विनायक दळवी

# झिम्बाब्वे केवळ धक्का देणारा संघ नाही




झिम्बाब्वे या संघाची ओळख म्हणजे मोठ्या स्पर्धेत तो दुसऱ्या बलाढ्य संघाला धक्का देऊ शकतो. याची प्रचीती १९९९ च्या विश्वचषकात होत दस्तूरखुद्द भारताला झाली होती. भारतीय संघ या स्पर्धेत चांगले विजय मिळवून पुढे जात होता.

झिंबाब्वे विरुद्धचा सामना भारत सहज जिंकणार असे चित्र दिसत होते. त्यावेळेची एक घटना म्हणजे, सचिन तेंडुलकर त्या सामन्यात खेळू शकला नव्हता. कारण त्याच्या वडिलांचा निधन झाल्यानंतर तो मायदेशी परतला होता. तरी देखील झिंबाब्वे सारख्या संघाला अरुण भारताला कठीण नव्हता भारतीय संघ त्यावेळी काहीसा गाफील राहिला असेच वाटते. ज्या हेन्री ओलाँगोने त्या सामन्यात वाईड आणि स्वयं गोलंदाजी करून स्वतःचा हसू करून घेतले होते. त्याच ओलाँगोने अखेरच्या षटकात भारताला विजय मिळवून दिला नाही. अखेरच्या षटकात तमाम भारतीय प्रेक्षक विजयाच्या प्रतीक्षेत होते ते झिंबाब्वेचा विजय पाहून आकाश झाले होते. त्या प्रभावाने भारतीय संघाच्या त्या स्पर्धेच्या अंतिम फेरीतील प्रवेशाच्या अशा नष्ट करून टाकल्या होत्या.

झिम्बाब्वेचा राष्ट्रीय क्रिकेट संघ हा आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेच्या (आयसीसी) पूर्ण सदस्यांपैकी एक आहे. टी-२० विश्वचषकाच्या नऊ आवृत्त्या झाल्या आहेत आणि झिम्बाब्वेने सहा आवृत्त्यांमध्ये भाग घेतला आहे. जरी ते २००९ च्या आवृत्तीसाठी पात्र ठरले असले तरी, राजकीय कारणांमुळे इंग्लंड आणि दक्षिण आफ्रिकेच्या दबावामुळे त्यांनी नंतर माघार घेतली होती. ते कधीही स्पर्धेच्या बाद फेरीत पोहोचू शकले नाहीत परंतु त्यांची सर्वोत्तम कामगिरी २०२२ मध्ये सुपर १२ टप्प्यात पोहोचल्यानंतर झाली.

यंदाचा विश्वचषक देखील झिंबाब्वेस संघआगळावेगळा ठरणार आहे. गेल्या वर्ष दीड वर्षात या संघाने कात टाकली आहे. सिकंदर रझा हा एक परिपूर्ण आणि कल्पक कर्णधार मिळाल्यानंतर हा संघ अधिक जोमाने खेळत आहे. ऑस्ट्रेलियाला हरवल्यानंतर सर्वांना वाटलं होते नेहमीप्रमाणे एका मोठ्या संघाला हरवण्यासारखाच तो पराक्रम आहे मात्र त्यानंतर त्यांनी श्रीलंकेला हरवलं आणि दिमाखात अपराजित राहून सुपरएट फेरीत प्रवेश मिळवला. या वाटचालीत त्यांनी एकही सामना गमावला नाही. विशेष म्हणजे त्यांच्या गटात ओमान वगळता अन्य सर्व संघ कसोटी खेळणारे संघ होते.


सिकंदर रझा म्हणतो, भूतकाळात जे काही घडले ते घडले आहे, परंतु आमच्या खेळाडूंचा हा संच किंवा हा गट बराच काळ एकत्र आहे. खेळाप्रती आणि चेंजिंग रूममध्ये एकमेकांशी अत्यंत प्रामाणिकपणा आणि सचोटीने आमचे काम करीत आहोत. आम्ही ठरवलेल्या गोष्टींपैकी योजनाबद्ध पद्धतीचाच तो एक भाग होता.

झिंबाब्वेच्या कप्तानाला त्याला मिळणारा त्याच्या देशवासीयांकडून तसेच अन्य देशांच्या प्रसिद्धी माध्यमांकडून मिळणारा प्रतिसाद अतिशय भावला आहे. त्यामुळे आमच्या खेळाडूंचा उत्साह द्विगुणित झाला आहे तीच गोष्ट आम्हाला आणखी चांगली कामगिरी करण्यासाठी प्रवृत्त करीत आहे त्यानंतरचा आमचा प्रवास खडतर आहे, याची जाणीव आहे कारण श्रीलंके बाहेर म्हणजे भारतात आम्ही यापुढील सामने खेळणार आहोत. भारतातील खेळपट्ट्या, हवामान आणि परिस्थिती यात श्रीलंकेतील परिस्थितीपेक्षा खूपच फरक आहे. त्यामुळे आम्हाला आता नव्याने सुरुवात करून आतापर्यंतच्या वाटचालीत आणखीन यशाची मजल मारायची आहे.

झिम्बाब्वेचा सुपरहिटमधील सामना मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर येत्या सोमवारी वेस्टइंडीज विरुद्ध होणार आहे. झिंबाब्वेला सुपरहिटमध्ये भारताविरुद्ध चेन्नई येथे दोन हात करायचे आहेत.

# शिल्पाला रायफल शूटिंग स्पर्धेत दोन रौप्य

। छत्रपती संभाजीनगर । वृत्तसंस्था ।



युएईमधील अबुधाबी इथं झालेल्या ओपन रायफल शूटिंगच्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत शहरातील शिल्पा चव्हाण हिने दोन रौप्यपदकांची कमाई केली. १० मीटर आणि ५० मीटर रायफल शूटिंगमध्ये तिने पदकं जिंकली आहेत. रायफल शूटिंग या खेळातील अबुधाबी इथं जागतिक स्तरावरील ओपन मास्तर स्पर्धा आयोजित करण्यात आली, ज्यामध्ये भारताच्या तीन खेळाडूंनी चमकदार कामगिरी केली. शिल्पा वयाच्या पंधराव्या वर्षापासून रायफल चालवण्याचा सराव करत आहे. वडील गोरख चव्हाण पोलीस दलात अधिकारी असल्याने लहानपणापासून बंदूक पाहण्याची संधी तिला मिळाली, काही वर्षात राज्यस्तरीय, केंद्रीय पातळीवर असलेल्या स्पर्धांमध्ये सहभाग घेत पदकांची कमाई केली.

# पाकिस्तान संघ ५६ धावांत गार

नवी दिल्ली : महिलांच्या आशिया चषक रायझिंग स्टार स्पर्धेच्या उपांत्य फेरीत पाकिस्तानचा संघ ५६ धावांत गार झाला आणि बांगलादेशने ५४ धावांनी विजय मिळवला. भारतीय महिलांनी पहिल्या उपांत्य फेरीत श्रीलंकेला नमवून आधीच फायनल गाठली होती. त्यामुळे आता जेतेपदाच्या लढतीत भारत-बांगलादेश समोरासमोर असणार आहे. बांगलादेशच्या संघाने २० षटकांत ८ बाद ११० धावांपर्यंत मजल मारली. लक्ष्याचा पाठलाग करताना पाकिस्तानचा संपूर्ण संघ १६.४ षटकांत ५६ धावांत तंबूत परतला.

# भाग्यश्रीला फाजा स्पर्धेत सुवर्णपदक

। नांदेड । वृत्तसंस्था ।



होनवडज ता. मुखेड येथील आंतरराष्ट्रीय दिव्यांग खेळाडू भाग्यश्री जाधव यांनी दुबईत नुकत्याच झालेल्या जागतिक फाजा अजिंक्यपद स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करत दोन सुवर्णपदके जिंकली. गोळाफेक आणि भालाफेक या दोन्ही क्रीडा प्रकारांत प्रथम क्रमांक पटकावत त्यांनी भारतासह नांदेड जिल्ह्याचे नाव जागतिक स्तरावर उज्ज्वल केले.

फेब्रुवारी महिन्यात दुबईत झालेल्या स्पर्धेत विविध देशांतील आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू सहभागी झाले होते. भाग्यश्री हिची क्रीडा कारकीर्द वर्ष २०१७ पासून सुरू झाली. अवघ्या नऊ वर्षांच्या कालावधीत त्यांनी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये २३ सुवर्ण, चार रौप्य व सात कांस्य अशी एकूण ३४ पदकांची कमाई केलेली आहे. आतापर्यंत त्यांनी दहा देशांत झालेल्या विविध जागतिक स्पर्धांमध्ये भारताचे प्रतिनिधित्व केले.

विशेष म्हणजे पॅरिस येथे झालेल्या स्पर्धेत भारतीय पथकाचा ध्वजवाहक होण्याचा बहुमानही त्यांना मिळाला होता. त्यांच्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल राज्य शासनाने त्यांना ङ्गशिवछत्रपती पुरस्कारफ प्रदान करून सन्मानित केलेले असून, मुख्य क्रीडा कार्यकारी अधिकारी (वर्ग-१) या पदावर नियुक्ती दिली आहे.

# सिकंदरने मोडला रोहितचा विश्वविक्रम

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।




२०२६ च्या टी-२० विश्वचषकात श्रीलंकेला हरवून झिम्बाब्वेने आणखी एक मोठा धक्का दिला. यापूर्वी या संघाने ऑस्ट्रेलियालाही हरवले होते. श्रीलंकेविरुद्ध झिम्बाब्वेच्या विजयाचा नायक कर्णधार सिकंदर रझा होता, त्याने १७९ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना २६ चेंडूत २ चौकार आणि ४ उत्तुंग षटकारांसह ४५ धावांची धमाकेदार खेळी केली. या दरम्यान त्याचा स्ट्राईक रेट १७३.०८ होता. त्याच्या शानदार खेळीसाठी सिकंदर रझाला सामनावीराचा पुरस्कार देण्यात आला. हा पुरस्कार जिंकून सिकंदर रझा यांनी माजी भारतीय कर्णधार रोहित शर्माचा विक्रम मोडला.

सिकंदर रझा आता आयसीसी स्पर्धेत कर्णधार म्हणून सामनावीर पुरस्कार जिंकणारा सर्वात वयस्कर खेळाडू बनला आहे, हा विक्रम यापूर्वी हिटमॅन रोहित शर्माच्या नावावर होता. रोहित शर्माने ३७ वर्षे आणि ३३१ दिवसांच्या वयात आयसीसी स्पर्धेत सामनावीराचा पुरस्कार जिंकला. २०२५ च्या चॅम्पियन्स ट्रॉफीच्या अंतिम सामन्यात न्यूझीलंडविरुद्ध त्याने हा पुरस्कार जिंकला. पण आता झिम्बाब्वेचा कर्णधार सिकंदर रझाने ३९ वर्षे आणि ३०१ दिवसांच्या वयात सामनावीराचा पुरस्कार जिंकून रोहित शर्माचा विश्वविक्रम मोडला आहे.

# जोनाथनचा अफगाणिस्तान क्रिकेटला अलविदा



**नवी दिल्ली** : अफगाणिस्तानने २०२६ च्या टी-२० विश्वचषकाचा शानदार विजयाने शेवट केला. गुरुवारी एम. चिदंबरम स्टेडियमवर झालेल्या स्पर्धेतील ३९ व्या सामन्यात त्यांनी कॅनडाचा ८२ धावांनी पराभव केला. या सामन्यामध्ये अफगाणिस्तानच्या खेळाडूंची कमालीची कामगिरी पाहायला मिळाली.

मागील काही वर्षापासून आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये अफगाणिस्तानच्या संघाने कमालीची कामगिरी केली आहे. अफगाणिस्तानच्या संघाचे मागील काही वर्षापासून चांगल्या कामगिरीचे श्रेय हे त्याचे मुख्य प्रशिक्षक जोनाथन ट्रॉट यांचेही आहे. गुरुवारी झालेल्या सामन्यानंतर अफगाणिस्तानच्या संघासाठी भावूक काही क्षण होते. या विजयासोबत मुख्य प्रशिक्षक जोनाथन ट्रॉट यांनाही निरोप दिला.



# क्रिकेट सामन्यात मधमाश्यांचा हल्ला

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

क्रिकेटवेड्या भारतात दररोज कुठे ना कुठे क्रिकेट स्पर्धा सुरू असता. भर उन्हात तरुणांसह वयस्कर मंडळी सुद्धा क्रिकेट खेळण्यासह बघण्याचा आनंद घेतात. मात्र, मागील काही महिन्यांमध्ये चालू सामन्यात हृदयविकाराच्याझटक्यानेखेळाडूंचे मृत्यू झाल्याच्या घटना घडल्या आहेत. त्यामुळे खेळाडूंमध्ये चिंतेचे वातावरण आहे. अशातच उत्तर प्रदेशात सामना सुरू असताना मधमाशांनी हल्ला केल्यामुळे ५२ वर्षांच्या अंपायरचा मृत्यू झाल्याने एकच खळबळ उडाली आहे. उन्नाव येथील सप्रू मैदानावर बुधवारी (दि.१८ ) पॅरामाउंट या संघामध्ये सामना खेळला जात होता. सामन्याच्या दुसऱ्या डावात ड्रिंक ब्रेक दरम्यान मधमाशांनी अचानक मैदानावरील खेळाडूंवर हल्ला केला. मधमाशांनी हल्ला केल्यामुळे सर्व खेळाडू मैदानात झोपून राहिले. मात्र, मधमाशा खेळाडूंसह अंपायरवर तुटून पडल्या होत्या. मधमाशांच्या या हल्ल्यात अनेक खेळाडू जखमी झाले आहेत. त्यांना तात्काळ जवळील रुग्णालयात दाखल करण्यात आलं. यामध्ये ५२ वर्षीय मानिक गुप्ता यांच्यावरही मधमाशांनी जबर हल्ला केला. त्यांनाही रुग्णालयात घेऊन जाण्यात येत होते. मात्र, वाटेतच त्यांची प्राणज्योत मावळली. पांढरे कपडे घातल्यामुळे जवळपास १० मिनिटे मधमाशांनी त्यांना घेरल्याचं बोललं जात आहे.

# भारत बांगलादेश अंतिम सामना

। बँकॉक । प्रतिनिधी ।

आशिया करंडक रायझिंग स्टार्स महिला क्रिकेट स्पर्धेत येत्या रविवारी भारत विरुद्ध बांगलादेश अंतिम सामना होणार आहे. शुक्रवारी झालेल्या उपांत्य सामन्यात भारताने श्रीलंकेचा पाच विकेट आणि ३९ धावा राखून दणदणीत पराभव केला. यात कर्णधार राधा यादवने अष्टपैलू कामगिरी केली.

दुसऱ्या उपांत्य लढतीत बांगलादेशने पाकिस्तानचे आव्हान ५४ धावांनी संपुष्टात आणले. भारतीय गोलंदाजांनी श्रीलंकेला ११८ धावांत गुंडाळले. यात राधाने १९ धावांत चार विकेट मिळवल्या.

दुसऱ्या सामन्यात बांगलादेश महिलांचा संघ २० षटकांत आठ बाद ११० धावाच करू शकला होता; परंतु त्यांच्या गोलंदाजांनी कमाल केली. पाकिस्तानला १६.४ षटकांत ५६ धावांत गारद केले. बांगलादेशच्या संजीदा अख्तर हिने केवळ सहा धावांत तीन विकेट मिळवल्या. तर फलंदाजीत त्यांची कर्णधार फातिमा खातून हिने नाबाद ४० धावांची खेळी केली होती.

## साहसी पर्यटनाला लाभले नवे पंख | देशी-विदेशातील २०० पायलटांचा सहभाग

# पॅराग्लायडिंग वर्ल्ड कपचा थरार सुरू

। कराड । प्रतिनिधी ।

सह्याद्रीच्या डोंगररांगा आणि निसर्गसौंदर्याने नटलेल्या, 'महाराष्ट्राचे काश्मीर' अशी ओळख असलेल्या महाबळेश्वर जवळील पाचगणी येथे सध्या देश-विदेशातील पॅराग्लायडर्स एका अनोख्या साहसाची साक्ष देत आहेत. पाचगणीच्या आकाशात रंगीबेरंगी पॅराग्लायडर्सचा मुक्त संचार पाहायला मिळत असून 'पॅराग्लायडिंग वर्ल्ड कप' स्पर्धेचा थरार अधिकृतपणे सुरू झाला आहे. या जागतिक स्पर्धेमुळे पाचगणीच्या साहसी पर्यटनाला नवे पंख लाभले आहेत.



महाराष्ट्र राज्य पर्यटन महासंचालनालय आणि हाय फ्लाय पॅराग्लायडिंग, पाचगणी यांच्या संयुक्त विद्यमाने ही स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. जगातील सुमारे २५ देशांतील तब्बल २०० नामांकित पायलट या स्पर्धेत सहभागी झाले आहेत. या स्पर्धेसाठी रशिया, फ्रान्स, जर्मनी, अमेरिका आदी देशांतील अनुभवी आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील पायलट पाचगणीत दाखल झाले आहेत.

या आंतरराष्ट्रीय स्पर्धेमुळे स्थानिक पर्यटनाला मोठी चालना मिळाली असून हॉटेल व्यवसाय, लॉजिंग तसेच स्थानिक बाजारपेठेत उत्साहाचे वातावरण आहे.

### पर्यटनाची 'गगनभरारी'

पाचगणीत प्रथमच इतक्या मोठ्या प्रमाणावर आंतरराष्ट्रीय पॅराग्लायडिंग स्पर्धा होत असल्याने शहरातील हॉटेल्स, लॉजिंग आणि स्थानिक बाजारपेठेत मोठी तेजी आली आहे. या स्पर्धेमुळे केवळ क्रीडा क्षेत्रातच नव्हे तर 'डव्हेंचर टुरिझम'मध्ये पाचगणीचा ब्रँड जागतिक स्तरावर पोहोचत आहे.

दररोज हवामानाचा अंदाज घेऊन स्पर्धकांना एक आव्हानात्मक ङ्गटास्कफ दिला जातो. रवाईन हॉटेलजवळील तळमाळ येथून टेक-ऑफ केल्यानंतर स्पर्धकांना मेढा, वाठार आणि सुरूर असा कठीण मार्ग पार करत वाई येथील डी-मार्ट परिसरात सुरक्षित लँडिंग करावे लागते. हवेचा वेग व दिशा यांचा अचूक अंदाज घेत, कमीत कमी वेळेत हे अंतर पार करणारा आणि सर्वाधिक गुण मिळवणारा स्पर्धक या जागतिक स्पर्धेचा विजेता ठरणार आहे. जीवाची पर्वा न करता, मात्र अत्यंत सावधगिरी बाळगत हे पायलट कौशल्यपूर्ण उड्डाण करताना दिसत आहेत.

> **पाचगणी हे पॅराग्लायडिंगसाठी अत्यंत योग्य ठिकाण आहे. पर्यटनप्रेमी आणि स्थानिक संस्थांच्या सहकार्यामुळे युरोपमध्ये भरवली जाणारी ही वर्ल्ड कप स्पर्धा यंदा भारतात आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेमुळे स्थानिक पर्यटनाला मोठी चालना मिळाली असून पंचगणीचे नाव पर्यटनाच्या जागतिक नकाशावर सुवर्णाक्षरांनी कोरले गेले आहे.**
> **अनुपम जाधव-पाटील, आयोजक**

आकाशात उडणाऱ्या रंगीबेरंगी पॅराग्लायडर्समुळे पाचगणीचे आकाश उजळून निघाले असून हे दृश्य कॅमेऱ्यात टिपण्यासाठी पर्यटकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
**■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)